बुलढाणा | मंगळवार । २० ऑक्टोबर २०२६ । वर्ष-४ । अंक-७१ । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. RNI : MAHMAR/2023/89148 DAINIK MAHABHOOMI बुलढाणा । छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम



दैनिक
महाभूमि
निर्मळ, निकोप, निःपक्ष
https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com



उद्या अंक येणार नाही

विजयादशमीनिमित्त मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी दैनिक महाभूमि कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे बुधवार, २१ ऑक्टोबरचा अंक येणार नाही.
- कार्यकारी संपादक

राजस्थानमधील कोटा येथून पोलिसांनी पकडले | एक बिहारचा तर दोघे हरियाणाचे | रेल्वे गाड्यांमध्ये राबवण्यात आली शोधमोहीम

टायगर श्रॉफवर गोळीबार करणाऱ्या संशयित हल्लेखोरांना अटक

नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

अभिनेता टायगर श्रॉफवर गोळीबार करणाऱ्या तिघांना राजस्थानमधील कोटा येथून सोमवारी अटक करण्यात आली आहे. यामध्ये एक बिहारचा तर दोघे हरियाणाचे आहेत. सध्या या तिघांचीही चौकशी सुरू आहे. रविवारी अभिनेत्यावर गोळीबार करणाऱ्यांमध्ये यातील दोन जण सामील असल्याचा संशय आहे.

पोलिसांपासून वाचण्यासाठी हे तिघेही रेल्वेने मुंबईतून पळून गेले होते. त्यांनी महाराष्ट्राची सीमा ओलांडून शेजारील गुजरात राज्यात प्रवेश केला होता. राजस्थानमधील कोटा रेल्वे स्थानकावर रेल्वेने प्रवास करत असताना या हल्लेखोरांना पकडण्यात आले. मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, कोटा शहर पोलिसांनी त्वरित कारवाई सुरू केली.



कारवाईत १५ पोलिसांच्या पथकाचा समावेश..

कोटा शहर पोलिसांनी पकडलेल्या तिघांपैकी दोघे हरियाणाचे आहेत, तर तिसरा व्यक्ती बिहारचा असून तो दीर्घकाळापासून महाराष्ट्रात राहत होता. घटनेनंतर हे तिघे थेट रेल्वे स्थानकावर पोहोचले, गाडीत चढले आणि जयपूरच्या दिशेने निघाले होते. संशयितांपैकी एक जण अल्पवयीन आहे. या कारवाईत १५ पोलिसांच्या पथकाचा समावेश होता; तसेच सरकारी रेल्वे पोलिसांचेही सहकार्य लाभले.

मास्टरमाईडला सोडणार नाही; फडणवीसांचा इशारा

- जुहूसारख्या वदर्ळीच्या ठिकाणी टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबाराच्या धक्कादायक घटनेनंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत पोलिसांच्या तपासाची माहिती दिली. पोलिसांनी रातोरात आरोपींची ओळख पटवली असून, हे भ्याड हल्लेखोर आणि त्यांचे मास्टरमाईड जगाच्या पाठीवर कुठेही लपले असले, तरी त्यांना सोडणार नाही, असा इशारा दिला. टायगर श्रॉफवर हल्ला आणि यापूर्वी सलमान खानला आलेल्या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर बॉलीवूडच्या सुरक्षेच्या प्रश्नावर बोलतांना फडणवीस यांनी स्पष्टकेले की, या घटनेशी संबंधित प्रत्येक गोष्टीचे बारकाईने विश्लेषण केले जाईल. ज्या ज्या सेलिब्रिटींना सुरक्षेची गरज आहे, त्याचा आढावा घेऊन मुंबई पोलीस आवश्यक ती सर्व खबरदारी घेतील.

लॉरेन्स गँगच्या अनिल पंडितने स्वीकारली हल्ल्याची जबाबदारी

- टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबारच्या या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगच्या अनिल पंडितने स्वीकारली असून अलीकडेच अनिल पंडितने हरियाणवी गायक दिलेर खरकिया यांच्या वाहनावर झालेल्या गोळीबाराची जबाबदारीही स्वीकारली होती. पानिपतमध्ये अनिलविरुद्ध १० गुन्हे दाखल आहेत. टायगर श्रॉफवर गोळीबार झाल्यानंतर अनिल पंडितचा एक ऑडिओ समोर आला होता. त्यात त्याने मी अनिल पंडित, लॉरेन्सचा धाकटा भाऊ असल्याचे सांगितले होते.

शहर पोलीस अधीक्षक (एसपी) तेजस्विनी गौतम यांच्या मार्गदर्शनाखाली, रेल्वे गाड्यांमध्ये शोधमोहीम राबवण्यात आली. या शोधमोहिमेदरम्यान कोटा पोलिसांनी तिन्ही संशयितांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. पोलीस पथकाने त्यांना कोटा येथे आणले असून, तिथे एसपी तेजस्विनी गौतम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी त्यांची कसून चौकशी करत आहेत.

न्यूज ब्रीफ

प्रार्थनेदरम्यान क्रॉस कोसळून पादरीचा मृत्यू

वॉशिंग्टन : दक्षिण अमेरिकेतील इक्वेडोर येथे प्रार्थनेदरम्यान पाद्रीच्या अंगावर लाकडापासून बनवलेला क्रॉस पडला. त्यामुळे पादरीच्या डोक्याला दुखापत झाली आणि त्यांचा मृत्यू झाला. प्रार्थनेचे ऑनलाइन प्रक्षेपण केले जात होते. संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली. इक्वाडोरमधील किनारी बंदर शहर ग्वायाकिल येथील परपेतुओ सोकोरो चर्चमध्ये घडली. येथे आवर लेडी ऑफ परपेच्युअल हेल्प चर्चमध्ये फादर पॅट्रिसियो अल्क्रेडो सांचेझ मोलीनारी प्रवचन देत होते.

ऑस्ट्रियाला जाणाऱ्या विमानाला बॉम्बची धमकी

सोफिया : इस्त्रायलहून ऑस्ट्रियाला जाणाऱ्या ऑस्ट्रियन एअरलाइन्सच्या विमानाला बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर ते बल्गेरियात उतरवण्यात आले. एअरबस ए ३२० हे विमान रविवारी रात्री तेल अवीवहून व्हिएन्नाला जात होते. धोक्याची माहिती मिळाल्यानंतर बल्गेरियाच्या हवाई दलाने विमानाला एस्कॉर्ट करण्यासाठी मीग-२९ लढाऊ विमाने पाठवली. विमानात ५१ प्रवासी आणि सहा क्रू सदस्य होते. सर्वांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.


सौरव दास, रांका यांच्या न्यायालयीन कोठडी वाढ



नवी दिल्ली : कॉकरोच जनता पार्टीचे नेते आशुतोष रांका आणि सौरव दास यांच्या न्यायालयीन कोठडीत विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी आणखी दोन दिवसांची वाढ केली आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ ऑक्टोबरला होणार आहे. न्यायालयीन कोठडीतून सुटका व्हावी यासाठी 'सीजेपी'च्या कायदेशीर टीमने विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला होता. अटकेच्या दिवशी जामीनदार उपलब्ध नसल्याने त्यांना सुरुवातीला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह जामीनदार हजर करण्यात आले असून त्यांच्या तात्काळ सुटकेची विनंती वकिलांनी केली आहे.

न्यूझीलंडमध्ये जाणाऱ्या वस्तू आजपासून टॅक्स फ्री

मुक्त व्यापार करार मंजूर ▶ व्यापारासाठी सुवर्णसंधी



नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

भारत व न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करार मंगळवार, २० ऑक्टोबरपासून लागू होणार आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सोमवारी ही माहिती दिली. दोन्ही देशांनी वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापाराला गती देण्यासाठी आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी २७ एप्रिल रोजी या मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. या करारानुसार, न्यूझीलंडला होणाऱ्या भारताच्या १०० टक्के निर्यातीला शुल्क-मुक्त प्रवेश मिळेल.

सध्या न्यूझीलंड सिरॅमिक्स, कार्पेट्स, ऑटोमोबाईल आणि ऑटो पार्ट्ससह प्रमुख भारतीय वस्तूंवर १० टक्क्यांपर्यंत कमाल शुल्क आकारतो. याव्यतिरिक्त, न्यूझीलंडने भारतात १५ वर्षांच्या कालावधीत २० अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक करण्याची वचनबद्धता दर्शविली.

पाच अब्ज डॉलर व्यवसायाचे लक्ष्य

- करारानुसार, दोन्ही देशांमध्ये व्यापार २.४ अब्ज डॉलरवरून वाढवून ५ अब्ज डॉलरपर्यंत नेण्यात येणार आहे. न्यूझीलंडने भारताच्या सर्व निर्यातीवरील टेरिफ पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या करारामुळे भारतात सुमारे २० अब्ज डॉलरची मोठी परकीय गुंतवणूक येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा करार केवळ वस्तूंपुरता मर्यादित नसून, सेवा आणि नवीन संधींचे महाद्वार उघडणार असल्याचे पियूष गोयल यांनी सांगीतले.

दुष्काळामुळे कोणत्याही सरकारी योजना बंद होणार नाही : बावनकुळे

नागपूर, वृत्तसंस्था :



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारी योजनांना कात्री लावली जाणार असल्याच्या वावड्या उठत आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणतीही योजना बंद केली जाणार नाही. केवळ योजनांच्या अंमलबजावणीत आवश्यक सुधारणा करून अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो. त्यातून वाचणारा निधी दुष्काळ निवारणासाठी वापरणे हा सरकारचा उद्देश असल्याची माहिती म हसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. माझ्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने दुष्काळ निवारणासाठी आवश्यक सूचना दिल्या आहेत. दुष्काळी उपाययोजनांवर अधिक प्रभावीपणे खर्च करण्यासाठी काटकसर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विकासासाठी एखाद्या रस्त्याचे काम काही काळ पुढे ढकलावे लागले, तरी चालेल; मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ देणार नाही. शेतकऱ्यांना मदत करणे ही आमची प्राथमिकता आहे. चारा आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्या लागतील.

मणिपूरमध्ये हिंसाचाराचा उद्रेक

हत्येनंतर मृतदेह मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर ठेवले



इंफाळ, वृत्तसंस्था :

मणीपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळला असून गेल्या चोवीस तासांत वेगवेगळ्या घटनांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला. रविवारी रात्री थौबल जिल्ह्यात दोन समुदायांमध्ये झालेल्या संघर्षामध्ये एका व्यक्तीचा बळी गेला. तर सोमवारी सकाळी जंगलात लाकडे गोळा करण्यासाठी गेलेल्या लोकांवर अज्ञात हल्लेखोरांनी बेछूट गोळीबार केला. या हल्ल्यात तीन जणांचा मृत्यू झाला. घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह थेट इम्फाळ इथल्या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानासमोर ठेवून जोरदार आंदोलन केले.

इम्फाळ पूर्व आणि कांगपोकपी जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या कांगपोकपीच्या खोंगबाल सुनुरोक उयोक परिसरात ही खळबळजनक घटना घडली. सोमवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास १६ जणांचा एक गट डोंगराळ भागात लाकडे गोळा करण्यासाठी गेला होता. याच दरम्यान दबा धरून बसलेल्या संशयित दहशतवाद्यांनी त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. या भीषण हल्ल्यात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. अरुबाम रोनिल (३५), लैरेनलकपम इनाओबी (५१) आणि क्षेत्रिमायुम सुशील (३२) अशी मृतांची नावे आहेत. तसेच या गोळीबारात चार जण गंभीर जखमी झाले असून, वन यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

'लोकशाही ही कोणाकडून मिळालेली देणगी नाही'

खा.शशी थरूर यांचे किरेन रिजिजूंना प्रत्युत्तर

नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

लोकशाही ही कोणाकडून मिळालेली देणगी नाही. आम्ही भारताचे सामान्य नागरिक तिचे संरक्षक आहोत. प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्या लोकशाहीचे रक्षण करण्याचा अधिकार आहे. निवडणूक आयोगासारख्या संस्थांनी जबाबदारीने काम करावे, अशी आमची अपेक्षा आहे. हा घटनात्मक मुद्दा आहे. याचा कोणतेही सरकार पाडण्याच्या किंवा सत्तांतराच्या प्रयत्नाशी काहीही संबंध काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी सोमवारी केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्या सत्तांतर घडवून आणण्याच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.

संविधानानुसार त्यांनी जे करणे अपेक्षित आहे, तेच त्यांनी करावे. एवढेच. मी कोणत्याही प्रकारे या संस्थांना आव्हान देत नाही. त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर आणि त्यांच्या वर्तनावर मी प्रश्न उपस्थित करत आहे. मोठ्या संख्येने लोकांची नावे मतदार यादीतून अत्यंत त्रासदायक, अनियमित आणि अंशतः बेकायदेशीर प्रक्रियेमुळे हटवण्यात आली आहेत. त्यामुळे आम्ही ही संपूर्ण प्रक्रिया मागे घेण्याची मागणी करत आहोत.

हिंसाचाराचे आम्ही समर्थन करीत नाही

- फ्रान्समध्ये बस आणि पोलिस ठाण्यांना आग लावण्यासारख्या कोणत्याही हिंसाचाराचे आम्ही कधीही समर्थन करणार नाही. आमचा केवळ शांततापूर्ण निदर्शनांवर विश्वास आहे.

बलात्कारपीडितेला ३१ आठवड्यांच्या गर्भपाताची परवानगी

नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालयाने १६ वर्षीय बलात्कारपीडितेला ३१ आठवड्यांची गर्भधारणा संपवण्याची परवानगी दिली. अल्पवयीन मुलीने मुलाला जन्म देऊन त्याच्या संगोपनाची जबाबदारी उचलावी, अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. असे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले. न्यायालयाने म्हटले की, अल्पवयीन बलात्कार पीडितेला गर्भधारणा संपवण्याचा अधिकार हा केवळ लैंगिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलेच्या अधिकारांपुरता मर्यादित नाही, तर तो मानवाधिकारांशीही संबंधित आहे. गर्भधारणा सुरू ठेवण्यास भाग पाडल्याने पीडितेच्या सन्मानपूर्वक जगण्यावर परिणाम होऊ शकतो.काही विशेष परिस्थितींमध्ये २४ आठवड्यांपर्यंत गर्भधारणा संपवण्याची परवानगी आहे.



समृद्ध लोककलेसह संगीत परंपरेचा राष्ट्रीय गौरव

सहा युवा कलावंतांना 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार'

नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशातील विविध कलापरंपरांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, राज्यातील सहा युवा कलावंतांना संगीत नाटक अकादमीच्या प्रतिष्ठित 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'ने सन्मानित करण्यात आले. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतापासून महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी नाळ जोडलेल्या भारूड, शाहिरी, पोवाडा आणि पारंपरिक बाहुलीनाट्यापर्यंत विविध कलाप्रकारांत योगदान देणाऱ्या या कलावंतांच्या सन्मानामुळे राज्याच्या सांस्कृतिक वैभवाला राष्ट्रीय व्यासपीठावर नवी ओळख मिळाली आहे.



केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते नवी दिल्लीतील रवींद्र भवन परिसरातील मेघदूत थिएटर कॉम्प्लेक्स येथे झालेल्या समारंभात २०२४ आणि २०२५ या वर्षांसाठी देशभरातील एकूण १०६ युवा कलावंतांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार'अंतर्गत २५ हजार रुपये रोख, ताम्रपट आणि अंगवस्त्र देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात येतो. युवा प्रतिभेला प्रोत्साहन देणे, पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन करणे आणि भारतीय कला-संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या पुरस्कारांचा प्रमुख उद्देश आहे. या समारंभास केंद्रीय संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल, संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, अकादमीचे उपाध्यक्ष अनवर खान मांगणियार आणि सचिव राजू दास उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैविध्याचे प्रतिबिंब

- हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील योगदानाबद्दल कृष्णा बोंगाणे आणि अंकिता जोशी यांना २०२४ चा संयुक्त युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारंपरिक 'बहुरूपी भारूड' या लोककलाप्रकाराच्या संवर्धनासाठी डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांना गौरविण्यात आले. पारंपरिक कलासूत्री बाहुलीनाट्य कलेच्या जतन व संवर्धनासाठी बालकृष्ण (कृष्णा) गणपत मसगे यांना २०२४ चा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.२०२५ च्या पुरस्कारांमध्ये हार्मोनियम वादनातील योगदानाबद्दल तन्मय देवचके, तर शाहिरी, पोवाडा आणि लोकगीतांचा अभ्यास, संशोधन व प्रसार यांसाठी प्रवीण प्रताप जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

न्यूज ब्रीफ

कोल्हापुरात गुन्हेगाराची दिवसाढवळ्या हत्या

कोल्हापूर : जिल्ह्यातील जयसिंगपूर येथून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. जयसिंगपूरजवळील दानोळी गावात सराईत गुन्हेगार महेश दळवी यांची अज्ञातांनी दिवसाढवळ्या गोळ्या झाडून निर्घृण हत्या केली आहे. या गोळीबाराच्या थरारक घटनेमुळे संपूर्ण कोल्हापूर जिल्हा हादरून गेला असून परिसरात मोठी दहशत निर्माण झाली आहे. ही घटना सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच जयसिंगपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पुढील तपासाला सुरुवात केली आहे. मात्र, दळवी यांच्यावर हा गोळीबार कोणी आणि नेमक्या कोणत्या कारणासाठी केला, हे अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकारामुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

नोकरीचे आमिष दाखवून २३ लाखांची फसवणूक

अहिल्यानगर : सैन्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखवून दोघांची २३.३९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ऋषीकेश महादेव गोल्हार (वय २५, रा. भाळवणी, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश कारभारी थोपटे (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) आणि अक्षय उत्तम हरणे (रा. नांदेड) या दोन संशयित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन २०२३ पासून ते आजतागायत ही घटना घडली. त्यांच्या तक्रार अर्जाची चौकशी करून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दोघांनी फिर्यादी ऋषीकेश गोल्हार आणि त्यांचा मित्र अंकेश अशोक दावभट या दोघांना सैन्यात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी त्यांना बनावट व खोटे नियुक्तीपत्रे दाखवली.

हसन मुश्रीफ यांच्या 'महायुती'ला धक्का : शौमिका महाडिकांचा सात मतांनी पराभव

गोकुळच्या निवडणुकीत सतेज पाटलांची आघाडी

कोल्हापूर / वृत्तसंस्था

कोल्हापुरातील प्रतिष्ठेची लढाई मानली जाणारी म्हणजे गोकुळ दूध उत्पादक संघाची निवडणूक. या निवडणुकीची राज्यभर चर्चा सुरू आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी कॉंग्रेस नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली होती. या निवडणुकीचे मतदान पार पडले असून सध्या मतमोजणीत सतेज पाटील यांचे पॅनल तब्बल १५ उमेदवारांनी आघाडीवर होते.

गेल्या अनेक वर्षांपासून गोकुळ दूध संघावर असलेले महाडिक घराण्याचे वर्चस्व मोडीत काढत, यंदाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांनी समविचारी आघाडीची सत्ता स्थापन करून महायुतीला मोठा धक्का दिला आहे. या निवडणुकीत पारंपरिक राजकीय घराण्यांतील अनेक दिग्गज नेते मैदानात असले तरी, मतदारांनी महायुतीच्या दोन प्रमुख नेत्यांना चांगलाच दणका दिला. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या चिरंजीवांच्या पराभवानंतर, आता शौमिका महाडिक यांनाही अवघ्या ७ मतांनी पराभवाचा सामना करावा लागला असून, या निकालावर असमाधान व्यक्त करत त्यांनी फेरमतमोजणीची (रिकाउंटिंगची) मागणी केली होती.



कोल्हापूरमध्ये 'बंटी' पॅटर्नचा ऐतिहासिक विजय

सतेज पाटील यांच्या या यशावर कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले की, कोल्हापूरमध्ये 'बंटी' पॅटर्नचा ऐतिहासिक विजय! कोल्हापूरची भाग्यवाहिनी असलेल्या गोकुळ दूध संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने आमदार सतेज (बंटी) पाटील यांच्या नेतृत्वात मिळवलेल्या अभूतपूर्व आणि दणदणीत विजयाबद्दल सर्व नवनियुक्त संचालकांचे कौतुक.

फेर मतमोजणीची मागणी

महायुतीप्रणीत छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवार शौमिका अमल महाडिक यांना कॉंग्रेसप्रणीत सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार राजू जयवंतराव आवळे यांच्याकडून अवघ्या ७ मतांनी पराभव स्वीकारावा लागला. या निसटत्या पराभवामुळे महाडिक कुटुंबासह भाजप आणि महायुतीला मोठा राजकीय धक्का बसला आहे. शौमिका महाडिक यांनी या निकालावर तातडीने फेरमत मोजणीची मागणी केल्याने एकच चर्चा रंगली होती.

तक्रारीसाठी सहा महिन्यांची अट रद्द; पणनमंत्र्यांच्या घोषणेमुळे दिलासा

मुंबई / वृत्तसंस्था

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास सहा महिन्यांत तक्रार करावी लागत होती. ही अट रद्द करण्यात आली असून शेतकऱ्यांना न्यायाची दारे दीर्घ मुदतीसाठी खुली करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेऊन नुकसानभरपाई मिळवून दिली जाईल, अशी घोषणा पणनमंत्री व मुंबई राष्ट्रीय बाजाराचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी केली आहे.

मुंबई राष्ट्रीय बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व बाजार समितीच्या विकासकामांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नुकतेच बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. शेतकऱ्यांच्या फसवणुकीची तक्रार आल्यास तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. राष्ट्रीय बाजार घोषित झाल्यानंतर चार महिन्यांत पाच कोटी रुपये उत्पन्न वाढले आहे. उत्पन्नातील गळती थांबविण्यासाठी डिजिटलायझेशन करण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याची घोषणाही करण्यात आली आहे.



दुरुपयोग करणाऱ्यांवर कारवाई

शेतकरी व ग्राहकांच्या हितासाठी थेट पणन योजना सुरू केली आहे. काही उत्तम काम करत आहेत पण काही गैरफायदा घेत असल्याच्या तक्रारी आहेत. चुकीचे काम करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. भविष्यात बाजार समितीमध्ये व बाहेर व्यापार करणाऱ्यांना समान नियमावली केली जाईल, अशी माहितीही जयकुमार यांनी दिली.

घटनांची यादी दाखवत दानवे यांचा फडणवीसांना टोला

मुंबई / वृत्तसंस्था

अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर झालेल्या गोळीबारानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेवरून विरोधकांनी थेट राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोट ठेवत राज्य सरकारला धारेवर धरले आहे. विधान परिषदेचे आमदार आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर एक अत्यंत आक्रमक पोस्ट करत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

अंबादास दानवे यांनी केवळ टायगर श्रॉफ प्रकरणावरच भाष्य केले नाही, तर गेल्या काही महिन्यांत मुंबई आणि आसपासच्या परिसरात घडलेल्या हाय-प्रोफाईल गोळीबाराच्या घटनांची यादीच समोर ठेवली आहे. यामध्ये त्यांनी ५ प्रमुख घटनांचा उल्लेख केला आहे. या पोस्टमधून दानवे यांनी फडणवीसांच्या नेतृत्वावर आणि कार्यक्षमतेवर थेट प्रहार केला आहे. देवेंद्र फडणवीस हे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांना आपले राजकीय गुरू मानतात. मुंडे हे गृहमंत्री असताना त्यांनी मुंबईतील अंडरवर्ल्ड आणि गँगवार मोडून काढले होते, या संदर्भाचा आधार घेत रावसाहेब दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना खोचक टोला लगावला आहे. हल्ल्याच्या घटनेवरुन विरोधक सत्ताधारी पक्षावर निशाणा साधत आहेत. यामुळे आरोप प्रत्यारोपाचे राजकारण रंगले आहे.



'बिश्नोई गँगचा राज्यावर कब्जा करण्याचा डाव'

मुंबई : "राज्यात सुरुवातीला माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची निर्घृण हत्या झाली, त्यानंतर अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार झाला आणि आता अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळ्या झाडण्यात आल्या. या सर्व घटनांची जबाबदारी कुख्यात लॉरेन्स बिश्नोई टोळी उघडपणे स्वीकारत आहे. याचा सरळ अर्थ असा की, अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमनंतर आता लॉरेन्स बिश्नोई गँग संपूर्ण महाराष्ट्रावर आपला ताबा मिळवण्यासाठी आणि आपले साम्राज्य निर्माण करण्यासाठी सरसावली आहे.

मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत दिवसाढवळ्या सिनेस्टार आणि राजकीय नेत्यांवर गोळ्या झाडून दहशत निर्माण केली जात असताना गृहखाते नक्की काय करत आहे? चंद्रपूर येथे संवाद साधताना आक्रमक भूमिका घेत वडेट्टीवार यांनी कठोर शब्दांत ताशेरे ओढले.

'ब्लॅकलिस्टेड' संस्थेद्वारा तुरीची शासन खरेदी!

जिल्हा उपनिबंधक करणार प्रकरणाची चौकशी

अमरावती / प्रतिनिधी

सोयाबीनची शासन खरेदी करताना विदर्भ मार्केटिंग फेडरेशनची सबएजंट संस्था असलेल्या खरेदी-विक्री संस्थेद्वारा ४१६ क्विंटलची तूट आलेली आहे. या प्रकरणी संबंधित संस्थेला ब्लॅकलिस्टेड करण्यात आले होते. तरीही या संस्थेद्वारा तुरीची शासन खरेदी करण्यात आली, याबाबत शासनाकडे तक्रार झाल्याने पणन उपसंचालकांनी डीडीआर यांना ९ ऑक्टोबरला पत्र देत चौकशीचे आदेश दिले आहेत.

व्हीसीएमएफ नागपूर व अमरावती खरेदी विक्री संस्था जबाबदार असल्याची माहिती समोर आल्याने यासंस्थेद्वारे २०२४-२५ च्या हंगामात सोयाबीनची खरेदी करण्यात आली. मात्र या शासन खरेदीत घोळ झाला. यामध्ये तब्बल ४१६ क्विंटलची तूट आल्याबाबत या संस्थेच्या क्षेत्रातील वातावरण तापले असुन पणन आयुक्तांच्या भूमिकेकडे खरेदी विक्री केंद्र चालकांचे लक्ष लागले आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर प्रकरणावर पडदा पडणार आहे.



१५ एप्रिल २०२५ ला केले होते 'ब्लॅकलिस्टेड'

सोयाबीनच्या शासन खरेदीत अनियमिततेप्रकरणी अमरावती खरेदी-विक्री संस्थेला १५ एप्रिल २०२५ च्या पत्रान्वये ब्लॅकलिस्टेड केले होते. त्याचवेळी या संस्थेद्वारा तुरीची खरेदी सुरू होती. व्हीसीएमएफ व अमरावती उपनिबंधक यांनी या संस्थेला तुरीची शासन खरेदी बंद करण्याचे कोणतेही आदेश दिले नाहीत. उलट व्हीसीएम एफद्वारा सोयाबीनची तूट किती आली याबाबत २८ नोव्हेंबर २०२५ ला पत्र दिल्याचा आरोप तक्रारीत केला आहे.



राशीभविष्य

- **मेष :** किरकोळ बाबींचा विचार करू नका. भावनेपेक्षा कर्तव्याकडे अधिक लक्ष द्या. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ :** इतरांच्या अपेक्षा वाढीस लागतील. मनस्तापाचे प्रसंग संभवतात. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मिथुन :** अचानक धनलाभ संभवतो. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **कर्क :** आर्थिक बाबतीत चिंता राहील. स्थावर प्रश्न आणखी बिकट बनेल. अनुभवींचा सल्ला अवश्य घ्यावा.
- **सिंह :** नव्या कामांबाबत उत्साह राहील. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **कन्या :** पूर्वीच्या ओळखी कामी येतील. कर्ज प्रकरणाबाबत दिलासा मिळेल. विद्यार्थ्यांना सयश लाभेल.
- **तूळ :** नव्या करारांना अनुकूलता राहील. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **वृश्चिक :** व्यवसायात उत्तम स्थिती राहील. नव्या कामांना चालना मिळेल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल.
- **धनु :** व्यवसायात मतभेद संभवतात. प्रवासात मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **मकर :** उत्साह वाढवणाऱ्या घटना घडतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **कुंभ :** स्वमताग्रह टाळायला हवा. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. दिवाळीनिमित्त खरेदीचा उत्साह राहील.
- **मीन :** दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. मनाजोग्या घटना घडतील. स्थावर प्रश्नात तडजोड हिताची ठरेल.

स्किल डेव्हलपमेंट

घरीच करा व्यवसाय

अनेकींना काही कारणांमुळे नोकरीच्या वेळा सांभाळता येत नाहीत. अशा वेळी घरीच एखादा व्यवसाय करण्याचा विचार केला जातो. तुम्ही तुमच्या गुणवत्तेच्या बळावर पुढे जाऊ शकता.

❊ नृत्य कौशल्य असणाऱ्या महिला घरात नृत्याचे वर्ग सुरू करू शकतात. सध्या शास्त्रीयच नाही तर वेस्टर्न डान्सलाही प्रचंड मागणी आहे. तुम्ही उत्तम नृत्यांगना असाल तर डान्स क्लास सुरू करू शकता. सध्या झुंबा डान्सचीही क्रेझ आहे. हा नृत्यप्रकार शिकून तुम्ही झुंबा डान्स क्लास सुरू करू शकता.

❊ तुमच्या हाताला चांगली चव असेल तर केटरिंगचा व्यवसाय सुरू करता येईल. टिफिन सेंटरचा पर्यायही तुमच्याकडे आहे. विविध खाद्यपदार्थ बनवून त्यांची विक्री करता येईल.

❊ सध्या फिटनेसबाबत बरीच जागरूकता निर्माण झाली आहे. योगा, मेडिटेशन करण्याकडे लोकांचा कल आहे. योगाचं प्रशिक्षण घेऊन तुम्ही योग क्लास सुरू करता. मेडिटेशनची तंत्र शिकवता येतील.

❊ घरी शिकवणी वर्ग घेता येतील. पहिलीपासून दहावी, बारावीचे शिकवणी वर्ग घेता येतील.

दिन विशेष

२० ऑक्टोबर

१९५२ : केनियामध्ये आणीबाणी लागू.
१९६३ : क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिद्धूचा जन्म.
१९७८ : भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागचा जन्म.
१९९१ : ऑकलंड शहरात प्रचंड आग. २५ ठार.
१९९६ : पत्रकार आणि युद्धशास्त्र अभ्यासक दि. वि. गोखले यांचे निधन.
२०१३ : शरीफ यांनी काश्मीरचा मुद्दा पुन्हा उकरुन काढला आणि या प्रश्नी अमेरिकेने हस्तक्षेप करावा अशी आग्रही मागणी केली.

कोण होणार?

गेट परीक्षा दिल्यानंतर...

इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट म्हणजे ग्रॅज्युएट ॲप्टिटचूड टेस्ट इन इंजिनिअरींग. इंजिनिअरींगसह तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट परीक्षेतल्या गुणांवर सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते.

❊ गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे योग्य उमेदवारांची निवड केली जाते. या उमेदवारांची यादी तयार करून त्यांना मुलाखतीला बोलवण्यात येतं. काही वेळा गेट परीक्षेतल्या गुणांवर नोकरी मिळते.

❊ सार्वजनिक क्षेत्रातल्या ६० पेक्षा अधिक कंपन्या गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे कर्मचाऱ्यांची निवड करतात. पण बरेच विद्यार्थी महारत्न कंपन्यांची निवड करत असल्यामुळे या क्षेत्रात खूप स्पर्धा असते.

❊ सेल, भेल, एनटीपीसी, ओएनजीसी, आयओसीएल, सीआयएल, गेल, बीपीसीएल अशा सार्वजनिक क्षेत्रातल्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये तुम्हाला उत्तम संधी मिळू शकते.

आरोग्यमंत्र

विषाणूजन्य ताप आहे?

वरकरणी ताप हा सर्वसामान्य आजार गणला जातो. खेरीज ताप हा आजार नसून आजाराचं लक्षण आहे असं तज्ज्ञ सांगतात. मात्र तापाचेही वेगवेगळे प्रकार आहेत. ते समजून घेणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ विषाणूजन्य तापाला व्हायरल फिवर म्हटलं जातं. योग्य औषधोपचारांनी हा ताप वेळीच नियंत्रणात आणता येत असला तरी उपचारास विलंब लागला तर आरोग्यास धोका उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विषाणूजन्य ताप विशिष्ट प्रकारच्या विषाणूंमुळे होत नाही तर हवेतल्या विविध प्रकारच्या विषाणूंमुळे होणाऱ्या जंतूसंसर्गाची परिणती तापात होते. म्हणून या तापाला विषाणूजन्य ताप म्हटलं जातं. या तापाची लक्षणं सर्वसामान्य तापाप्रमाणेच असल्याने त्यावर एकाच प्रकारची औषधं दिली जातात. विषाणूजन्य अन्नपदार्थ किंवा पेयांचं सेवन, विषाणूजन्य तापाच्या रुग्णाशी किंवा त्याच्या रक्ताशी आलेला संपर्क तसंच श्वसनावाटे शरीरात गेलेली दूषित हवा यामुळे विषाणूजन्य तापाची लागण होऊ शकते. विषाणूजन्य ताप संसर्गजन्य आजार मानला जातो. विशेषत: पावसाळ्यात विषाणूजन्य तापाचा प्रादुर्भाव होतो. मात्र बरेचदा या तापाचं वेळेत निदान होत नाही. अनेक संसर्गजन्य आजारांची सुरुवात तापानेच होत असल्याने याचं निदान करणं जिकिरीचं होतं. अशा वेळी विषाणूजन्य तापाच्या प्रमुख लक्षणांकडे लक्ष द्यायला हवं. विषाणूंचा संसर्ग झाल्याने उद्भवणारा ताप तीव्र स्वरूपाचा असतो हे लक्षात घ्यायला हवं.



पंचांग

मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन शु. ९ **(दसरा)**,
चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : शूल,
सूर्योदय ६.३६, सूर्यास्त ६.१०

फॉरवर्डस

तब ना ख़ुशी होगी ना क़ोई दर्द रुलाने वाला...

ज़ब अपना लोगे तुम हर रंग ज़माने वाला...!

फॅशन पॅशन

❊ डेनिम शर्टचा वापर लेअरिंगसाठीही करता येईल. पांढरा टी शर्ट त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हा पेहराव झक्कास दिसेल.

❊ काळ्या फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट उठून दिसतो.

❊ मिक्स अँड मॅचचं तंत्र फक्त मुलींपुरतं मर्यादित नाही. मुलंही आता अशी फॅशन करत आहेत. डेनिम शर्ट ब्लेझर पँटसोबतही कॅरी करता येईल. डेनिम शर्टवर टाय खूप शोभून दिसेल. ही स्टाईल सध्या भाव खाऊन जातेय.

करिअरवाटा

राखा बॉसची मर्जी

ऑफिसमध्ये बॉस हा सर्वेसर्वा असतो. तो सांगेल ती पूर्व, अशीच काहीशी परिस्थिती असते. म्हणून त्याची मर्जी राखणं आणि त्याच्याकडून एखादी गोष्ट पदरात पाडून घेणं हे कौशल्याचं काम ठरतं. याविषयी...



❊ बॉसचा मूड बघून विषय काढा. डोक्यात राग असताना, कामाचा ताण असताना, एखाद्याशी वादविवाद झालेला असताना मूड चांगला नसतो. तुम्ही नेमक्या याच वेळी विषय काढला तर वड्याचं तेल वांग्यावर निघू शकतं. ❊ बॉस सुट्टीवरुन परत आल्यावर, दौऱ्यावर जाण्याआधी वादग्रस्त विषय टाळा. बॉसचं शेड्युल व्यस्त असेल तेव्हा बोलू नका. ❊ बॉसशी उच्च स्वरात बोलू नका. तुम्ही रागावलेला पाहून बॉसचा रागही वाढू शकतो. ❊ कुठल्याही विषयावर मुद्देसुद बोला. चाचरत, अस्पष्ट आणि अधांतरी बोलणं टाळा. मुद्दे खंबीरपणे मांडा. ❊ तुम्ही महत्त्वाच्या पदावर असाल तर अधिक योग्य पद्धतीनं अडचण हाताळली जाईल. तुमच्या कामातील कौशल्य, प्रामाणिकपणा, वागण्या-बोलण्यातील पद्धत, कामाची निकड या सर्व बाबींवर तुमच्या अडचणीचं महत्त्व अवलंबून आहे. ❊ बॉस तुमच्या मताला किंमत देत नसेल तर त्यांच्या मर्जीतील व्यक्तीची मदत घ्या.

खेचाखेची

एप्रिल फूल

संतासिंग एक एप्रिलला बसमध्ये चढला.

थोडचा वेळाने कंडक्टर आला आणि तिकीट विचारू लागला.

संताने त्याला दहा रुपयाची नोट दिली आणि तिकीट घेतलं आणि जोरात ओरडला एप्रिल फूल!

हे बघा माझ्याकडे पास आहे!

वेगळं काही

हैदराबादमधल्या एका कंपनीने इटेबल कप तयार केला असून 'इट कप' असं नाव त्याला देण्यात आलं आहे. या कपमधून गरम आणि थंड पेयं पिता येतील. हा कप धान्यांपासून तयार करण्यात आला आहे. साधारणपणे ४० मिनिटांपर्यंत हा कप कुरकुरीत रहातो. यात गरम आणि थंड पेयांसोबतच दही किंवा गोड पदार्थही ठेवता येतात. द्रव पदार्थ ठेवल्यानंतरही कप कुरकुरीत रहातो. या कपमध्ये ठेवलेल्या पदार्थाची चवही बदलत नाही. हा कप तयार करण्यासाठी कोणत्याही कृत्रीम घटकाचा वापर करण्यात आलेला नाही. त्यामुळे हे कप अगदी सुरक्षित आहेत. हा 'इट कप' प्लास्टिक तसंच कागदी कपांना पर्याय म्हणून तयार करण्यात आला आहे.

हेअर केअर

तजेलदार केसांसाठी...

ऋतूबदलाच्या या काळात केसांच्या अनेक तक्रारी डोकं वर काढतात. केस निस्तेज, कोरडे होतात. मात्र काही घरगुती उपायांद्वारे ही समस्या सोडवता येते.

❊ ॲव्हाकॅडोचा गर घ्या. त्यात एक अंडं घाला. हे मिश्रण ओल्या केसांना लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. ❊ शँपूमध्ये एक अंडं घालून केसांना लावा. पाच मिनिटांनी धुवून टाका. केस छान मऊ होतील. ❊ कोरड्या केसांसाठी खोबरेल तेल वापरू शकता. ❊ अर्धा कप पाण्यात एक मोठा चमचा ॲपल सिडर व्हिनेगर घाला. हे पाणी केसांवर लावा. थोड्या वेळाने धुवून टाका. ❊ दह्याने केसांना मसाज करा. २० मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. नंतर शँपू लावा. या उपायांमुळे केसांचं आरोग्य सुधारेल. सध्या केस रंगवण्याचा ट्रेंड भरात आहे. आवडत असल्यास तुम्हीही केस रंगवू शकता. दोन शेड्सवाला ओंब्रे कलर केस हायलाईट करण्यासाठी वापरता येईल. सोंब्रे कलरही छान दिसतो. एथनिक्स घालायचे असतील तर तुम्ही सोंब्रे रंगाने केस रंगवू शकता. सौम्य स्वरूपाचा रंग हवा असेल तर सुपर सोंब्रेचा पर्याय आहे. हा रंगही केसांचा लूक खुलवतो.



दैनिक
महाभूमि

बुलढाणा भूमि

मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६
dainikmahabhoomi@gmail.com





हवामान अंदाज

सूर्योदय : ६.२२ सकाळी
सूर्यास्त : ५.५८ सायं.
तापमान
कमाल : ३३°
किमान : २३°

सोने-चांदी

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा)	१३५,३४०
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा)	१४७,६५०
चांदी (प्रति किलो)	२४६,०००

दखल...

प्रश्नचिन्ह

मातृ शक्तिचे आम्ही उपासक
नवरात्रीत करतो गुणगाण
विनयभंग विटंबना पाहता
कसं म्हणावं बरं
भारताची संस्कृती महान ?

उदो उदो आहे
मातृशक्तिचा देशात
महिला कां येती
सातच्या आत घरात ?

खरेच का आमची
बेगडी आहे भक्ति
की विसरलो आम्ही
भारताची संस्कृती ?

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२१३९४३३९)

येळगाव धरणातील जलसाठ्याप्रकरणी पालिका 'ॲक्शन मोड'वर

१८ गावांना उपसा बंद करण्याची नोटीस

बुलढाणा / प्रतिनिधी

संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता नगर पालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. येळगाव धरणावरुन पाणीपुरवठा होत असलेल्या १८ ग्रामपंचायतींना पाणी उपसा बंद करण्याबाबत नोटीस पाठवण्यात आली आहे. त्यामुळे आता या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे.

यावर्षी पावसाने दगा दिल्याने जिल्ह्यातील धरणांमध्ये पुरेसा जलसाठा उपलब्ध नाही. त्यामुळे सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बुलढाणा शहराची तहान भागवरे येळगाव धरण यंदा तहानलेले आहे. गतवर्षी यावेळेस मुबलक जलसाठा उपलब्ध होता. दरवर्षी जुलै महिन्यातच हे धरण शंभर टक्के भरते. त्यावर बुलढाणा आणि आजूबाजूच्या १८ गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. बुलढाणेकरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई फारशी जाणवत नाही. परंतू यावर्षी अत्यल्प पाउस पडल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. सध्या या धरणात केवळ एप्रिल महिन्यापर्यंतच पुरेल एवढाच जलसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे पुढील काही महिने पाणी कसे पुरवायचे? असा सवाल पालिका प्रशासनासमोर उभा ठाकला आहे. नागरिकांना पाणी द्यायचे तरी कसे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने काही कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. धरणातील पाणीसाठा राखून ठेवण्यात आला आहे.



> येळगाव धरणात सध्या ७५ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे खबरदारी घेण्यात येत आहे. पाचशे मीटर परिसरातील खासगी कनेक्शन बंद करण्यात आले आहेत. धरणावरुन पाणी पुरवठा योजना असलेल्या १८ ग्रामपंचायतींना पाणी उपसा बंद करण्याच्या नोटीस देण्यात आल्या आहेत.
> – गणेश पांडे
> मुख्याधिकारी, न. प. बुलढाणा

या गावांना नोटीस

■ येळगाव धरणातून परिसरातील १८ गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. यामध्ये पांगरी, साखळी बु., नांद्राकोळी, खुपगाव, बिरसिंगपूर, डोंगरखंडाळा, हतेडी, सव, अजिसपूर, कोलवड, दत्तपूर, अफजलपूर वाडी, देउळघाट, उमाळा, केळवद, शिरपूर, जयसिंगपूर, केसापूर, अंत्री तेली, तांदूळवाडी व रुईखेड टेकाळे या गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. आता धरणात कमी जलसाठा उपलब्ध असल्यामुळे मुख्याधिकारी पांडे यांनी संबंधित ग्रामपंचायतींना पाणी उपसा थांबवण्याची नोटीस पाठवली आहे. त्यामुळे आता या १८ गावांना पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे.

काय सांगतो करारनामा ?

■ नगर पालिका प्रशासनाचा आजूबाजूच्या १८ ग्रामपंचायतींसोबत करार झालेला आहे. त्याद्वारे येळगाव धरण येथे विहिर, बोअर घेवून या ग्रामपंचायतींनी पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली आहे. मात्र, करारातील अटीनुसार भविष्यात बुलढाणा शहरात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला तर या गावांचा पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, ग्रामपंचायतींना आपली वेगळी व्यवस्था करावी, असे करारनाम्यात नमूद आहे. सध्याची परिस्थिती बघता बुलढाणा शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने सदर गावांना पाणी उपसा बंद करण्याबाबत नोटीस जारी केली आहे.

पीक कर्जासाठी बँक व्यवस्थापकाला घेराव

चिखली / प्रतिनिधी



जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राचा चुकीचा संदर्भ देत अमडापूर स्टेट बँक व्यवस्थापकाने शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवल्याचा प्रकार माजी आ. राहुल बोंद्रे यांना कळाला. याविरोधात आक्रमक भूमिका घेत त्यांनी १६ ऑक्टोबर रोजी बँकेत ठिय्या दिला. त्यांच्या ठाम भूमिकेमुळे बँक प्रशासनाला या प्रकरणाची दखल घ्यावी लागली. अखेर पीक कर्जासाठी अडवणूक होत असलेल्या शेतकऱ्यांचा पीक कर्जाचा मार्ग मोकळा झाला आहे.

अमडापूर येथील स्टेट बँकेचे शाखा प्रबंधक करमकर यांनी अन्य बँकेकडील वैयक्तिक गहाण कर्जाचा संदर्भ देत अनेक शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारले. प्रत्यक्षात, एका बँकेचे पीक कर्ज असताना दुसऱ्या बँकेकडून पीक कर्ज घेता येत नाही, असे जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र असताना त्याचा वैयक्तिक कर्जाशी संबंध जोडून शेतकऱ्यांना अडविणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा राहुल बोंद्रे यांनी उपस्थित केला.या गंभीर प्रकारणी शाखा प्रबंधकांना जाब विचारत पीक कर्ज नाकारण्यामागील लेखी आदेश सादर करण्याची त्यांनी मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राचा चुकीचा संदर्भ लावून शेतकऱ्यांची अडवणूक का केली जात आहे, असा सवाल उपस्थित करत त्यांनी बँक प्रशासनाला धारेवर धरले. बोंद्रेंच्या आक्रमक पाठपुराव्यानंतर बँकेच्या वरिष्ठ स्तरावर या प्रकरणाची दखल घेण्यात आली. अन्य बँकेकडे पीक कर्ज थकीत किंवा सुरू नसताना केवळ वैयक्तिक कर्जाच्या कारणावरून शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवता येणार नाही, अशी भूमिका अग्रणी बँक प्रबंधक यांनी पत्राद्वारे जारी केली. याप्रसंगी चिखली तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राम जाधव, गजानन वायाळ, बाळासाहेब पवार समाधान सुपेकर,गाजी बाबा, एजाज भाई, शाम पठाडे, भाई प्रदीप अंभोरे, वायाळ यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

न्यूज ब्रीफ

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



चिखली : तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील २६ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. मेरा बु.येथील मंगेश सुभाष तोडे मजुरी करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवत होता. काही दिवसांपासून तो नैराश्येत असल्याचे सांगण्यात येते. रविवारी नेहमीप्रमाणे मंगेश आणि त्याची आई सोयाबीन सोंगणीच्या कामासाठी शेतात गेले होते. त्यानंतर मंगेश लवकर घरी आला होता. सायंकाळच्या सुमारास त्याने राहत्या घरातच दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. आई घरी आल्यानंतर तिच्या हा प्रकार निदर्शनास आला.

दसऱ्याच्या मुहुर्तावर वाहन विक्री तेजीत

बुलढाणा : दुष्काळी परिस्थितीतही वाहन विक्री तेजीत असून गतवर्षीच्या तुलनेत १० टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. दसऱ्याच्या मुहुर्तावर अनेकांनी वाहनांची बुकींग केली आहे. त्यामुळे वाहन विक्रीवर दुष्काळाचा फारसा प्रभाव पडला नसल्याचे दिसून येत आहे.दसऱ्याचा मुहुर्त वाहन खरेदीसाठी शुभ मानला जातो. त्यामुळे आपल्याकडे १५० दुचाकींची आधीचबुकिंग करण्यात आली आहे, अशी माहिती विक्रेता संजय गाडेकर यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बुलढाण्यात भोपळा आंदोलन

बुलढाणा / प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँगेस शरद पवार पक्षाच्यावतीने १९ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भोपळा आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणाऱ्या शासनाच्या विरोधात नारे देऊन, डफडे वाजवून, भोपळे फोडून निषेध करण्यात आला.

शासनाने महाराष्ट्रामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे. दुष्काळाने शेतकरी पूर्णतः उध्वस्त झालेला असताना या संकटातून सावरण्यासाठी किमान एक लाख रुपये हेक्टरी मदत शासनाकडून देणे अपेक्षित होते. शासनाने फक्त दुष्काळ जाहीर केला आणि दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये मदत जाहीर केली. शासनाने बळीराजापती घेतलेल्या या अपमानकारक धोरणाचा निषेध करण्यासाठी प्रतिकात्मक भोपळा आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, बी.टी. जाधव, सतीश भुतेकर, वर्षा इंगळे, लक्ष्मी शेळके, नाझीमा खान, डॉ. ज्योती खेडेकर, डॉ.शरद काळे,पी. एम. जाधव, हभप शंकर महाराज, प्रशांत डोंगरदिवे, सुरेश बोंद्रे, अमोल साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगभेद, लिंगभेद, जातीभेद मिळून जावे एकत्र धवल रंगात... या विजयालक्ष्मी वानखेडे यांच्या उद्बोधक काव्याने कवीसंमेलनामध्ये रंग भरला. मी एका पत्त्यावरून निघून जाईल दुसऱ्या पत्त्याकडे....म्हणत आशय पूर्ण अशी रचणा कवी प्रेषित सिद्धभट्टी यांनी सादर केली. भट, गजानन भिवसनकर, सुनील सोनवणे, बाळासाहेब पवार, सुनील कोल्हे, अनिल वर्मा, महादेव शेळके सोनफळे यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

अन्यथा तीव्र आंदोलन...

■ दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये देणे म्हणजे बळीराजाला अपमानित करण्याचा प्रकार आहे. शासनाने आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा. तत्काळ हेक्टरी एक लाख रुपये दुष्काळग्रस्त मदत द्यावी. शिवाय पीक विमा तत्काळ मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात टाकावा. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला.

बॉक्सिंगमध्ये पार्थ पवारला सुवर्णपदक



बुलढाणा : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत शारदा ज्ञानपीठचा बॉक्सर पार्थ शिवाजी पवार याने ७० ते ७५ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले आहे. पार्थने या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पहिल्या लढतीत नाशिक विभागाच्या खेळाडूवर विजय मिळवला. दुसऱ्या लढतीत कोल्हापूर विभागाच्या खेळाडूला पराभूत केले, तर तिसऱ्या लढतीत नागपूर विभागाच्या खेळाडूवर मात करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

जागर स्त्रीशक्तीचा: महिलांना स्वावलंबनाचा कानमंत्र!

मेहकर / प्रतिनिधी



राजर्षी शाहू मल्टीस्टेट आणि धनिक ॲडव्हायझर्स प्रा. लि.च्या संयुक्त विद्यमाने मेहकर येथे आर्थिक साक्षरतेचा जागर करण्यात आला. महिलांना स्वावलंबनाचा कानमंत्र देत बचतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महिलांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्याच्या उद्देशाने १८ ऑक्टोबर रोजी 'जागर स्त्रीशक्तीचा, आर्थिक साक्षरतेचा' हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा मालती शेळके यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शिवसेना उबाठा पक्षाच्या राज्य प्रवक्ता जयश्री शेळके, संचालिका छाया शेळके, नगर पालिका शिक्षण सभापती डॉ. दीपिका रहाटे, नगरसेविका रूपाली गारोळे, शाल्मली रायमुलकर, प्रा. संध्या पाटेकर, उर्मिला ओव्हर, मीना पाटील, सुजाता काळे, पल्लवी वानखेडे, स्वाती पागोरे, शिवकन्या खेडेकर, ज्योती देवकर, डॉ अश्विनी शेळके, ज्योती कृपाल, अनिता येवले, प्रियंका म्हस्के, ऋतुजा देशमुख, सोनाली भोपळे, सपना मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकातून विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाबाबतची भूमिका मांडली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक नियोजनाचे महत्त्व, नियमित बचतीची सवय आणि आर्थिक शिस्त याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनपेक्षित संकटांचा सामना करताना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, तसेच स्वतःच्या व कुटुंबाच्या उज्ज्वल भविष्यासाठी बचतीचे योग्य नियोजन कसे करावे, याविषयी उपस्थित महिलांशी संवाद साधण्यात आला.महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासोबतच त्यांच्यामध्ये आर्थिक निर्णयक्षमता विकसित करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. संचालन अर्चना बोरे यांनी केले.

काव्य मैफलीला बुलढाणेकरांची दाद



बुलढाणा : विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा शाखेच्या वतीने १७ ऑक्टोबर रोजी कवितेचे नवरंग हा कवी संमेलनाचा कार्यक्रम प्रगती सार्वजनिक वाचनालयात घेण्यात आला. या कवी संमेलनामध्ये कवींनी उत्कृष्ट कविता सादर करुन दाद मिळवली. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवी सुभाष किन्होळकर होते. प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघ शाखा बुलढाण्याचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गोविंद गायकी, कि.वा. वाघ, डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे, सुरेश

शेतकऱ्याची गळफास घेवून आत्महत्या

चिखली / प्रतिनिधी



सततची नापिकी, वाढते कर्ज आणि आर्थिक अडचणींमुळे शेलोडी येथील ४० वर्षीय शेतकरी राजेंद्र बजरंग रक्ताडे यांनी १७ ऑक्टोबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली.

राजेंद्र रक्ताडे यांच्याकडे अवघी तीन एकर शेती होती. याच शेतीच्या भरवशावर ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. मात्र, शेतीत सातत्याने होणारी नापिकी आणि खासगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याचे वाढते ओझे यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती. यंदाच्या हंगामातही निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसल्याने त्यांच्यासमोरील संकट अधिकच गंभीर झाले होते.आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी राजेंद्र रक्ताडे यांनी शेलसूर येथील बँकेत नवीन पीककर्ज मिळावे म्हणून आवश्यक कागदपत्रे जमा केली होती. कर्ज मिळण्याच्या प्रतीक्षेत असतानाच शेतीतील प्रतिकूल परिस्थिती आणि वाढत्या आर्थिक विवंचनेमुळे ते अडचणीत सापडले होते. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या नैराश्यातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.राजेंद्र रक्ताडे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली आणि भाऊ असा आप्त परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या कर्त्या पुरुषाच्या निधनाने रक्ताडे कुटुंब उघड्यावर पडले असून, दोन लहान मुलींच्या भविष्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

चोरांच्या हालचाली सीसीटीव्हीत कैद

बुलढाणा : तालुक्यातील बिरसिंगपूर येथे मध्यरात्रीच्या सुमारास संशयित चोरांनी गावात शिरकाव केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे संपूर्ण गावात घबराट पसरली असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या सुमारास काही संशयित व्यक्ती गावात एका विहिरीजवळ संशयास्पद हालचाली करताना आढळल्या. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये या संशयितांच्या हालचाली स्पष्टपणे कैद झाल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण अधिकच वाढले आहे.गावात वारंवार अशा प्रकारे संशयित व्यक्तींचा वावर वाढल्यास मोठी चोरी किंवा अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे भविष्यातील अनुचित प्रकार टाळण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ पावले उचलावी. गावात रात्रीच्या वेळी कडक पहारा देण्यासाठी चौकीदाराची व्यवस्था करावी, अशी एकमुखाने मागणी करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यालयात गुणवंत विद्यार्थिनींचा गुणगौरव



बुलढाणा : येथील श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात १९ ऑक्टोबर रोजी नवरात्रीच्या नवदुर्गा या विशेष उपक्रमांतर्गत विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींचा गुणगौरव करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रमोद कावरे होते. यावेळी नितीन ढोमणे, किशोर सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाच्या माध्यमातून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनी व पालकांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्रमोद कावरे यांनी सांगितले की, नवरात्रोत्सवात नवदुर्गेच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. याच संकल्पनेतून गुणवंत विद्यार्थिनींचा सन्मान करून त्यांच्यातील आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी, आणि नेतृत्वगुणांना प्रोत्साहन देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना प्रोत्साहन मिळाले असून इतर विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.. संचालन शिक्षिका हिंगे यांनी केले तर आभार किशोर सावळे यांनी मानले. आयोजनासाठी शिक्षक वाघ, परिहार यांनी परिश्रम घेतले.

डॉ. शिवानी गोजे यांना सुवर्णपदक



देऊळगाव राजा : वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत डॉ. शिवानी नितीनकुमार गोजे (दर्जे) यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. वर्धा येथील अदानी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमधून आयुर्वेदातील द्रव्यगुण विज्ञान या विषयात एम.डी. पदव्युत्तर पदवी प्राप्त करत त्यांनी सुवर्णपदक पटकावले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १७ ऑक्टोबर रोजी त्यांना सुवर्णपदक प्रदान करून गौरवण्यात आले.डॉ. शिवानी या दुर्गादास बाळकृष्ण दर्जे यांच्या कन्या आहेत. त्यांच्या या यशामुळे दर्जे व गोजे परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

पॅरामिलिटरी असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम ; १५० नागरिकांची आरोग्य तपासणी

मेडगाव येथे मोफत आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

अंढेरा / प्रतिनिधी



ऑल इंडिया पॅरामिलिटरी आजी-माजी अर्धसैनिक असोसिएशनच्यावतीने १८ ऑक्टोबर रोजी मेडगाव येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात परिसरातील सुमारे १५० नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली. पॅरामिलिटरी व भारतीय सैन्यदलातील आजी-माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय तसेच परिसरातील गरजू नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

या शिबिरात फिजिओथेरपी, ॲक्युपंक्चर आणि निसर्गोपचार पद्धतींद्वारे आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. परिसरातील विविध गावांतून नागरिकांनी शिबिराला उपस्थिती लावली. आर्थिक परिस्थितीमुळे आरोग्य तपासणीसाठी अडचणी येणाऱ्या नागरिकांना या उपक्रमाचा विशेष लाभ झाला.शिबिरात एमबीबीएस डॉ. निखिल काळे, निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. विलास साळवे, फिजिओथेरपिस्ट डॉ. राजेश काळुशे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांच्या आरोग्यविषयक तक्रारी जाणून घेत त्यांना उपचारपद्धतींबाबत माहिती दिली.आरोग्यविषयक जनजागृतीसोबतच या शिबिरातून 'पाणी वाचवा, ही काळाची गरज आहे' हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे याबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले.देऊळगाव राजा तालुका असोसिएशनचे अध्यक्ष अशोक वाघ व उपाध्यक्ष शरद साळवे यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी बुलढाणा जिल्हा अध्यक्ष विठ्ठल काकड, कोषाध्यक्ष बबन किल्लारे, सुधाकर जायभाये, अरुण सानप, विष्णू कायदे, नंदू काळुसे, सिंदखेड राजा असोसिएशनचे अध्यक्ष कडुबा शेळके, सचिव शिवानंद खारडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

सर्व तालुक्यांत शिबिरे घेण्याचा निर्णय

■ समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल माँ जगदंबा अंबाई मंदिर समितीच्यावतीने ऑल इंडिया पॅरामिलिटरी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. राजू काळुशे व त्यांच्या पथकासह बुलढाणा जिल्हा असोसिएशनने शिबिराच्या आयोजनासाठी सहकार्य केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. पॅरामिलिटरी असोसिएशनच्यावतीने यापुढे प्रत्येक तहसीलमध्ये अशा प्रकारची मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे आजी-माजी अर्धसैनिक, त्यांचे कुटुंबीय आणि गरजू नागरिकांना आरोग्यविषयक सुविधांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

रुपयाची घसरण !

देशांतर्गत शेअर बाजारातील मोठी घसरण आणि कच्च्या तेलाच्या किमतीत पुन्हा झालेल्या वाढीमुळे अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया तीन पैशांनी घसरून ९४.९२ (तात्पुरता) पातळीवर आला. भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी सांगितले की, रुपयाच्या कमजोरीसाठी केवळ इराण संघर्ष आणि कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींना दोष देणे आणि परिस्थिती सामान्य झाल्यावर रुपया मजबूत होईल असे गृहीत धरणे ही एक चुकीची कल्पना ठरेल. तेलाच्या किमती हा एक महत्त्वाचा घटक असला तरी, देशांतर्गत आणि जागतिक दोन्ही घटकांना प्रतिबिंबित करणाऱ्या परकीय भांडवलाच्या सततच्या बहिर्वाहमुळे गेल्या काही वर्षांपासून रुपया दबावाखाली आहे. भारतीयांनी इक्विटी आणि म्युच्युअल फंडांमध्ये केलेल्या जोरदार गुंतवणुकीमुळे बाजाराला आधार मिळाला आहे, परंतु यामुळे शेअरचे मूल्यांकनही वाढले आहे. विविध बाजारांमधील परताव्याची तुलना करणाऱ्या परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांना सध्याच्या मूल्यांकनानुसार भारतीय मालमत्तेमध्ये वाढीची मर्यादित शक्यता दिसते. इतर बाजारांच्या तुलनेत भारत एक महागडा बाजार बनला आहे. भांडवल अशा अर्थव्यवस्था आणि क्षेत्रांकडे वळत आहे, जे तंत्रज्ञानामध्ये आघाडीवर आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेतील (एआय) तेजीने (विशेषत: मोठ्या अमेरिकन तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये) लक्षणीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. गुंतवणूकदार सेमीकंडक्टर, जैवतंत्रज्ञान, प्रगत उत्पादन आणि नवीकरणीय ऊर्जा तंत्रज्ञान या क्षेत्रांमधील संधींचाही शोध घेत आहेत. या क्षेत्रांमध्ये अमेरिका, तैवान आणि चीन आघाडीवर आहेत. हे जागतिक भांडवल वाटपातील बदलाचे द्योतक आहे. गुंतवणूकदार आता केवळ आर्थिक वाढीवरच नव्हे, तर तांत्रिक नेतृत्व आणि त्यातून मिळणाऱ्या परताव्यावरही लक्ष केंद्रित करत आहेत. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, परंतु अनेक नवीन आणि प्रगत तंत्रज्ञानामध्ये त्याची भूमिका मर्यादित राहिली आहे. २००८ ते २०१३ या काळात आरबीआयचे गव्हर्नर राहिलेल्या सुब्बाराव यांनी सांगितले की, यातून आपल्याला हे शिकायला मिळते की केवळ मजबूत आर्थिक वाढीमुळे परकीय भांडवलाचा ओघ वाढेल किंवा रुपया मजबूत होईल याची हमी मिळत नाही. उत्पादकता वाढवून, निर्यातीची स्पर्धात्मकता मजबूत करून, अनावश्यक व्यवहार खर्च आणि धोरणात्मक अनिश्चितता कमी करून, तसेच प्रगत तंत्रज्ञानामध्ये क्षमता विकसित करून आपल्याला भारतीय मालमत्ता अधिक आकर्षक बनवण्याची गरज आहे. चालू खाते आणि भांडवली खाते या दोन्हीवर काम करण्याची गरज आहे. आरबीआयची प्राथमिक जबाबदारी किंमत स्थिरता राखणे ही आहे, परंतु ती आर्थिक वाढ आणि वित्तीय स्थिरतेकडे दुर्लक्ष करू शकत नाही. सध्याची परिस्थिती या वस्तुस्थितीमुळे अधिक गुंतागुंतीची झाली आहे की, चलनवाढीचा दबाव प्रामुख्याने पुरवठ्याशी संबंधित धक्क्यांमुळे (कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती आणि प्रतिकूल मान्सून) निर्माण होत आहे. आपल्याला अशा गुंतवणुकीच्या प्रवाहांची गरज आहे जे शाश्वत असतील आणि ज्यांना भारताच्या आर्थिक भवितव्यावरील विश्वास, मजबूत निर्यात आणि आयात केलेल्या ऊर्जेवरील कमी अवलंबित्व यांचा आधार असेल! रुपयाची मजबुती ही केवळ डॉलरच्या हालचालींवर किंवा जागतिक संघर्षांच्या समाप्तीवर अवलंबून राहता कामा नये. त्यासाठी अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असणे, निर्यातक्षम उद्योगांचा विस्तार होणे, तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढणे आणि परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास टिकून राहणे आवश्यक आहे.

पंजाबमध्ये बदलत्या वाऱ्यांची चाहूल

राज्यरंग

- राही भिडे, ज्येष्ठ पत्रकार

पंजाबमध्ये २०२७च्या विधानसभा निवडणुकीची चाहूल लागताच काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष बदलून पुन्हा नेतृत्वबदलाचा प्रयोग केला आहे. दुसरीकडे आम आदमी पक्षाने मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या 'इमानदार' प्रतिमेला नव्याने राजकीय रंग देण्यास सुरुवात केली आहे. नोकरशाहीमध्ये 'ईडी'च्या कारवाईची धास्ती वाढली आहे. पंजाबच्या राजकारणात आकार घेत असलेल्या मोठ्या बदलांची चाहूल दडलेली आहे. तिचाच हा वेध.

पंजाबचे राजकारण नेहमीच राष्ट्रीय राजकारणापेक्षा काहीसे वेगळे राहिले आहे. शेतकरी, शीख अस्मिता, पाणी, केंद्र-राज्य संबंध, उद्योग, बेरोजगारी आणि अमली पदार्थ यासारखे प्रश्न येथे राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये मात्र पारंपरिक काँग्रेस-अकाली दलाच्या राजकारणाला आम आदमी पक्षाने मोठे आव्हान दिले. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून 'आप' सत्तेवर आला. आता २०२७ ची निवडणूक जवळ येत असताना सत्ताधारी पक्ष आणि विरोधक दोघांनाही आपापली राजकीय घडी नव्याने बसवावी लागत आहे. काँग्रेससाठी हा काळ विशेष महत्त्वाचा आहे. २०२१ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या अवघ्या काही महिन्यांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंग यांना हटवून चरणजीत सिंह चन्नी यांना मुख्यमंत्री करण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत काँग्रेस सत्तेबाहेर गेली आणि आम आदमी पक्षाने मोठे यश मिळवले. आता सप्टेंबर २०२६ मध्ये, म्हणजे पुन्हा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष अमरिंदर सिंह राजा वडिंग यांची जागा परगत सिंह यांच्याकडे सोपवली आहे. दोन्ही वेळी निवडणुकीच्या आधी नेतृत्वबदल झाला, या वेळी काँग्रेसकडे भूतकाळातून शिकण्याची संधी आहे. नेतृत्वबदल हा पक्षाच्या पुनरुज्जीवनाचा भाग आहे, की अंतर्गत मतभेदांवर तात्पुरता पडदा, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

काँग्रेससमोर केवळ अध्यक्ष बदलण्याचा प्रश्न नाही. प्रदेशाध्यक्ष बदलणे हा संघटनात्मक निर्णय असू शकतो; पण केवळ चेहरा बदलल्याने पक्षाचे राजकीय भवितव्य बदलत नाही. पंजाबमध्ये काँग्रेससमोर अनेक मूलभूत प्रश्न आहेत. पक्षाची संघटनात्मक ताकद पुन्हा उभी करणे, कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करणे, स्थानिक नेतृत्वाला एकत्र आणणे आणि सत्ताधारी 'आप'विरोधात विश्वासार्ह पर्याय उभा करणे ही खरी परीक्षा आहे. पंजाबच्या मतदाराला केवळ सत्ताविरोधी भावना पुरेशी नसत, त्याला पर्याय हवा असतो. काँग्रेसने 'आप'वर टीका करणे सोपे आहे; पण सत्ता मिळाल्यास काय करणार, याचे स्पष्ट उत्तर पक्षाला द्यावे लागेल. विशेषत: रोजगार, उद्योग, शेती, अमली पदार्थांचे संकट, सरकारी वित्तव्यवस्था आणि राज्याच्या अधिकारांचा प्रश्न यावर काँग्रेसची स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका काय आहे, हे जनतेसमोर यायला हवे. पंजाब सरकारच्या आर्थिक अडचणींचे चित्र सप्टेंबरमधील एका अनोख्या घटनेतून समोर



आले. काही सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहनांना पेट्रोल पंपांनी थकबाकी न मिळाल्याने इंधन देणे थांबवले. काही अधिकाऱ्यांना वाहन चालू ठेवण्यासाठी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करावे लागल्याचे वृत्त आहे. नंतर वित्त विभागाकडून प्रलंबित रक्कम अदा करण्यात आली आणि इंधनपुरवठा पूर्ववत झाला. सरकारच्या म्हणण्यानुसार हा निधीअभावाचा प्रश्न नसून तांत्रिक अडथळा होता.

अधिकृत स्पष्टीकरण स्वीकारले, तरी या घटनेने उपस्थित केलेला मोठा प्रश्न टाळता येत नाही. सरकारच्या दैनंदिन कामकाजातील छोट्या देयकांमध्येही विलंब होऊ लागला, तर त्याचा परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होतो. पगार, निवृत्तीवेतन, अनुदाने, विकासकामे आणि सामाजिक योजनांसाठी लागणारा निधी वेळेवर उपलब्ध होणे आवश्यक असते. राज्याची अर्थव्यवस्था ही निवडणुकीतील केवळ आकड्यांची बाब नसते. तिचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनावर होतो. त्यामुळे २०२७ च्या निवडणुकीत पंजाबच्या आर्थिक स्थितीवर सखोल चर्चा होणे आवश्यक आहे. आम आदमी पक्षाने पंजाबमध्ये सुरुवातीपासूनच भ्रष्टाचारविरोधी आणि स्वच्छ प्रतिमेचा राजकीय संदेश दिला. 'कट्टर इमानदार' ही त्याची प्रमुख राजकीय ओळख बनली. आता विधानसभा निवडणूक जवळ येत असताना मुख्यमंत्री भगवंत मान यांना 'इमानदार मुख्यमंत्री' संबोधणारे फलक राज्यभर दिसू लागले आहेत. याकडे केवळ जाहिरात म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. निवडणुकीच्या राजकारणात प्रतिमा हे स्वत:मध्ये एक मोठे शस्त्र असते; परंतु कोणत्याही नेत्याला 'इमानदार' म्हणणे आणि प्रशासन खरोखर पारदर्शक, उत्तरदायी आणि भ्रष्टाचारमुक्त असणे यात फरक आहे.

जनतेसमोर प्रश्न असा असतो, की सरकारच्या प्रतिमेचा दावा आणि प्रत्यक्ष प्रशासन यामध्ये किती अंतर आहे? राजकीय जाहिरातींमध्ये एखाद्या नेत्याची प्रतिमा कितीही उजळवता येते; पण मतदाराच्या अनुभवाला जाहिरातींपेक्षा अधिक महत्त्व असते. सरकारी कार्यालयात कामासाठी गेलेल्या नागरिकाला काय अनुभव येतो, तरुणाला रोजगाराच्या किती संधी मिळतात, शेतकऱ्याच्या उत्पन्नात काय बदल झाला, उद्योगांना राज्यात गुंतवणूक करणे किती सोपे झाले या प्रश्नांची उत्तरेच सरकारच्या प्रतिमेची खरी परीक्षा असतात. पंजाबच्या प्रशासकीय व्यवस्थेतही सध्या अस्वस्थता आहे. 'ग्रेटर मोहाली एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी'च्या अधिकाऱ्यांची दीर्घ चौकशी आणि मोबाइल फोन जप्त करण्याच्या कारवाईनंतर नोकरशाहीमध्ये संभाषणांबाबत सावधगिरी वाढल्याचे चित्र समोर आले आहे.

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

विजया दशमी आणि रावण दहन : दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा



प्रा.सौ.वर्षा विलास कावरे
बालाजी नगर, मूर्तिजापूर, अकोला : ४४४१०७
मोबा. : ९०२१६७३१७८

'दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असे एक ब्रीद वाक्य आहे. त्याचा अर्थ फार मोठा आहे. खरंच दसरा सण हा आनंद देण्या घेण्याचा सण आहे. अश्विन शुद्ध दशमीला येणारा हा सण. नवरात्रीच्या नऊ दिवसांनंतर दहाव्या दिवशी विजयादशमी साजरी होते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त. याच दिवशी प्रभू रामचंद्रांनी रावणाचा वध केला. ९ दिवस युद्ध करून सत्याने असत्यावर विजय मिळवला. तो हा दिवस म्हणून विजयादशमी साजरी केली जाते. या दिवशी प्रभू रामचंद्रांनी रावणाचा वध केला म्हणून दसऱ्याला रावण जाळण्याची प्रथा आहे. या दिवसाचे ऐतिहासिक महत्व असले तरी दसऱ्याचा खरा संदेश हाच आहे की, दसरा फक्त रावण जाळण्याचा सण नाही. आपल्यातला रावण जाळण्याचा सण आहे. काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर, स्वार्थ, अन्याय, अहंकार, अमानवता हे आपल्यातले दहा तोंडाचे रावण. जोपर्यंत हे जळत नाहीत, तोपर्यंत खरा दसरा नाही.

आजच्या काळात दसरा काय शिकवतो तर वाईट कितीही मोठं असलं तरी शेवटी चांगल्याचाच विजय होतो. म्हणून खचून जाऊ नका. लढत रहा. दरवर्षी दसऱ्याला आपण ५०-१०० फूट उंच रावणाचा पुतळा उभा करतो, त्यात फटाके भरतो, आग लावतो, टाळ्या वाजवतो आणि घरी जातो.



पण खरंच रावण जळतो का?रावण कोण होता?

रावण मूर्ख नव्हता. तो चारही वेदांचा ज्ञाता होता, शिवभक्त होता, वीणावादनात निपुण, आयुर्वेदाचा जाणकार, लंकेचा महान प्रशासक. त्याचा पराभव त्याच्या ज्ञानामुळे नाही, तर त्याच्या १० दुर्गुणांमुळे झाला. त्याची दहा तोंडे म्हणजे दहा वाईट वृत्ती. आज गरज आहे आपल्यातला रावण ओळखण्याची...

१. काम - वासने आंधळे होणे
२. क्रोध - क्षुल्लक कारणावरून पेटून उठणे
३. लोभ - दुसऱ्याचे हिरावून घेण्याची इच्छा
४. मोह - माझं-माझं करत अडकून राहणे
५. मद - पैसा, पद, सौंदर्याचा गर्व
६. मत्सर - दुसऱ्याचे सुख पाहून जळणे
७. अहंकार - मीच बरोबर हा हट्ट
८. अन्याय - सत्य कळत असूनही खोट्याची बाजू घेणे
९. अमानवता - दुसऱ्याच्या दु:खाबद्दल संवेदनाहीन होणे
१०. स्वार्थ - फक्त स्वत:चा विचार करणे

विचार करा, यातला एक तरी रावण आपल्यात नाही का?

खरे रावण दहन कधी होईल?

जेव्हा आपण सोशल मीडियावर दुसऱ्याला ट्रोल करणे थांबवू तेव्हा मत्सराचा रावण जळेल. जेव्हा आपण मुलगी आणि मुलगा यांच्यात भेद करणार नाही तेव्हा अन्यायाचा रावण जळेल. जेव्हा आपण आई-वडिलांना वृद्धाश्रमात न पाठवता घरी सांभाळू तेव्हा स्वार्थाचा रावण जळेल. जेव्हा आपण लाच घेणे-देणे बंद करू तेव्हा लोभाचा रावण जळेल. बाहेरचा रावण जाळणे सोपे आहे, १० मिनिटात जळून खाक होतो. खरा संघर्ष आहे आतल्या रावणाला जाळणे. तो रोज जाळावा लागतो.

यंदाच्या दसऱ्याला पुतळ्यासोबत एक तरी दुर्गुण जाळण्याची प्रतिज्ञा करा. मगच होईल खरी विजयादशमी. रावण दहन नाही, रावण - वृत्ती दहन.

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

धम्म विजयापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेपर्यंत

प्रासंगिक



- डॉ. राजेंद्र बगाटे
(समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक)

मानवी इतिहासात काही घटना केवळ एखाद्या काळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना विचार करण्याची, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि नव्या समाजनिर्मितीची प्रेरणा देतात. सम्राट अशोकाचा धम्म विजय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धम्म हे भारतीय इतिहासातील असेच दोन महत्वपूर्ण संदर्भ आहेत. एका बाजूला युद्धातून झालेल्या विनाशाची जाणीव झाल्यानंतर सम्राट अशोकाने नैतिक मूल्यांना राज्यकारभाराच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला; तर दुसऱ्या बाजूला जातीय विषमता आणि अस्पृश्यतेच्या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग स्वीकारला. या दोन्ही ऐतिहासिक प्रवाहांचा केंद्रबिंदू माणसाचे कल्याण, करुणा, विवेक, समता आणि बंधुता हा आहे. धम्म विजयादशमीच्या निमित्ताने या विचारांचा मागोवा घेणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण करणे नव्हे, तर वर्तमानातील सामाजिक आव्हानांसमोर मानवी मूल्यांची भूमिका पुन्हा अधोरेखित करणे होय.

प्राचीन भारताच्या इतिहासात सम्राट अशोकाचे स्थान विलक्षण महत्वाचे आहे. मौर्य साम्राज्याचा विस्तार करणारा एक सामर्थ्यशाली शासक म्हणून त्याची सुरुवातीची ओळख होती. मात्र कलिंग युद्धानंतर त्याच्या जीवनदृष्टीत महत्वपूर्ण परिवर्तन घडले. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात झालेल्या या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. अनेक लोक मृत्युमुखी पडले, अनेकांना कैद करून नेण्यात आले आणि असंख्य कुटुंबांचे जीवन विस्कळीत झाले. युद्ध जिंकूनही त्यातून निर्माण झालेल्या दु:खाची आणि मानवी हानीची जाणीव अशोकाला झाली. त्याच्या तेराव्या प्रमुख शिलालेखात कलिंग युद्धाच्या परिणामांविषयी आणि त्यानंतर त्याला झालेल्या पश्चात्तापाविषयी उल्लेख आढळतो. या अनुभवाने विजयाच्या पारंपरिक संकल्पनेला प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. शत्रूच्या भूमीवर सत्ता मिळविणे हा विजय असू शकतो; परंतु त्या विजयासाठी असंख्य निरपराधांचे जीवन उद्ध्वस्त होत असेल, तर त्याचे नैतिक मूल्य काय, हा प्रश्न अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून पुढे येतो.

अशोकाने युद्धविजयापेक्षा धम्मविजयाला अधिक महत्त्व दिले. धम्मविजय म्हणजे केवळ सैन्याच्या सामर्थ्याने प्रदेश जिंकणे नव्हे, तर सदाचार, करुणा, सत्यनिष्ठा, सहिष्णुता आणि लोककल्याण यांच्या माध्यमातून माणसांची मने जिंकणे होय. या विचारात सत्तेच्या वापराला नैतिक जबाबदारीची जोड देण्यात आली. शासकाचे मोठेपण केवळ त्याच्या साम्राज्याच्या विस्तारावर किंवा सैन्याच्या सामर्थ्यावर अवलंबून नसून तो आपल्या प्रजेच्या जीवनात किती सुरक्षितता, न्याय आणि कल्याण निर्माण करतो, यावरही ठरते. अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून राज्यकारभाराच्या उद्दिष्टांकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित झाली. सत्ता ही लोकांवर वर्चस्व गाजविण्याचे साधन नसून लोकांच्या हितासाठी वापरली जाणारी जबाबदारी आहे, हा विचार त्याच्या ऐतिहासिक वारशाचा महत्वाचा भाग आहे.

सम्राट अशोकाने मांडलेला धम्म हा कोणत्याही एका धार्मिक समुदायापुरता मर्यादित नव्हता. त्यात आई-वडिलांचा आदर, वडीलधाऱ्यांशी सन्मानाने वागणे, सेवकांशी न्याय्य व्यवहार करणे, सत्य बोलणे, प्राणिमात्रांविषयी दया बाळगणे, आत्मसंयम राखणे आणि विविध धार्मिक परंपरांविषयी आदर ठेवणे अशा नैतिक मूल्यांना महत्त्व होते. वेगवेगळ्या विचारांचे आणि श्रद्धांचे लोक समाजात एकत्र राहतात, तेव्हा परस्परांचा अवमान करण्याऐवजी एकमेकांच्या मतांचा आदर करणे आवश्यक असते, अशी भूमिका अशोकाच्या शिलालेखांतून दिसते. आजच्या काळात धार्मिक, भाषिक, जातीय आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या भारतासाठी हा विचार विशेष महत्त्वाचा आहे. मतभिन्नता ही समाजजीवनाचा स्वाभाविक भाग आहे; मात्र मतभिन्नतेचे रूप द्वेष, हिंसा किंवा सामाजिक बहिष्कारात बदलू नये, यासाठी नैतिक विवेक आणि सहिष्णुता आवश्यक असते.

अशोकाच्या धम्मविजयाचा विचार त्याच्या लोककल्याणकारी कार्याशीही जोडलेला आहे. त्याच्या शिलालेखांत मानवांसाठी तसेच



प्राण्यांसाठी वैद्यकीय सुविधांची व्यवस्था, प्रवासमार्गांवर विहिरी आणि वृक्षारोपण, प्रशासकीय अधिकाऱ्यांना लोकांच्या हिताची काळजी घेण्याचे निर्देश अशा उपाययोजनांचे संदर्भ आढळतात. शासन आणि समाज यांच्यातील संबंध केवळ करसंकलन, कायदा आणि दंड यांपुरते मर्यादित नसावेत, तर लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हेही शासनाचे कर्तव्य असावे, अशी जाणीव या भूमिकेतून व्यक्त होते. अशोकाचा ऐतिहासिक अनुभव आजच्या प्रशासनालाही प्रश्न विचारतो. विकासाची मोजणी केवळ आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा किंवा सत्तेच्या विस्ताराने करायची की सामान्य माणसाला मिळणारे आरोग्य, शिक्षण, न्याय, सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यांनाही तितकेच महत्व द्यायचे, हा प्रश्न धम्मविजयाच्या विचारातून उपस्थित होतो.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेकडे पाहिले, तर भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासातील आणखी एक निर्णायक अध्याय समोर येतो. डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण जीवन जातीय विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्धच्या संघर्षाने व्यापलेले होते. शिक्षण, सार्वजनिक सुविधा, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत समान अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला. स्वत: उच्च शिक्षण प्राप्त करूनही जातीय पूर्वग्रहांमुळे अपमान सहन करावा लागल्याचा अनुभव त्यांच्या विचारविश्वाला आकार देणारा ठरला. त्यांच्या दृष्टीने जातिव्यवस्था ही केवळ व्यक्तींच्या वर्तनातील काही चुकीच्या सवयींची बाब नव्हती; ती समाजातील अधिकार, संधी, प्रतिष्ठा आणि मानवी संबंध यांची विषम विभागणी करणारी व्यवस्था होती. त्यामुळे समाजपरिवर्तनासाठी व्यक्तीच्या विचारांमध्ये आणि सामाजिक संस्थांच्या रचनेमध्ये दोन्ही स्तरांवर बदल घडविणे आवश्यक होते.

१९३५ मध्ये येवला येथे झालेल्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मात जन्मलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही, अशी ऐतिहासिक घोषणा केली. ही घोषणा केवळ भावनिक प्रतिक्रिया नव्हती, तर दीर्घकाळ केलेल्या सामाजिक निरीक्षणाचा, वैचारिक अभ्यासाचा आणि समतेच्या पर्यायी मार्गाच्या शोधाचा परिणाम होती. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास करून त्यांच्या तत्वज्ञानाचा आणि सामाजिक परिणामांचा विचार केला. माणसाला समान प्रतिष्ठा मिळते का, विवेकाला स्थान आहे का, अन्यायकारक रूढींना प्रश्न विचारता येतात का आणि समाजात बंधुता निर्माण करण्याची क्षमता आहे का, हे प्रश्न त्यांच्या विचारप्रक्रियेत महत्वाचे होते. बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा आणि समता या मूल्यांमध्ये त्यांना मानवी मुक्तीचा आणि सामाजिक परिवर्तनाचा आधार दिसला. त्यामुळे धम्मस्वीकार हा त्यांच्या आयुष्यातील स्वतंत्र धार्मिक निर्णय असण्याबरोबरच अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेविरुद्धचा विचारपूर्वक घेतलेला निर्णय होता.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्म विजयादशमी दिनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. भदंत चंद्रमणी यांनी त्यांना त्रिशरण आणि पंचशील दिले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली, तर या घटनेचे महत्व अधिक स्पष्ट होते. जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेच्या अनुभवातून बाहेर पडत मोठ्या संख्येने लोकांनी समान प्रतिष्ठा, विवेकनिष्ठ जीवन आणि बंधुत्वाच्या मूल्यांवर आधारित नवा मार्ग स्वीकारला. हा प्रसंग केवळ धार्मिक विधी नव्हता; तो आत्मसन्मानाचा सार्वजनिक आविष्कार आणि सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊल होते. दीक्षाभूमीवरील घटना आजही सामाजिक न्याय, स्वाभिमान आणि परिवर्तनाच्या आकांक्षेचे प्रतीक मानली जाते. धम्माचा स्वीकार म्हणजे केवळ नाव किंवा धार्मिक ओळख बदलणे नव्हे; तर विचार, वर्तन आणि सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडविण्याची बांधिलकी स्वीकारणे होय.

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

पैठणीची रेंज

- अरविंद शिंगाडे
खामगाव
मो. - ९४२३४४५६६८



'हॅलो..... म्याडम हायेत का ?
" हं हॅलो..... बोला. कोण बोलता तुम्ही ? "
"मी शांताराम बोलून रायलो बळळाऊन.
मले बोल्याचं होतं जरासक....
"कोणासोबत बोलायचं होतं ? "
"तुमी म्याडमच बोलून रायल्या ना ..... "
"हो, मी मॅडमच बोलते पण तुम्हाला कोणत्या मॅडमसोबत बोलायचं आहे ? "
"फोन तुमाले लागला तं तुमच्याचसंगं बोल्याचं अशीन कानी. तुमी गावातल्या मोठ्या शाळेतल्याच म्याडम व्हा ना.... "
"हो.... बोला काय काम होतं ? "
"म्हतलं म्याडम... परीक्शा कईपासून सुरु होतात लेकरायच्या ? "
"तशा तोंडी सुरु झाल्या आहेत. आता शाळा स्वच्छता अभियान पण सुरु आहे. "" उरे लेक! बरं मंग या लेकरायले जा नाई लागत का? हे तं म्हंतात घरी रायलं तं चालते. "
"कोणते मुलं ? ते कोणत्या वर्गात आहेत ? "
"हा आमच्या घरचा कचवारखाना..... माले अन मा भावाचे टोटल पाच हायेत म्याडम...."
"तेच विचारते, ते कोणकोणत्या वर्गात आहेत. "
"यक मिनिट म्याडम. इच्यासंगं बोला.... "
"ह्यालो म्याडम..... मी शकुंतला बोलून रायली. हे आमच्या घरचे लेकरं भलकशे काचाकिच्या करतात.

तं कईपासून पाठवाव म्हतलं त्यायले ?
"अगोदर मला सांगा ते कोणकोणत्या वर्गात आहेत ? ""अं..... घ्या लिऊन.

हे पा..... अक्शा दुसरीत होता करोनात शाळा बंद पळल्या ताहा.... अन पूजी तिच्या मामाच्या घरी गेलती तं तथीच अटकली होती यश्ट्या बंद पळल्या होत्या तं...."
"ते नाही. मला सर्वांचे वर्ग सांगा फक्त."
"हव ना....अन लायनी बालवाळीतच होती ताहा.""हे तीन झाले. बाकीचे दोन ? "
"ते माया देरानीचे हायेत..... कोकीळा वं.... तुई शकुली कोनत्या वर्गात हाये ?.....
आं. म्याडम ते लायन्या शाळेत होती म्हंते. अन तो मोठा वं....?"
"हे बघा ताई. आपल्या गावच्या शाळेत पाचवी ते दहावीचे वर्ग आहेत. त्यातल्या नववी, दहावीची तोंडी परीक्षा सुरू झाली."
" बरं बरं हे अक्शूच्या पप्पाले सांगा.मी कनीक भिजोताभिजोताच आलती "
"हलो. तं.... कसं कराव म्याडम मंग आता ? लय हन्न्यास आनला या लेकरायनं घरी....."
"अहो, शाळेला पूर्ण सुटी नाही. नवरात्रामुळे सकाळच्या सत्रात शाळा आहेत फक्त"
"देतो मंग सकायपासून धाळून म्याडम. अन ते सहीचं म्हने बॉ अक्श्या..."
"एक नमुना आम्ही पाठवला आहे,तो सही करून पाठवा."
"बरं मंग या लायन्या पोट्ट्यायच्या कई होतीन परीक्शा चालू ? "
"त्यांच्याही उद्यापासून तोंडी होतील सुरु. अजून काही विचारायचं होतं का ? ""तं म्हतलं म्याडम.....

यंदा पोरायच्या सहलीचं कसं राहीन ? ""तेच संमतीपत्र दिलं आहे सहीसाठी. दिवाळीच्या सुट्या संपल्या की निकाल अन नंतर सहल... ""तेच ना.


लेकरायचं नुस्कान नाई झालं पायजे म्याडम. बाकीचे गुर्जीलोकं हायेत शाळेत ?""हो. काही काम होतं का तुम्हाला कोणासोबत ? ""नाई, येरीच आपलं. म्हतलं का गेले बॉ प्रचाराले ? "
"नाही, उमेदवारच येत आहेत आमच्याकडे.बरं ठेवू का मी फोन आता ?""यकच मिनिट म्याडम..... "
"बोला पटकन....मला कामं आहेत. ""तुमची निवळनूक हाये म्हंतात ना काय ? "
"हो.... शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदान आहे परवा.""उरे लेक. तं तुमाले पैठन्या अन पाकीटं भेटले म्हंतात ना.....पेपरात वाचलं ब्वॉ.तुमाले कोनत्या कलरची भेटली म्याडम ?अक्श्याची मम्मी इच्यारे.... "
"हॅलो.....आवाज कटतो तुमचा.....अक्षयला उद्यापासून पाठवून द्या शाळेत.""रेंज गेली वाट्टे म्याडमची अन पैठनीची....."

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

दैनिक महाभूमि

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८
पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148** **POSTAL NO.BLD/239/2025-27**



छत्रपती
संभाजीनगर भूमि

मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ mahabhoomimarathwada@gmail.com

न्यूज ब्रीफ

ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी नरेंद्र दुनगहु यांची निवड



जाफ्राबाद : तालुक्यातील शिराळा येथील नरेंद्र संजय दुनगहु याने १६ वर्षांखालील गटातील गोळाफेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या निवड चाचणीत त्याने ही कामगिरी केली. येत्या १४ व १५ नोव्हेंबर रोजी हैदराबाद येथील वॉक्सेन युनिव्हर्सिटीमध्ये राष्ट्रीय स्पर्धा होणार आहे. नरेंद्र दुनगहु यांना हर्षल कळवागे, प्रशिक्षक गौरव रायलकर यांनी मार्गदर्शन केले. नरेंद्र दुनगहु यांच्या यशाबद्दल माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार संतोष पाटील दानवे यांनी कौतुक केले आहे.

बनेवाडीत तलवारीने हल्ला; एकजण गंभीर

छत्रपती संभाजीनगर : बनेवाडी परिसरातील महापालिका शाळेजवळ दुचाकीवरून आलेल्या दोघांनी राजमोहम्मद हबीबुद्दीन शेख (५६ वर्ष), रा. बनेवाडी यांच्यावर लोखंडी रॉड आणि तलवारीने हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सव्वासहा वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी राजमोहम्मद शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सातारा पोलीस ठाण्यात हल्लेखोरांविरुध्द १६ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नायगाव किल्ल्यावर स्वच्छता अभियान

वरठाण : सोयगाव तालुक्यातील नायगाव किल्ल्यावर वाडी नायगाव येथील शिवप्रेमींनी स्वच्छता अभियान राबविले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरू झालेल्या या अभियानात ३० तरुण सहभागी झाले होते. खुरपे, टिकाव आणि कोयत्यांच्या साहाय्याने किल्ला परिसरातील वाढलेली झाडे-झुडपे काढून पाण्याची टाकी स्वच्छ करण्यात आली.

जिल्हाधिकारी विनय गौडा यांचे आढावा बैठकीत आदेश

'दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती द्या'

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन उपलब्ध जलस्रोतांचे बळकटीकरण करावे. प्रत्येक गावात १०० जलतारा कामांचे नियोजन करून त्याबाबतचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. गावनिहाय आवश्यक जलसंधारण कामांची निश्चिती करून त्यांच्या अंमलबजावणीला गती द्यावी, असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली मृद् व वजलसंधारण विभागाच्या कामांचा तसेच दुष्काळसदृश परिस्थितीच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, रोहयोचे उपजिल्हाधिकारी रुपेश शिंगारे, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र कटके, प्रभारी उपवनसंरक्षक सुवर्णा माने, कृषी विभागाचे दीपक गवळी यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी गौडा पुढे म्हणाले की, दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करता जलसंधारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाची भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध जलस्रोत आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन कोणत्या गावात कोणत्या योजनेअंतर्गत कामे करता येतील, याचे नियोजन करावे. यासाठी संबंधित विभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करावे अशा सुचना त्यांनी यावेळी दिल्या.

जलसंधारण विभागाकडील उपलब्ध यंत्रसामग्रीचा स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून उपयोग करून जलसंधारणाची कामे राबविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. स्वयंसेवी संस्थांच्या जलसंधारणविषयक उपक्रमांना प्रशासनामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जलतारा कामांचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने तयार करावेत. प्रशासकीय मान्यतेची स्थिती तपासून संबंधित विभागांनी आवश्यक प्रस्ताव सादर करावेत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याच्या शक्यता तपासाव्यात. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत गावपातळीवर लोकसहभागातून जलसंधारणाची कामे राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी गौडा यांनी दिल्या आहेत.

तलावातील गाळ काढण्याच्या कामास प्राधान्य

- गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेचा ३ हजार ३१४ शेतकऱ्यांना लाभ घेतला आहे. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ३०२ गावांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून, त्यापैकी २३७ गावांतील कामे पूर्ण झाली आहेत. या योजनेचा आतापर्यंत ३ हजार ३१४ शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. उर्वरित कामांना गती देऊन पाझर तलावांमधील गाळ काढण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिले आहेत.

कर्णपुरा यात्रेत उसळला भाविकांचा 'जनसागर'

देवीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

शहराचे ग्रामदैवत असलेल्या कर्णपुरा येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. कर्णपुरा देवीच्या यात्रेनिमित्ताने मंदिर परिसरात यात्रा भरली असून रात्री उशिरापर्यंत भाविक यात्रेत विविध खाद्यपदार्थ आणि जत्रेत लावण्यात आलेल्या खेळण्यांचा आनंद लुटत होते.

कर्णपुरा येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवरात्र उत्सवाला रविवार, ११ ऑक्टोबर रोजी पासून सुरुवात झाली. मंदिर संस्थापक अध्यक्ष तथा आ. अंबादास दानवे यांच्या हस्ते कर्णपुरा माता मंदिरात विधिवत घटस्थापना करण्यात आली होती. गेल्या आठ दिवसापासून सुरु असलेल्या कर्णपुरा यात्रेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह जालना, अहिल्यानगर, जळगाव आदी जिल्ह्यांसह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येत आहेत. दरम्यान, रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सुटी आल्याने रात्री उशिरापर्यंत लाखो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले असल्याची माहिती कर्णपुरा मंदिर देवस्थानाच्या विश्वस्तांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी विद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात

सावळदबारा / प्रतिनिधी



सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिका देवी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत तालुक्यातील एकूण १९ संघांनी सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या गटात संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाने, तर मुलांच्या गटात जे. एम. एस. महाविद्यालय, बनोटी येथील संघाने विजेतेपद पटकावले. स्पर्धेचे उद्घाटन केंद्रप्रमुख रईस शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जय कालिका देवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भावराव कोलते पाटील, माजी प्राचार्य नारायण कोलते, संस्थेच्या सचिव रत्ना कोलते, निलेश गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जीवन कोलते पाटील, व्ही. पी.पाटील, क्रीडा शिक्षक डॉ. जयराम घोती, विजय सिंह राजपूत, भास्कर खामाट, सुदाम राठोड यांनी प्रयत्न केले.

शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी

छत्रपती संभाजीनगर : सोहेल सर यांच्याविरोधात तक्रार का करता, अशी विचारणा करत जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास घडली. निलेश गणेश ऊर्फ घनश्याम फुलवाणी (३९ वर्ष), रा. शहाबाजार, अशोकनगर यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. नुजरत खान असे आरोपीचे नाव आहे. फिर्यादी आणि आरोपी गेल्या १० ते १५ वर्षांपासून एकमेकांच्या परिचयाचे आहेत. सोहले सर यांच्याविरोधात तक्रार का करता, अशी विचारणा केल्याचा राग आल्याने आरोपीने फिर्यादीला जातीचा उल्लेख करून अपमानास्पद शिवीगाळ केली.

पैठणमध्ये कासार समाजाच्या वतीने 'कालिका देवी मंदिर' उभारणार

पैठण / प्रतिनिधी



शहरात कासार समाजाच्या वतीने भव्य कालिका देवी मंदिराची उभारणी करण्यात येणार असून, या धार्मिक प्रकल्पासाठी आमदार विलास भुमरे यांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. मंदिर उभारणीसाठी समाजाच्या वतीने स्वतंत्र जागा खरेदी करण्यात आली असून, लवकरच भूमिपूजन करून बांधकामाला सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

मंदिर प्रकल्पाची माहिती देण्यासाठी कासार समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी व समाजबांधवांनी आमदार विलास भुमरे यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी समाजाच्या वतीने मंदिर उभारणीचे नियोजन आणि पुढील कार्यवाहीची माहिती देण्यात आली. त्यावर आमदार भुमरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मंदिर उभारणीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या भेटीदरम्यान जिल्हा दूध संघाचे संचालक नंदलाल काळे, नगराध्यक्ष भूषण कावसानकर, नगरसेवक सुनील रासणे, शेखर शिंदे, गटनेते ईश्वर दगडे, नगरसेवक संजय वरकड, महेश रासने, ऋषी तांबटकर, राजू अंदुरे, ऋषिकेश रासने, नंदकुमार रासने, प्रमोद रासने, येण्डे गुरुजी, किशोर रासने, विकी दहिभाते, निलेश पानपट, ऋषी दहिभाते, गणेश अंदुरे, भारत दगडे आणि विश्वेश रासने आदींची उपस्थिती होती.

नागेश्वर विद्यालयात ग्रामीण सामान्यज्ञान स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

नागापूर / प्रतिनिधी



नागेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नागेश्वर विद्यालयात स्वातंत्र्यसैनिक तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. यादवराव लहानुजी तायडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित तालुकास्तरीय ग्रामीण सामान्यज्ञान स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तर सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव उदय तारडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थाध्यक्ष मंगेश तायडे, संचालक काशिनाथराव मोहिते व अमोल तायडे, पिशोर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्याम गवळी, सरपंच डॉ. योगेश तायडे, अनिल माळी, बाबुराव सोनवणे, केंद्रप्रमुख राहुल इंगोले, वासडी केंद्रप्रमुख जगताप, मुख्याध्यापक संदीप जाधव व अमोल गौर उपस्थित होते. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञानाची आवड निर्माण करणे, स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता वाढवणे आणि त्यांच्या बौद्धिक क्षमतेला वाव देणे, हा स्पर्धेचा उद्देश होता. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. राजेंद्र बेडवाल, दत्तात्रय महाजन, सुदाम वाघ, मातेरे, राजरत्न शेजवळ आदींची उपस्थिती होती.

विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

वैजापूर : विहिरीत पडून ताराबाई कैलास सूर्यवंशी (६५ वर्ष), रा. मनोली, ता. वैजापूर या महिलेचा मृत्यू झाला. ही घटना वैजापूर तालुक्यातील मनोली येथे रविवार, १८ ऑक्टोबर रोजी घडली. ताराबाई सूर्यवंशी यांचा मृतदेह विहिरीत मिळून आला. नातेवाईकांनी मृतदेह पाण्याबाहेर काढुन शिवूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केला असता, वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. त्या विहीरीत कशा पडल्या हे समजू शकले नाही. याप्रकरणी शिवूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार राहुल थोरात हे करीत आहेत.

पथनाट्यातून विद्यार्थ्यांनी केली पदवीधर मतदार जनजागृती

सोयगाव / प्रतिनिधी



आगामी पदवीधर मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने सोयगाव स्वीप कक्षामार्फत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी मतदार जनजागृती गीत व पथनाट्य सादर करून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदर, सोयगावचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक किरणकुमार पाटील, शिक्षिका मंगला बोरसे यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला. सोयगाव तहसील कार्यालयात कृषी व महसूल विभागातील पदवीधर मतदार कर्मचाऱ्यांच्या बैठकीदरम्यान तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विद्यार्थ्यांनी गीत व पथनाट्याच्या माध्यमातून मतदार जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गीत व पथनाट्यातून मतदानाचे महत्त्व, पदवीधर मतदार नोंदणी आणि लोकशाही प्रक्रियेत मतदारांचा सक्रिय सहभाग याविषयी प्रभावी संदेश देण्यात आला. यावेळी सोयगाव तालुक्याचे गटविकास अधिकारी शिवाजी यमुलवाड, तालुका कृषी अधिकारी भारत कासार, नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांच्यासह कृषी विभाग व तहसील कार्यालयातील पदवीधर मतदार कर्मचारी उपस्थित होते.

व्हॉट्स ॲपवर पोस्ट केल्याने मारहाण

वैजापूर : व्हॉट्स ॲपवर जमीन वाटपाबाबत पोस्ट का टाकली, असा जाब विचारत एका व्यक्तीला मारहाण करून जखमी केल्याची घटना वैजापूर तालुक्यातील कनकसागज येथे शनिवारी घडली. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमीन वाटपाच्या विषयावरून पोस्ट टाकल्याच्या कारणावरून आण्णासाहेब धारबळे यांना पाच जणांनी मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले. या प्रकरणी आण्णासाहेब चंद्रहंस धारबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाच जणांविरुद्ध विरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार जाधव हे करीत आहेत.

पाण्याअभावी फळबागा सुकू लागल्या; शेतकरी आर्थिक अडचणीत

दुष्काळाच्या झळा : चार एकर केळी पिकांवर फिरवला ट्रॅक्टर

वरठाण / प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह सोयगाव तालुक्यातील दुष्काळाचा चांगलाच फटका बसला आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यातच वरठाण परिसरातील विहिरींनी आणि बोअरवेलने तळ गाठला आहे. पाण्याअभावी फळबागा सुकू लागल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पाणीच उपलब्ध नसल्याने तिडका शिवारात एका शेतकऱ्याने चार एकर क्षेत्रावर लावलेल्या केळी पिकांवर ट्रॅक्टर फिरवन केळीची बाग उध्वस्त केली.

सोयगाव तालुक्यातील तिडका शिवारात गट क्रमांक ६ मध्ये दिनेश जाधव यांनी खरीप हंगामात केळी पिकाची लागवड करुन नाविन्यपूर्ण प्रयोग राबविला होता. पावसाळ्यात चांगला पाऊस होईल या उद्देशाने जाधव यांनी जुलै महिन्यात केळीची लागवड केली होती. परंतु ऑगस्ट महिन्यापासूनच पावसाने खंड दिल्याने त्यांनी विहिरीत उपलब्ध असलेल्या पाण्यावर केळीची वाढ केली. तब्बल तीन महिने पाणी पुरवून ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यातच विहिरीतील पाणी साठा संपत आल्याने दिनेश जाधव अडचणीत सापडले होते. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात उन्हाच्या तिव्रतेने केळीची बाग सुकू लागल्याने दिनेश जाधव यांच्या चिंतेत अधिकच वाढ झाली होती.

दरम्यान, तब्बल तीन महिने पावसाने ओढ दिल्याने तसेच विहिरीतील पाणी आटल्याने केळीची बाग डोळ्यादेखत सुकू लागल्याने दिनेश जाधव यांना केळीची बाग जगविणे कठीण झाले होते. डोळ्यादेखत केळीची बाग सुकत चालल्याने दिनेश जाधव यांनी चक्क चार एकर केळीच्या बागेवर ट्रॅक्टर फिरवून केळीची बाग उध्वस्त केली.

रब्बीच्या हंगामात नवीन प्रयोग करणार

- तीन महिने तळ हाताच्या फोडा प्रमाणे केळीची बाग जपली होती. परंतु उन्हाची वाढती तीव्रता आणि विहिरीतील तळ गाठलेले पाणी यामुळे पुन्हा पाच महिने या बागा जगविणे कठीण झाले होते. त्यामुळे केळीची बाग उध्वस्त करून रब्बीच्या हंगामात नवीन प्रयोग करणार असल्याचे तिडका येथील शेतकरी दिनेश जाधव यांनी सांगितले.



सरकारी मदत कागदावरच; शेतकऱ्यांच्या खात्यात निधी कधी ?

पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी

राज्यात पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, सोयाबीन उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. काही भागांत एकरी अवघे एक ते दोन क्विंटल सोयाबीन उत्पादन होण्याची शक्यता असल्याने शेतीचा खर्चही निघणे कठीण झाले आहे. त्यातच सरकारी मदतीचे हप्ते आणि अनुदान रखडल्याने शेतकऱ्यांची कोंडी वाढली आहे.

बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च करूनही उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. कर्जफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि आगामी हंगामाची तयारी यांचा खर्च भागवायचा कसा, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. नमो शेतकरी महासन्मान योजनेचे दोन हप्ते, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतील मदत आणि मागील वर्षीच्या अतिवृष्टी पॅकेजचा निधी रखडल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. नुकसानभरपाईची प्रक्रिया गतिमान करून रखडलेले हप्ते व मंजूर अनुदान तातडीने खात्यात जमा करावे, अशी मागणी होत आहे. घोषणांपेक्षा प्रत्यक्ष मदतीची गरज असून, शेतकऱ्यांच्या खात्यात निधी कधी जमा होणार, याची निश्चित मुदत शासनाने जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष काकासाहेब साबळे यांनी केली.

न्यूज ब्रीफ

डॉ. शोहेब खान यांची निवड



धावडा : येथील डॉ. शोहेब खान अय्युब खान पठाण यांची समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. डॉ. शोहेब खान यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. डॉ. शोहेब खान अय्युब खान पठाण यांची समुदाय आरोग्य अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल मजहर पठाण यांनी कौतुक केले आहे.

क्रांतीचौकात वृद्धाला लुटले

छत्रपती संभाजीनगर : बँकेतून काम आटोपून घराकडे रिक्षाने परत जात असलेल्या पंडित लक्ष्मण गटोरसिंग (७६ वर्ष), रा. फकारवाडी, हर्सूल या वृध्दाच्या पॅन्टचा खिसा कापून चोरट्यांनी १२ हजार रुपये लंपास केले. ही घटना शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी दुपारी मोंढा नाका परिसरातील अमरप्रीत हॉटेलसमोरील सम्राट अशोक चौकात घडली. याप्रकरणी पंडित गटोरसिंग यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चोरट्याविरुध्द क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस अंमलदार मुदिराज करीत आहेत.

दुष्काळाच्या छायेत झेंडूचे मळे : हुकमी पिकाला पाणी मिळेना

विजयादशमीच्या मुहूर्तावर झेंडूच्या फुलांचे भाव गडगडले; बळीराजासमोर आर्थिक संकट

भोकरदन / प्रतिनिधी

साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या विजयादशमीच्या (दसरा) सणावर यंदा पाणीटंचाईचे आणि भीषण दुष्काळाचे काळे ढग दाटले आहेत. ऐन सणाच्या तोंडावर झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर घटल्याचे चित्र पाहायला मिळाले. पावसाअभावी आणि सिंचनाच्या अपुऱ्या साधनांमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला.

सुरुवातीला फुलांना चांगला भाव मिळेल अशी अपेक्षा होती, मात्र आता प्रत्यक्ष बाजारात चित्र पूर्णपणे बदलले आहे. व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्याच्या बागेपासून ते थेट शहरात माल आणण्यापर्यंत प्रति किलो ३,८०० रुपयांपर्यंत (किंवा घाऊक खर्च) पडत आहे. आवक जरी कमी असली, तरी भावाच्या बाबतीत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. मार्केटमध्ये रविवारी रात्री झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर झाली. परंतु सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी झेंडूचे भाव गडगडले असल्याचे चित्र दिसून आले. सध्या बाजारात झेंडूचे भाव ५० ते ६० रुपयांच्या आतच आहेत. उत्पादनात झालेली प्रचंड घट आणि पडलेले भाव पाहता, या दुष्काळी परिस्थितीने बळीराजाचे कंबरडे मोडले आहे.



आवक वाढल्याने भाव कोसळले

■ आलापूर येथील अडत व्यापारी मुबारक शाह म्हणाले, शेतकऱ्याच्या बागेतून शहरात माल आणण्यापर्यंत आम्हाला ३ हजार ८०० रुपयांपर्यंत खर्च पडला आहे. आवक जरी कमी असली, तरी भावाच्या बाबतीत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. जर मार्केटला सोमवारी रात्री आवक भरपूर झाली, तर आज भाव आणखी कमी होऊ शकतात; सध्या झेंडूच्या फुलांचे भाव ५० ते ६० रुपयांच्या आतच असल्याचे त्यांनी सांगितले.

झेंडूच्या फुलाशिवाय पूजा अपूर्ण

■ बाजारात खरेदीसाठी आलेल्या गृहिणी सुवर्णा सूर्यवंशी यांनी म्हटले, दसरा आणि आता दिवाळीचा सण जवळ आलाय. झेंडूच्या फुलाशिवाय सणाची पूजा अपूर्ण असते; पण महागाईचा आणि दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्याचा फटका थेट सणासुदीच्या आनंदाला बसला आहे. सध्या तालुक्यात हाच विषय चहाच्या टपरीवर आणि पारावर चर्चेचा ठरत असून, फुलांचे पडलेले भाव आणि दुष्काळामुळे शेतकऱ्याची दिवाळी गोड होणार का ? हा यक्षप्रश्न सर्वांच्या तोंडी असल्याचे सुवर्णा सूर्यवंशी यांनी सांगितले.

यंदाची दिवाळी आमच्यासाठी अंधारातच

■ मासनपुर परिसरातील शेतकरी अरुण नंदकिशोर राऊत सांगतात, दिवाळी तोंडावर आली आहे, लेकरांना काय नवीन कपडे घ्यायचे ? हातात चार पैसे मिळावेत म्हणून जीवाचं रान करून झेंडू लावला; पण पाण्याअभावी बागा जळून खाक झाल्या. त्यात आता बाजारात भावही गडगडून ५० ते ६० रुपयांवर आले आहेत. मोजकाच माल निघाल्यामुळे आमचा झालेला खर्च सुद्धा निघाला नाही. यंदाची दिवाळी आम्हाला अंधारातच साजरी करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दसरा सणालाच झेंडूच्या फुलाचे भाव कोसळल्याने पुढील दिवाळीचा सण कसा साजरा करावा असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. झेंडूची फुल शेती केल्यामुळे दसरा आणि दिवाळीच्या काळात हाताशी चार पैसे खुळखुळतील आणि लेकराबाळांना नवे कपडे घेता येतील या अपेक्षेने शेतकऱ्यांनी अंगावरील घाम गाळून झेंडूची बाग फुलवली होती. मात्र, निसर्गाच्या लहरीपणाने आणि पाण्याची थेंब-थेंब महिनाभर मोजावी लागल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण गणित कोलमडले आहे.

'नवदुर्गा' : शेती अन् मोलमजुरीच्या कष्टांतून घडवले तहसीलदार

अकोलादेवच्या सविता सवडे यांचा प्रेरणादायी प्रवास

नवरात्र विशेष

अकोलादेव / प्रतिनिधी



कोळशातून हिरा जन्माला येतो, आणि मातीतूनच सोन्याचे पीक वर येते, याचीच प्रचिती देणारी ही कहानी आहे. आई थोडी शिकलेली, वडील निरक्षर, घरात अठरा विश्व दारिद्र्य आणि पोटाची खडखड... अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत अकोलादेव येथील एका जिद्दी माऊलीने आपल्या मुलाला थेट तहसीलदार पदावर पोहोचवले आहे. सविता केशवराव सवडे असे या संघर्षयोद्धा माऊलीचे नाव असून, त्यांनी आपल्या कष्टाच्या जोरावर समाजासमोर एक नवा आणि दीपस्तंभासारखा आदर्श ठेवला आहे.

सविता सवडे यांच्या संसाराची गोष्ट तशी अगदी साधी, पण अंगावर काटा आणणारी आहे. घरात शिक्षणाचा फारसा वारसा नाही; साक्षरतेच्या नावाखाली केवळ आईचे थोडेफार शिक्षण आणि वडील पूर्णपणे निरक्षर. पोटाची खळगी भरण्यासाठी शेती आणि लोकांच्या शेतात राबून मोलमजुरी करणे हाच त्यांचा नित्यक्रम.

अंगावर घामाचे पाट वाहत असताना, जगण्याचा प्रत्येक दिवस हा जणू एक परीक्षाच होता. आपल्या वाट्याला गरिबी आली, पण ती मुलांच्या वाट्याला येता कामा नये, हा एकमेव निर्धार सविता सवडे यांच्या डोळ्यांत होता.

कष्टाचे पांग मुलाने फेडले

■ आईच्या हातातील नागडट कामे, वडिलांचे कष्टाचे ओझे आणि गरिबीचे चटके सहन करत वाढलेल्या त्यांच्या मुलानेही आईच्या कष्टाची एकएक ओंजळ टीपली. आईच्या डोळ्यांतील अश्रू आणि राबणाऱ्या हातांचे चीज करण्यासाठी त्याने शिक्षणाला आपले हत्यार बनवले. अतोनात अभ्यास, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्याने अधिकारी पदाला गवसणी घातली आणि आईच्या कष्टाचे सोने केले. जेव्हा मुलगा तहसीलदार झाल्याची बातमी आली, तेव्हा सविता सवडे यांच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू अनावर झाले. तो केवळ एका मुलाचा विजय नव्हता, तर एका सामान्य माऊलीच्या वर्षानुवर्षे चाललेल्या संघर्षाचा तो सर्वोच्च गौरव होता.

समृद्धी महामार्गावरील जांबरगाव टोलनाक्यावर कंटेनर आडवा

वैजापूर / प्रतिनिधी

आरटीओ अधिकाऱ्यांनी २० किलोमीटर पाठलाग करुन गाडी पकडली.तसेच मारहाण केल्याचा आरोप करत एका कंटेनर चालकाने समृद्धी महामार्गावरील जांबरगाव टोलनाक्यावर कंटेनर आडवा लावल्याची घटना शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे महामार्गावरील वाहतूक सुमारे ४५ मिनिटे विस्कळीत झाली.

घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत कंटेनर आणि चालकाला ताब्यात घेतले. या घटनेमुळे टोलनाक्यावर काही काळ वाहतुकीचा खोळंबा



झाला. कंटेनर क्रमांक (युपी-७२-सीटी-७७८६) हा नागपूर येथून छत्रपती संभाजीनगर कडे जात होता. दरम्यान, संबंधित कंटेनरच्या नंबर प्लेटवर चारही बाजूंनी रंग मारलेला होता. तसेच चालक चुकीच्या लेनमधून वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कंटेनरचा पाठलाग करण्यात आल्याचे आरटीओ अधिकारी संदीप निमसे यांनी सांगितले. समृद्धी महामार्गाचे सुरक्षा पर्यवेक्षक कृष्णा बढे यांनी घटना स्थळी जाऊन परीस्थीती नियंत्रणात आणली.

बालनाटिका, गरबा-दांडियाने भायडी शाळेत रंगली आनंदाची मैफल

पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी

भायडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आनंददायी शनिवार व दफ्तरमुक्त शाळा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.


इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी 'कबूतर आणि मुंगी' ही बालनाटिका सादर केली, तर याप्रसंगी शिवांश श्रीराम जंजाळ 'भाज्यांची शाळा' या गीतावर कृतीयुक्त नृत्य सादर केले.



याचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गरबा-दांडियाचा आनंद लुटला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो, असे मुख्याध्यापक सुरेश इंगळे यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवाजी देशमुख, के. डी. वाघ, अंजना बोर्डे, मंदा दळवी, के. टी. दांडगे आणि जयश्री बोर्डे यांनी परिश्रम घेतले.

भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती नुकतीच मराठवाड्यात उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने विविध शाळा, महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध महापुरुषांच्या जीवनावरील पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे वाचली.

मत्स्योदरी महाविद्यालयात डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांना अभिवादन

अंबड : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणादिन उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा डॉ.शैली आस्ताना, सुनिल चव्हाण, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. राम रौनेकर, डॉ.दत्ता घोगरे, कार्यक्रम अधिकारी डॉ.रविराज कटारे, प्रा.रवींद्र पैठणे, प्रा.जानकी कुर्तडीकर, प्रा.संपत पवार, प्रा.पुनम ज्यामधरे, डॉ. कृष्णा नागवे, डॉ.जितेंद्र वाघुंडे, प्रा.शितल कोकाटे, प्रा.स्नेहा सुळे आदींची उपस्थिती होती.

मनपा मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या मुख्यालयात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मनपाचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, उप आयुक्त अंकुश पांढरे, विकास नवाळे, सविता सोनवणे, अभय प्रामाणिक, कार्यकारी अभियंता मोहिनी वारभुवन, सांस्कृतिक अधिकारी सर्वेश नांद्रेकर, जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद आदींची उपस्थिती होती. यावेळी मनपा वाचनालयाचे जुन्या सभासदांचा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



दिपभारती विद्यालय, धावडा



धावडा : वडोद तांगडा येथील दिपभारती विद्धायालयात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. टी कर्वे यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शाहेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना विविध पुस्तके, चरित्रग्रंथ, कथा आणि ज्ञानवर्धक साहित्याचे वाचन करण्यास प्रोत्साहित करण्यात आले. पुस्तक हे ज्ञानाचे भांडार असून वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकास, भाषिक कौशल्य आणि कल्पनाशक्तीला चालना मिळते, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर : माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

छत्रपती संभाजीनगर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम जयंतीनिमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीत अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



याप्रसंगी प्रकुलगुरू डॉ.प्रविण वक्ते, कुलसचिव डॉ.संजय कवडे, अधिष्ठाता डॉ.भास्कर साठे, संचालक डॉ.हिंम्मतराव जाधव, डॉ.अश्विन रांजणीकर, डॉ.सुभाष चव्हाण, डॉ.प्रशांत अमृतकर, डॉ.बी.एन.डोळे, डॉ.कैलास अंभुरे, उपकुलसचिव डॉ.गणेश मंझा, डॉ.संजय शिंदे, माधव वागतकर यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

महालगाव येथे महिलेला काठीने मारहाण

वैजापूर : तालुक्यातील महालगाव येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून एका महिलेला काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना मंगळवार, १३ ऑक्टोबर रोजी घडली. या प्रकरणी चार जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनिता दयाराम दळवी व संजु हिंमतलाल मोरे यांचा जुना वाद आहे. या जुन्या वादातून दळवी आणि मोरे यांच्या मध्ये वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी महिलेला काठीने मारहाण करण्यात आल्याने ती जखमी झाली. या प्रकरणी सुनिता दळवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संजू मोरे, अशोक मोरे, कलाबाई हिंमतलाल मोरे, मिना कैलास मोरे, रा. महालगाव, ता. वैजापूर या चार जणांविरुद्ध विरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार मनोज कुलकर्णी हे करीत आहेत.

हॉरिझन किड्स इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश



परभणी / प्रतिनिधी

शहरातील सहकार नगर परिसरातील प्रभावती दुर्गा नवरात्र मंडळात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत हॉरिझन किड्स इंग्लिश स्कूलच्या विदयार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करीत स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी केली.

शहरातील सहकार नगर परिसरातील प्रभावती दुर्गा नवरात्र मंडळात नवरात्रोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत हॉरिझन किड्स इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी शिवन्या देशमुख, पृथ्वी खिल्लारे, शिवराज डोंगरे, अन्वी राऊत, वैष्णवी पारवेकर, मैथिली देशमुख, श्रावणी नाईक, मोक्ष नीसगान यानी पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदवत स्पर्धेचे मानकरी ठरले. नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत उल्लेखनियक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष देशमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

जलसेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जलजागृती



पैठण / प्रतिनिधी

तालुक्यातील विहामांडवा येथील ज्ञानदीप विद्यामंदिर व उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'जलसेवा संकल्प अभियान२०२६' अंतर्गत चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचत, जलसंवर्धन, पाण्याची गुणवत्ता आणि सिंचन व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाला जायकवाडी पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता दीपककुमार डोंगरे, शाखाधिकारी गणेश मुंढे, विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. डी. पाटील, जलसंपदा विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पाणी बचत, जलसंवर्धन, जलप्रदूषण रोखणे आणि सिंचनाच्या पाण्याचे महत्त्व या विषयांवर चित्रांच्या माध्यमातून संदेश दिला. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पाण्याचे मानवी जीवनातील महत्त्व, पाण्याचा अपव्यय टाळण्याचे उपाय आणि उपलब्ध जलसंपत्तीचा योग्य वापर यावर प्रभावी विचार मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अभिजीत सोनवणे, रोशन जाधव, कृष्णा खंड, किशोर डुकरे, ईश्वर जारवाल, बाळकृष्ण मिसाळ, कल्याणी घोगरे, अभिजीत राजपूत, राहुल बुधवंत, संतोष पांडव आणि निलेश ताडे यांनी योगदान दिले.

चोरट्याने मंगळसूत्र हिसकावले



छत्रपती संभाजीनगर : मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या लता उत्तमराव जाधव (६५ वर्ष), रा. प्लॉट क्रमांक १०, गट क्रमांक १४०, सातारा परिसर यांच्या गळ्यातील मिनी मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जबरीने हिसकावून पळ काढला. यावेळी झालेल्या झटापटीत महिला खाली पडल्याने त्यांच्या डाव्या खांद्याला दुखापत झाली. ही घटना १४ ऑक्टोबर रोजी सकाळी सातारा परिसरात घडली. याप्रकरणी लता जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मंगळसूत्र चोरट्याविरुध्द सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक भंडारे करीत आहेत.

न्यूज ब्रीफ

खत खरेदीसाठी डिजिटल प्रणाली

गडचिरोली : रब्बी हंगाम २०२६ मध्ये जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून 'एफएफएस' डिजिटल प्रणाली लागू होणार आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे अनुदानित खतांचे ऑनलाइन बुकिंग करता येईल. गुगल प्ले स्टोअरवरून ॲप डाउनलोड करून जमीन व पिकांची माहिती नोंदवावी. बुकिंगनंतर तीन दिवसांत क्यूआर कोड दाखवून अधिकृत कृषी सेवा केंद्रातून खत खरेदी करता येईल. अडचणींसाठी गुणनियंत्रण निरीक्षक किंवा तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी अधिकाऱ्यांनी केले आहे.

चाऱ्यासाठी कुटार राखीव

अकोला : संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सुधारित आदेश जारी केला आहे. सोयाबीन व तुरीचे कुटार प्रामुख्याने जनावरांसाठी राखीव राहणार आहे. शेतकऱ्यांनी पशुपालकांना प्राधान्य देऊन उर्वरीत कुटार उद्योगांना विकावे. बायोमास उद्योगांना दैनंदिन आवकीतील किमान ५० टक्के साठा स्थानिक शेतकऱ्यांसाठी राखावा लागेल. तीव्र टंचाईत संपूर्ण साठा प्रशासनाला उपलब्ध करावा लागेल. अवैध वाहतूक व साठेबाजी रोखण्यासाठी भरारी पथके तैनात केली असून उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई होणार आहे.

बालकांना दत्तक घेण्याचे आवाहन

अकोला : अनाथ, निराधार आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना कौटुंबिक आधार मिळावा, यासाठी दत्तक प्रक्रिया राबविण्यात येते. इच्छुक दाम्पत्यांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी केले आहे. बाल न्याय अधिनियम व दत्तक नियमावली नुसार प्रक्रिया होते. अर्जानंतर गृहअभ्यास अहवाल ६० दिवसांत तयार केला जातो. माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष किंवा उत्कर्ष शिशुगृह, अकोला येथे संपर्क साधावा.

ग्रंथांच्या यादीवर हरकती मागविल्या

गडचिरोली : राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून राबविण्यात येणाऱ्या ५१ व्या ग्रंथभेट योजनेतील १,१८३ ग्रंथांची यादी प्रसिद्ध झाली आहे. यात मराठीतील ६८५, हिंदीतील २४६ आणि इंग्रजीतील २५२ ग्रंथांचा समावेश आहे. यादी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संकेतस्थळावर पाहता येईल. सूचना, हरकती व आक्षेप ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई येथे लेखी स्वरूपात पाठवावेत.

स्पर्धेच्या अर्जासाठी मुदतवाढ

अकोला : 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत आयोजित बहुराज्यीय 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धेची अर्ज मुदत ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास विभागातर्फे स्पर्धा आयोजित केली आहे. कृषी, आरोग्य, पर्यावरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण आदी क्षेत्रांतील नवकल्पनांना व्यासपीठ मिळणार आहे. विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आणि स्टार्टअप्स सहभागी होऊ शकतात. अंतिम फेरीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. मुदतवाढीसाठी स्पर्धकांना तयारीसाठी मोठा वेळ मिळणार असून नव्या ऊर्जेसह स्पर्धक सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धेत उतरणार आहे.

डीजीसीएची ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात अंतिम पाहणी ▸ हवाई कनेक्टिव्हिटीला मिळणार नवी दिशा

बेलोरा विमानतळावर नोव्हेंबरअखेर 'नाइट लँडिंग'

अमरावती / प्रतिनिधी

बेलोरा विमानतळावरील नाइट लँडिंग सुविधा नोव्हेंबर २०२६ च्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या सुविधेमुळे अमरावतीच्या हवाई वाहतुकीला नवी दिशा मिळण्यासोबतच रात्रीच्या वेळीही विमान प्रवासाची शक्यता वाढणार आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) यंत्रणेची अंतिम पाहणी होणार आहे. काही मंजुऱ्या मिळाल्यानंतर ही सुविधा सुरू होण्याची शक्यता आहे.

सध्या अमरावती–मुंबई विमानसेवेसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार असून, आगामी काळात सुरू होणाऱ्या पुणे आणि इंदूर विमानसेवेलाही तिचा फायदा होऊ शकतो. रात्री विमान उतरविण्याची व्यवस्था झाल्यानंतर उड्डाणांच्या वेळापत्रकात अधिक लवचिकता आणता येईल. त्यामुळे प्रवाशांना रात्रीच्या प्रवासासाठी नागपूर विमानतळावर जाण्याची गरज कमी होण्याची शक्यता आहे. बेलोरा विमानतळावर नाइट लँडिंगसाठी आवश्यक अत्याधुनिक तांत्रिक उपकरणे, प्रकाशयोजना आणि डॉपलर व्हेरी हाय फ्रिक्वेन्सी ओमनी डायरेक्शनल रेंज (डीव्हीओआर) ही दिशादर्शक यंत्रणा उभारण्यात आली आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात डीजीसीएकडून अंतिम पाहणी होणार असून, आवश्यक मंजुऱ्या मिळाल्यानंतर नोव्हेंबरअखेर सुविधा सुरू होण्याची अपेक्षा आहे.

अमरावतीत राजकीय नेत्यांच्या सभा किंवा बैठका उशिरापर्यंत चालल्यास काहींना नागपूरला जावे लागते, तर काहींना अमरावतीत मुक्काम करावा लागतो.

नाइट लँडिंग सुविधा सुरू झाल्यानंतर खासगी विमानाने प्रवास करणारे राजकीय नेते आणि वरिष्ठ अधिकारी रात्री उड्डाण करू शकतील.



दिवसापुरती मर्यादा राहणार नाही

■ नाइट लँडिंग सुविधा सुरू झाल्यानंतर विमानांचे लँडिंग आणि टेकऑफ केवळ दिवसा करण्याची मर्यादा कमी होईल. रात्रीच्या सत्रातही विमानांची ये–जा शक्य होईल. त्यामुळे बेलोरा विमानतळाच्या वापरात वाढ होण्यास आणि अमरावतीची हवाई कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम होण्यास मदत होऊ शकते. मात्र, सुविधा सुरू होण्यासाठी डीजीसीएची अंतिम पाहणी आणि आवश्यक मंजुऱ्या महत्त्वाच्या ठरणार आहेत.

मुंबई सेवा अधिक सक्षम होण्याची शक्यता

■ नाइट लँडिंग सुविधा उपलब्ध झाल्यानंतर अमरावती–मुंबई विमानसेवेच्या वेळापत्रकात बदल करणे अधिक सोयीचे होईल. रात्री विमान उतरविण्याची सुविधा असल्याने विमान कंपन्यांना नव्या वेळापत्रकांचे नियोजन करता येईल. पुणे, इंदूर आणि इतर प्रमुख शहरांसाठी नवीन विमानसेवा सुरू करण्याच्या प्रस्तावांनाही गती मिळण्याची शक्यता आहे.

उद्योग आणि पर्यटनाला चालना

■ रात्रीच्या विमानसेवेमुळे उद्योगपती, व्यावसायिक आणि सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ होऊ शकतो. एम मित्र मेगा टेक्स्टाइल पार्क, नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्र आणि स्थानिक एमआयडीसीतील उद्योजकांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी सुविधा मिळण्यास मदत होईल. याशिवाय चिखलदरा आणि मेळघाट परिसरातील पर्यटनालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

'शिक्षक मतदारसंघाच्या मतदारांनी ऑनलाइन नाव तपासावे'

अमरावती / प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातील मतदारांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट असल्याची ऑनलाइन पद्धतीने खात्री करून घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

मतदारांना घरबसल्या मतदार यादीतील नाव शोधता यावे, यासाठी महाइलेक्शन डॉट. जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा वापर करून मतदारांना आपले नाव, मतदान केंद्र आणि इतर संबंधित तपशील तपासता येणार आहेत.

मतदारांनी मतदार यादीतील आपल्या नावाची खात्री करून संबंधित मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदार यादी आणि त्यानंतरची पूरक मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे मतदारांनी पुन्हा एकदा आपले नाव आणि मतदान केंद्राची माहिती तपासून घेणे आवश्यक आहे. पूरक मतदार यादीमुळे पत्ता किंवा भाग क्रमांकात बदल झालेला असण्याची शक्यता असल्याने, अंतिमतः प्रसिद्ध झालेल्या यादीतील तपशीलाची खात्री करावी.

अशी तपासा मतदार यादीतील नोंद

■ मतदारांनी गुगलवर महाइलेक्शन डॉट. जीओव्ही डॉट इन हे संकेतस्थळ उघडावे. त्यानंतर 'मतदार नोंदणी' या पर्यायात जाऊन पदवीधर किंवा शिक्षक यापैकी संबंधित मतदारसंघाची निवड करावी. शिक्षक मतदारसंघ निवडल्यानंतर मतदारांना आपले नाव शोधता येईल. व शोधण्यासाठी पोचपावती क्रमांक, सध्याची मतदार यादी, अंतिम मतदार यादी तसेच जिल्हा, तालुका आणि नाव या पर्यायांचा वापर करता येतो. पोचपावती क्रमांक उपलब्ध नसल्यास जिल्हा, तालुका आणि मतदाराचे नाव भरूनही शोध घेता येतो. आवश्यक संकेताक्षरे भरून शोध घेतल्यानंतर संबंधित मतदाराची नोंद, मतदान केंद्र आणि इतर तपशील दिसून येतात.

चंद्रपूर जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून खत खरेदीसाठी एफएफएस प्रणाली

चंद्रपूर : रासायनिक खतांची खरेदी सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी कृषी विभागामार्फत 'ॲग्रीस्टॅक' अंतर्गत 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएस) प्रणाली राबविण्यात येत आहे. तिसऱ्या टप्प्यात चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश असून, २२ ऑक्टोबर २०२६ पासून अंमलबजावणी सुरू होणार आहे.

शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून अधिकृत एफएफएस ॲप डाउनलोड करून राज्य निवडावे. आधार प्रमाणीकरण किंवा फार्मर आयडी व ओटीपीद्वारे लॉगिन केल्यानंतर जमिनीचा जिल्हा, तालुका, गाव, सर्व्हे क्रमांक आणि पिकांची माहिती नोंदवावी. शिफारशीनुसार खतांचा प्रकार व बॅगांची संख्या निवडून जवळच्या नोंदणीकृत कृषी सेवा केंद्रातील उपलब्ध साठ्यानुसार विक्रेता निश्चित करता येईल. एकाच अर्जातून अनेक खतांची मागणी नोंदविण्याची सुविधाही आहे.

क्यूआर कोड ७२ तास वैध

■ नोंदणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्याला टोकन आणि क्यूआर कोड मिळेल. तो ७२ तास वैध राहील. या कालावधीत निवडलेल्या विक्रेत्याकडे कोड दाखविल्यानंतर विक्रेता तो स्कॅन करून खत देईल आणि व्यवहाराची पावती उपलब्ध करून देईल. मुदत संपल्यास नव्याने नोंदणी करावी लागेल.
या प्रणालीमुळे खतांचा साठा, मागणी आणि विक्रीत पारदर्शकता वाढून कृत्रिम टंचाई, काळाबाजार आणि खतांसोबत अन्य उत्पादने खरेदी करण्याची सक्ती अर्थात 'लिंकिंग' यांना आळा घालण्यास मदत होणार आहे.

कवठा बु. येथे मायक्रो फायनान्स कंपनीच्या वसुली पद्धतीवर आक्षेप

महिला कर्जदारांसोबत अभद्र भाषा वापरल्याचा आरोप ▸ जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी

कवठा बु. / प्रतिनिधी

अकोट तालुक्यातील कवठा बु. येथे मायक्रो फायनान्स कंपनीच्या कर्जवसुली पद्धतीवरून नाराजी व्यक्त होत आहे. कंपनीच्या महिला कर्मचाऱ्याने कर्जवसुलीसाठी घरी येऊन रवींद्र अजाबराव धांडे आणि त्यांच्या पत्नीशी उद्धट व अभद्र भाषेत संवाद साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला कर्मचारी कर्जवसुलीसाठी धांडे यांच्या घरी आली होती. यावेळी तिने कर्जदार दाम्पत्याला दमदाटी व धमकी दिल्याचा आरोप आहे. कर्ज घेताना विचार करायला हवा होता, आता लगेच पैसे द्या, अन्यथा माझ्यापेक्षा वाईट कोणी नाही, अशा आशयाचे वक्तव्य केल्याचे सांगण्यात येते. हा प्रकार ग्रामस्थांनी पाहिल्याचा दावा करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक पत्रकार राजेश साविकार यांनी संबंधित महिला कर्मचाऱ्याला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी तिने पत्रकार साविकार यांच्याशीही वाद घातल्याचा आरोप आहे. संबंधित महिला कर्मचाऱ्याकडे ओळखपत्र नसल्याचेही सांगण्यात आले.

ग्रामीण भागातील गरीब महिला कर्जदारांशी वसुलीदरम्यान वाद घालून अवाच्च भाषेचा वापर केला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

अनेक गावात बचत गट आणि वेगवेगळ्या मायक्रो फायनान्स कंपनीकडून एका पेक्षा जास्त कर्ज घेतल्यामुळे ग्रामीण भागातील महिला दुष्टचक्रात अडकले आहे मजुरीचे कुठलेही स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे कर्जाचे हप्ते थकित झाले आहेत सदर कंपनीचे कर्मचारी महिलांना घरी येऊन दमदाटी करून दादागिरी दाखवण्याचा प्रकार नित्याचाच झाला आहे सत्तेत बसलेले लोकप्रतिनिधी मोठमोठ्या वल्गणा करतात मात्र त्या सामान्यांपर्यंत पोहोचत नाही ग्रामीण महिलांनी एकजुट होऊन अशा लोकांना गावात फिरू देऊ नये शासन स्तरावर यावर त्वरित तोडगा काढण्यात यावा.

– दिलिप बोचे, उपजिल्हा प्रमुख, शिवसेना(उबाठा)

माझ्याकडे थोडेफार कंपनीचे कर्ज आहे आतापर्यंत कर्जाचे हफ्ते टप्प्याटप्प्याने व्यवस्थित भरले परंतु दुष्काळी परिस्थिती असल्याने मोल मजुरी नसल्याने कर्जाचे हप्ते फेडणे मुश्किल झाले त्यातच कंपनीची कर्मचारी घरी येऊन दमदाटी व आगाउ बोलल्याने मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

– रविंद्र धांडे ,
शेतमजूर कवठा बु.

शेतीतील संकटामुळे कर्जफेडीचा प्रश्न गंभीर

■ कवठा बु. परिसर हा खारपाणपट्ट्यात असून 'कॉटन बेल्ट' म्हणून ओळखला जातो. यंदा मूग, उडीद आणि सोयाबीन या पिकांचे उत्पादन नगण्य राहिल्याचे सांगण्यात येते. पावसात दीर्घ खंड पडल्याने शेतातील निंदण व खुरपणीसारखी कामेही ठप्प झाली आहेत. कपाशीचे पीकही हातातून गेल्यासारखी परिस्थिती असल्याने शेतमजुरांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रशासनाने हस्तक्षेप करण्याची मागणी

■ ग्रामीण भागातून मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली पद्धतीविषयी अनेक तक्रारी असल्याचा दावा करण्यात आला आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित विभागाला सूचना दिल्यानंतरही गरीब महिला शेतमजुरांना त्रास दिला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

बार्शीटाकळीत महाराजस्व समाधान शिबिराला प्रतिसाद

अकोला / प्रतिनिधी

'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत श्री खोलेश्वर संस्थान, बार्शीटाकळी येथे आयोजित 'महाराजस्व समाधान शिबिरा'ला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील विविध शासकीय विभागांनी एकत्रितपणे या शिबिरात सहभाग घेत नागरिकांना एकाच छताखाली विविध शासकीय दाखले आणि योजनांचा थेट लाभ उपलब्ध करून दिला.

शिबिरादरम्यान ६० नागरिकांना सातबारा उतारे, २५ शेतकऱ्यांना फार्मर आयडी, ४३ महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रे, २३ जणांना उत्पन्न दाखले आणि १७ जणांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. याशिवाय १९ एनसीएमसी कार्ड आणि १७ आयुष्मान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. आरोग्य, पुरवठा, सेतू, भूमी अभिलेख आणि कृषी विभागांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणावर विविध सेवा व योजनांचा लाभ देण्यात आला. या शिबिराला उपविभागीय अधिकारी मिलिंद जगदाळे, तहसीलदार रवींद्र कापशीकर, नायब तहसीलदार अतुल सोनवणे, अक्षय नागे, तालुका कृषी अधिकारी संध्या करवा आणि मुख्याधिकारी राहुल कंकाळ उपस्थित होते. एकाच ठिकाणी विविध शासकीय कामे पूर्ण झाल्याने नागरिकांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले.



चरख्यावर सूत कताईचे धडे; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अकोला : मोबाईलच्या आभासी जगात रमलेल्या तरुणाईला श्रम, एकाग्रता आणि स्वावलंबनाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने गांधी जवाहर बाग येथे आयोजित चौथ्या तरुणाई चरखा प्रशिक्षण कार्यशाळेला ग्रामीण विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अकोला जिल्हा सर्वोदय मंडळ आणि कनुभाई मश्रुवाला चरखा प्रशिक्षण व संशोधन केंद्राच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी प्रवासी चरख्यावर सूतकताईचे प्रात्यक्षिक धडे घेतले.

आजच्या मोबाईल युगात तरुणाई आभासी जगात गुंतत असताना चरखा हा ध्यान, एकाग्रता आणि स्वावलंबनाचा प्रभावी प्रयोग ठरू शकतो. चरख्याची लयबद्ध घरघर मनाला शांतता देते. ही प्रक्रिया एक प्रकारचे ध्यान असून, तणावग्रस्त विद्यार्थ्यांसाठी तिचे महत्त्व अधिक आहे. चरख्याच्या माध्यमातून तरुणाईला जोडण्याबरोबरच हातातून निसटत चाललेले श्रमाचे संस्कार पुन्हा रुजविणे, हीच शिक्षणाची खरी दिशा असल्याचे कार्यशाळेतून अधोरेखित करण्यात आले. चौथ्या तरुणाई चरखा प्रशिक्षण कार्यशाळेत ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बबनराव कानकिरड आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सांगितले चरख्याचे महत्त्व

■ रुद्र भास्कर माहोरे, कृष्ण गजानन उमाळे, अश्वजीत इंगळे (निमकर्दा), उषा बापुराव बोरेकर (तेल्हारा) आणि गणेश श्रीकृष्ण इंगळे (अकोट) यांनी चरखा आणि सूतकताईचे महत्त्व विशद केले.

अभिजित गोखले : अकोल्यात संघाचा विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव उत्साहात

राष्ट्रनिर्माणासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र यावे

अकोला / प्रतिनिधी

देशाला आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि सामर्थ्यशाली बनविण्यासाठी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन कार्य करणे आवश्यक आहे. संविधान आणि लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या शक्तींचा मुकाबला करण्यासाठी समाजातील सज्जनशक्तींनी एकत्र येण्याची गरज आहे, असे प्रतिपादन संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटनमंत्री अभिजित गोखले यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर रविवार, १८ ऑक्टोबर रोजी गोरक्षण मार्गावरील एकवीरा देवी मैदानावर विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून गोखले बोलत होते. मंचावर प्रमुख अतिथी डॉ. रणजित सपकाळ, विभाग संघचालक नरेंद्र देशपांडे आणि महानगर कार्यवाह मोहन मिश्रा उपस्थित होते. संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाली असली, तरी राष्ट्रहिताचे कार्य संपलेले नाही. देशाला आत्मनिर्भर आणि शक्तिशाली बनविण्यासाठी स्वयंसेवकांनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन कार्य करावे, असे गोखले म्हणाले. देशाच्या परंपरा, संस्कृती, उत्सव आणि महापुरुषांविषयी चुकीची माहिती पसरवून विशेषतः तरुणांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. अशा परिस्थितीत लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी समाजाने जागरूक राहून एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. संघाविषयी विविध गैरसमज पसरविण्यात आले असले, तरी आता संघाचे कार्य आणि कार्यपद्धती यांबाबत समाजातील विविध स्तरांवर चर्चा होत असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वयंसेवकांनी आचरण, व्यवहार आणि विचारांतून आदर्श निर्माण करावा तसेच समाजहिताच्या उपक्रमांचा विस्तार करावा, असे आवाहन त्यांनी केले. विजयादशमीकडे केवळ परंपरेचा उत्सव म्हणून न पाहता रचनात्मक कार्याचे सीमोल्लंघन करण्याची संधी म्हणून पाहण्याचेही त्यांनी सांगितले. उत्सवातून राष्ट्रनिर्माण, सामाजिक एकोपा, चारित्र्यनिर्मिती आणि रचनात्मक कार्याचा संदेश देण्यात आला.



भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी योगदान द्या

■ प्रमुख अतिथी डॉ. रणजित सपकाळ यांनी समाजात चारित्र्यसंपन्न नागरिक घडविण्याच्या कार्याचा उल्लेख केला. समाजाच्या प्रगतीत अडथळा ठरणाऱ्या स्वार्थ आणि आळस यांसारख्या प्रवृत्तींवर मात करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. देशाला आतून कमकुवत करणाऱ्या शक्ती संघटित होत असल्याचे सांगून त्यांनी सामाजिक एकजूट आणि राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यावर भर दिला. भारताला बलशाली बनवून विश्वगुरूच्या स्थानापर्यंत नेण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

पंचपरिवर्तनातून सकारात्मक बदल घडवा

■ समाजातील आदर्श जपत सामूहिक शक्ती वाढविणे आवश्यक आहे. यासाठी पंचपरिवर्तनाचे महत्त्व समजून घेऊन प्रत्येकाने त्याचे आचरण करावे, असे गोखले यांनी सांगितले. संघ विधायक आणि सकारात्मक कार्याला विरोध करीत नसून, समाजातील चांगल्या शक्तींना एकत्र आणून रचनात्मक कामाला चालना देण्याचा प्रयत्न करतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सणासुदीच्या काळात गव्हाऐवजी ज्वारी; शिधा पत्रिकाधारक नाराज

अकोट : दसरा आणि दिवाळी या प्रमुख सणांच्या पार्श्वभूमीवर स्वस्त धान्य दुकानांतून गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप होत असल्याने अकोट तालुक्यातील शिधाधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वर्षभर मोलमजुरी करून सणासुदीला गव्हाची खीर आणि पुरणपोळी करण्याची अपेक्षा असलेल्या गरीब कुटुंबांना यंदा ज्वारीवर समाधान मानावे लागत असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे.तालुक्यातील अनेक स्वस्त धान्य दुकानांमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून प्रति व्यक्ती तीन किलो ज्वारी आणि दोन किलो तांदूळ दिला जात आहे. गहू मिळत नसल्याच्या तक्रारी शिधाधारकांनी केल्या आहेत. ज्वारी चांगली असली तरी सणासुदीच्या काळात गव्हाचाही पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे. लहान मुलांना भाकरीपेक्षा पोळी आवडत असल्याने सणाच्या दिवशी तरी गहू मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आनंदाचा शिधा बंद झाल्याचीही नाराजी

■ पूर्वी शासनाकडून १०० रुपये भरून आनंदाचा शिधा संच मिळत होता. त्यामध्ये एक किलो साखर, एक लिटर तेल, एक किलो रवा आणि एक किलो हरभरा डाळ यांचा समावेश होता. मात्र, हा संच बंद करण्यात आल्याचे शिधाधारकांचे म्हणणे आहे. सध्या गहू आणि ज्वारीपुरतेच धान्य मिळत असल्याने सणांचा गोडवा कमी झाल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली. आनंदाचा शिधा पुन्हा सुरू करावा आणि सणासुदीच्या काळात गहू व ज्वारी यांपैकी पर्याय निवडण्याची सुविधा द्यावी, अशी मागणी शिधाधारकांकडून होत आहे.

न्यूज ब्रीफ

तहसील कार्यालयात मराठी भाषा सप्ताह उत्साह

मोताळा : येथील तहसील कार्यालयात ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांच्या धडाक्यात साजरा करण्यात आला. मराठी भाषेचा गौरव आणि तिचा प्रशासकीय वापर वाढवण्याच्या उद्देशाने या विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचा शुभारंभ अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या उद्घाटनाने व मराठी भाषा संवर्धनाची सामूहिक शपथ घेऊन झाला. यानिमित्ताने मोताळा येथील जागृती वाचनालयाच्या सौजन्याने ३०० ते ३५० दुर्मिळ व दर्जेदार मराठी ग्रंथांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक उत्तरदायित्व जपत प्रत्येकी एक पुस्तक दान केले. ही दान केलेली पुस्तके तहसील कार्यालयाच्या वाचनालयात वर्षभर सर्वांसाठी उपलब्ध राहणार आहेत. डिजिटल युगात मराठीचा प्रभावी वापर व्हावा यासाठी तलाठी इंगळे यांनी कर्मचाऱ्यांना गुगल इनपुटच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने मराठी टंकलेखन करण्याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या सप्ताहाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यापुढे आपली अधिकृत स्वाक्षरी मराठीतूनच करण्याचा संकल्प केला.

मतदानाच्या पद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना संकेतस्थळावर उपलब्ध

शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत असे करा मतदान!

बुलढाणा , प्रतिनिधी

विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाची पद्धत इतर सार्वत्रिक निवडणुकांपेक्षा वेगळी आहे. या निवडणुकीत मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रम नोंदवून मतदान करावे लागते. निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना पसंतीक्रम देता येतो. मतदानाची ही पद्धत लक्षात घेऊन मतदारांनी, विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्यांनी, योग्य प्रकारे मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

मतपत्रिकेसोबत दिलेले जांभळ्या (व्हायलेट) रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉइंट पेन किंवा लेखनाचे साधन वापरू नये. अन्य साधनाचा वापर केल्यास मतपत्रिका अवैध ठरू शकते, त्यामुळे यासंदर्भात काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



.. अन्यथा मतपत्रिका अवैध ठरेल!

■ कोणत्याही उमेदवारासमोर प्रथम पसंतीचा १ हा आकडा नोंदविलेला नसल्यास, १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर लिहिलेला असल्यास, १ हा आकडा कोणत्या उमेदवारासाठी नोंदविला आहे, याबाबत संदिग्धता असल्यास, एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ सोबत २, ३ किंवा अन्य पसंतीक्रमही नोंदविले असल्यास, पसंतीक्रम आकड्यांऐवजी शब्दांत लिहिल्यास, मतदाराची ओळख पटू शकेल अशी खूण किंवा मजकूर मतपत्रिकेवर असल्यास, निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या स्केच पेनऐवजी अन्य लेखनसाधनाचा वापर केल्यास, मतपत्रिका वैध ठरण्यासाठी किमान एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून प्रथम पसंती नोंदविणे आवश्यक आहे.

असे करा मतदान

■ मतपत्रिकेवर प्रथम पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरील पसंतीक्रमाच्या रकान्यात १ हा आकडा लिहावा. हा आकडा केवळ एका उमेदवाराच्या नावासमोरच नोंदवावा. निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना पसंतीक्रम देता येतो. मात्र पुढील पसंतीक्रम नोंदविणे ऐच्छिक आहे. पसंतीक्रम शब्दांत न लिहिता १, २, ३ अशा आकड्यांत नोंदवावा. आंतरराष्ट्रीय पद्धतीतील १, २, ३, रोमन पद्धतीतील I, II, III किंवा देवनागरीतील १, २, ३ यांसारख्या मान्य स्वरूपांत पसंतीक्रम नोंदविता येतो.

'नैतिकमुल्य, कर्तव्यनिष्ठता जपत समाजाला न्याय मिळवुन द्या'

मुकुल वासनिक विधी महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी उद्घाटन

बुलढाणा, प्रतिनिधी

''विधी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी कायद्याचे ज्ञान आत्मसात करण्यासोबतच एक सुजाण, जबाबदार आणि संवेदनशील नागरीक म्हणून स्वतःची जडण-घडण करावी, वकीली व्यवसाय करतांना प्रामाणिकपणा, नैतिकमुल्य आणि कर्तव्यनिष्ठता जपत समाजाला न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयत्नशील रहावे अश्या आशयाचा मोलाचा संदेश मुंबई हायकोर्टाच्या नागपुर खंडपिठाचे न्यायाधिश प्रविण एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला''.

विदर्भ युवक विकास संस्था व्दारा संचालित मुकुल वासनिक कॉलेज ऑफ लॉ, बुलडाणा या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी सोहळ्याच्या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ युवक विकास संस्थेचे अध्यक्ष, प्रा.डॉ. संतोष आंबेकर हे होते. याप्रसंगी एटलास स्कील टेक्नॉलॉजी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजन वेळूकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. विजयकुमार एस. चौबे विधी शाखा विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर विदर्भ युवक विकास संस्थेच्या सचिव प्रा. मिनल आंबेकर, प्रभारी प्राचार्या डॉ. शिल्पा ठाकरे, संस्थेचे कार्यकारीणी सदस्य अँड डी.एस. चव्हाण, नवनिता चव्हाण, प्रा. डॉ. भागवतराव विधाते (अमरावती), विजय अंभोरे, बुलडाणा बार असो. अध्यक्ष अॅड विजय सावळे, सचिव अमर इंगळे, यांची उपस्थिती होती.



शैक्षणिक प्रवासाचा गौरव..

■ मुकुल वासनिक विधी महाविद्यालयाच्या वतीने गत २५ वर्षात विधी शिक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्वपुर्ण कार्य केले आहे. या शैक्षणिक प्रवासाचा गौरव करण्यासाठी आयोजित रौप्य महोत्सवी सोहळ्यात महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला.

थकीत देयके प्रकरणी समिती स्थापन करण्याची मागणी

लोणार : महाराष्ट्रातील विविध शासकीय विभागांकडून विकासकामे करणाऱ्या कंत्राटदारांची सुमारे ८६ हजार कोटी रुपयांची देयके गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचा दावा कंत्राटदार संघटनांकडून करण्यात येत आहे. या थकीत देयकांमुळे राज्यातील हजारो कंत्राटदार आर्थिक संकटात सापडले असून, मागील अकरा महिन्यांत नऊ उद्योजक कंत्राटदारांनी केलेल्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न गंभीर बनला आहे. कंत्राटदारांच्या विविध समस्या व अडचणी सोडविण्यासाठी शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन, आदिवासी विकास विभाग, पर्यटन विभाग, ग्रामविकास विभाग, जलसंपदा विभाग यांसह विविध शासकीय विभागांमधील देयके प्रलंबित असल्याने कंत्राटदारांना बँकांच्या कर्जाचे हप्ते, व्याज, कामगारांचे वेतन आणि बांधकाम साहित्य पुरवठादारांची देणी भागविताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

आरोग्य संस्थांमधील सेवा अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करा



बुलढाणा, प्रतिनिधी

जिल्ह्यातील नागरिकांना स्थानिक स्तरावर दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य संस्थांमधील दैनंदिन कामकाज, औषधसाठा, माता व बाल आरोग्य सेवा तसेच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी. आरोग्य सेवांमध्ये आवश्यक सुधारणा करून सर्व सेवा नियमित व गुणवत्तापूर्ण ठेवाव्यात, असे निर्देश जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडाले यांनी दिले.

जिल्हा परिषद, बुलढाणा आरोग्य विभागांतर्गत डॉ. मंडाले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र किन्होळा, शेलगाव आटोळ तसेच जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांना भेटी देऊन कामकाजाचा आणि आरोग्य सेवांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बाह्यरुग्ण विभाग, औषधी भांडार, लसीकरण कक्ष, प्रसूती कक्ष तसेच उपलब्ध आरोग्य सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. गर्भवती मातांची नियमित प्रसूतीपूर्व तपासणी (एएनसी), आवश्यक वैद्यकीय चाचण्या आणि समुपदेशन करण्यासोबतच संस्थात्मक प्रसूतीला प्राधान्य द्यावे. बालकांचे नियमित लसीकरण, वाढ व विकास तपासणी करून कुपोषित बालकांना योग्य उपचार आणि आवश्यक पाठपुरावा उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

नॅशनल असोशियन फॉर द ब्लाइंड तर्फे जागतिक पांढरीकाठी दिन

बुलढाणा : येथील नॅशनल असोशियन फॉर द ब्लाइंड जिल्हा शाखा बुलडाणा तर्फे १५ ऑक्टोंबर रोजी जागतिक पांढरीकाठी दिन व ज्येष्ठ नागरिकांचे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष राधेश्याम चांडक, हे होते तर प्रमुख अतिथी मनोज मेरत, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग बुलडाणा हे होते तसेच संस्थेचे सचिव डॉ. व्ही. एस.चिंचोले, उपाध्यक्ष रामकृष्ण म्हस्के, कोषाध्यक्ष दिलीप नागरिक, ज्येष्ठ नागरिक कुलकर्णी, पिंपरकर, म्हसने , व्ही टी देशमुख, उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून अंधांचे दैवत डॉ. हेलन केलर व लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांचे संस्थेचे सचिव डॉ.व्हि.एस.चिंचोले यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. दरम्यान चांडक यांनी सांगितले की, महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये नॅब ही संस्था कार्यरत आहे. परंतु नॅब जिल्हा शाखा बुलडाणा ह्या संस्थेचे कार्य उत्कृष्ट असून प्रत्येकवर्षी चांगले कार्यक्रम राबवित असतात. आमच्या नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड संस्थेतर्फे दोन-तीन वर्षापासून जिल्ह्यातील दिव्यांग वधु वर परिचय मेळावा घेण्यात आले.

बुलढाणा जिल्ह्यात पुढील पाच दिवस कोरड्या हवामानाची शक्यता

बुलढाणा , प्रतिनिधी

भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात पुढील पाच दिवस कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत आकाश मुख्यतः निरभ्र ते अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज आहे. एल निनो सदृश परिस्थिती आणि कमाल तापमानातील बदल लक्षात घेता, शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांचे नियोजन उपलब्ध सिंचन स्रोतांची खात्री करूनच करावे, असा कृषी सल्ला जिल्हा कृषी हवामान केंद्राने दिला आहे.

एल निनो सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चालू महिन्यात मान्सूनोत्तर अथवा अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता कमी असल्याने शेतकऱ्यांनी पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन पेरणीचे नियोजन करावे. रब्बी पिकांची पेरणी करताना लवकर परिपक्व होणाऱ्या तसेच पाण्याचा ताण सहन करू शकणाऱ्या वाणांची निवड करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ओलीताखालील करडीची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत करता येऊ शकते. पेरणीपूर्वी करडीचे बियाणे रात्रभर पाण्यात भिजवून पेरणी केल्यास बियाण्याची उगवण लवकर व चांगली होण्यास मदत होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य वेळी आणि उपलब्ध ओलाव्याचा विचार करून पेरणी करावी.

कृषी सल्ला...

■ पाण्याची संभाव्य टंचाई लक्षात घेता फळझाडांच्या सुकलेल्या, रोगट आणि अतिरिक्त फांद्या काढून टाकाव्यात. यामुळे फळझाडांची पाण्याची गरज कमी होण्यास मदत होऊन उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करता येईल, असा सल्ला देण्यात आला आहे. केवळ वाळलेला चारा दिल्याने जनावरांच्या सर्व पोषणविषयक गरजा पूर्ण होत नाहीत.


चांडोळमध्ये डेंग्यूचा प्रादुर्भाव; दोघांना लागण

चांडोळ : डेंग्यूचा प्रादुर्भाव आढळून आला असून, दोन रुग्णांना डेंग्यूची लागण झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील आरोग्य व्यवस्थेने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. गावातील डेंग्यूच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने तातडीने सर्वेक्षण करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोंद्रे आक्रमक

अमडापूर : येथील भारतीय स्टेट बँक हे इतर बँकेत मोर्गे स असलेले व सातबारावर लोन असलेल्या शेतकऱ्यांना क्रॉप लोन देत नव्हती. यामुळे परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त होता. लोन मिळत तसेच सरकार शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देऊन थट्टा करत आहे. या चितेने हतबल असलेल्या शेतकऱ्यांनी माजी आ. राहुल बोंद्रे यांच्याकडे गा-हाणे मांडले. दरम्यान, माजी आ. राहुल बोंद्रे यांनी शुक्रवारी संध्याकाळी अमडापूर येथील भारतीय स्टेट बँक शाखेत शेतकऱ्यांना घेऊन धडक देवून बँक व्यवस्थापकास धारेवर धरले. यावेळी बँक व्यवस्थापक सहकार्य करीत नसल्यामुळे संतप्त राहुल बोंद्रेनी भ्रमणध्वनीव्दारे जिल्हाधिका-यांशी संपर्क साधला. सरकार शेतकऱ्यांना तातडीची मदत करायची सोडून अपमानित करत असून, त्रास देत आहे. हा त्रास जर आपण थांबवला नाही, तर मला शेतकऱ्यांच्या हितासाठी जन आंदोलन उभे करावे लागेल, असा इशारा यावेळी बोंद्रे यांनी दिला.

दैनिक महाभूमि शब्दसंगम 1122



—: आडवे संकेत :—

1) लग्नात वधू मुलीने तयार केलेल्या सुंदर कलाकुसरीच्या वस्तुंचे मांडलेले प्रदर्शन
4) तागाची वळलेली बारीक दोरी
6) परंपरेने चालत आलेले
9) चविष्ट, रूचकर
10) आध्यात्मिक व्याख्यान
11) काळिमा, डाग, बट्टा
13) कधीही न मोडणारी प्रतिज्ञा
15) पोते शिवण्याची मोठी सूई
16) उर्दूमध्ये दैव, नशीब
17) आजारी माणसाने खाण्यापिण्यावर ठेवावयाचे नियंत्रण
18) चुलता, वडिलांचा भाऊ
19) लहान, छोटा
20) निरूपयोगी व टाकाऊ वस्तु
21) श्रावण बाळाचा अनवधानाने शरसंधान करणारा राजा
23) एखाद्या घटनेनंतर पोलिंसांनी पंचासमोर केलेली तपासणी
25) पान
26) गायनातील स्वरांचा काळ
27) शरण किंवा आश्रयास आलेला
28) पायी मार्गक्रमण करणारा
29) जबरी, जुलूम, बळजबरी
30) देवपूजेनंतर वाटण्यात देवाला अर्पिलेल्या अन्नाचा शेष
31) सावकाराजवळ गहाण म्हणून ठेवलेली वस्तु
32) जुन्या काळी थैलीत पाठविलेले पत्र
33) सतरावे नक्षत्र
34) तोंड, वदन
36) घटस्फोटित स्त्रीला तिच्या नवऱ्याकडून उदरनिर्वाहासाठी महिन्याकाठी मिळणारे पैसे
38) रसज्ञ, आनंद घेणारा
40) लोणी
42) लहान बालकांना झोपवितांना म्हणावयाचे गीत
43) व्यायामशाळेत केलेली कसरत, अभ्यास
45) सत्यवचनी राजा हरिश्चंद्राची पत्नी
48) गोड, रसदार
50) मातीत मिळालेले, नासाडी
52) ह्याला जीवदान मिळावे म्हणून सावित्री यमराजाशी भांडली
54) भव्य, फार मोठे
55) महिना
57) पुढारी

—: उभे संकेत :—

1) चवदार, रसपूर्ण
2) फसव्या, लबाड
3) तुझे 4) कामधेनू
5) आज्ञेचे उल्लंघन करणे
6) विडा करण्याचे साधन ठेवण्याचे तबक
7) दगड
8) दोन व्यक्तिंमध्ये झालेल्या ठरावाचे लिखित रूप
10) विरोध करण्याची शक्ति
12) ज्याचे कान लांब आहे असा
14) उजेड
17) प्रतिध्वनि
21) सैन्य
22) स्तर, पडदा
23) देशाचे सूत्र संचालन करण्यासाठी लोक सभेतील सदस्यांद्वारा निर्वाचित नेता
24) स्वर्गलोकीचा एक देवर्षी
25) मोठी मशाल
26) दिनांक
28) पांथस्थांची तहान भागविण्यासाठी मार्गावर केलेली व्यवस्था
29) एक तंतू वाद्य
33) एक संख्या
35) झाडाच्या योग्य वाढीसाठी त्याला दिलेली पौष्टिक द्रव्ये
37) श्रीमद्भगवत्गीतेचे संक्षिप्त नाव
39) तारा, चांदणी (हिं.)
41) सर्व गोष्टी आटोपल्यावर त्यासंबंधीची सामग्री येऊन पोहोचणे या अर्थाचा एक वाक्प्रचार
42) काजळ
44) माझे
46) आपले मराठी राज्य
47) रोजची करावयाची धार्मिक कार्ये
49) झिडकारणे, हाकलून देणे
51) आम्रवृक्षाची मंजिरी
53) दाणादाण, उधळपट्टी
56) संतोष
58) अमिताभ बच्चन, शशी कपूर, अमजदखानचा एक जुना चित्रपट, सौभाग्य
59) शेवट, समाप्ती
61) तारणारा 63) अभ्यास, नाद
64) ब्रह्मप्रतिपादक मंत्र
65) कठीण प्रसंग, आपत्ती
66) शिवशंकराची पत्नी
68) डोळ्यांना दिसतो तो वर्ण
70) वासर, दिवस (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोडेचे उत्तर

सु	धा	र	शा	ळ्य		इ	ज	बि	ज	ति	ज		प्र	ति	क्षा
धा			क		घा	ला		ज		लां		प	थ		ल
र	प	त्या		ब		ज	मा	व		ज	प		मो	ह	न
क	ड			ह्य	त		वा	र		ली	ला		प		
	सा	य	क	ल		क			भू		य		चा	वा	
क	द			क	र्ण	पि	शा	च्च		ध	न	ग	र		त
ळ		का	स	र		ला	ल		ज	ड		स्त		उ	ग
स	र	सा	व	णे		ष		अ	व	धा	न		स	र्व	दा
	वि	वि	ध		ष	ष्ठी		वा		क		आ	ळ	शी	
जि		स		अ		चा	ल	क		ट	का		ई		पा
जा	र		अ	नु	प	ये	ग		स		ल	व		अ	र्थ
बा		सं	प	दा		ग	ट		ह	वा	मा	न		मि	
ई	द		का	न	न			श	स्त्र		न	रा	ध	म	
	श	री	र		व	सू	ल		ना	थ		ज	का	त	
	दि			मा	ल		ल	गा	म		पा		व		मा
द	शा	व	ता	र		कि	ना	रा		आ	र	व	णे		द्री

uday munde - 8446302691

दैनिक
महाभूमि
मंगळवार । २० ऑक्टोबर २०२६
mahabhoomiakolawashim@gmail.com

अकोला भूमि



न्यूज ब्रीफ

मुख्य बाजारपेठेत वाहतूक कोंडी

अकोला : शहरातील मुख्य बाजारपेठेत वाहनांची वाढती संख्या, अनियमित पार्किंग आणि अतिक्रमणांमुळे वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे नागरिक, व्यापारी व विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी निश्चित पार्किंगची व्यवस्था करावी आणि अतिक्रमणे हटवावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

युवकावर शस्त्राने प्राणघातक हल्ला

अकोला : जुने शहरातील हमजा प्लॉट परिसरात रविवारी सायंकाळी धारदार शस्त्राने एका युवकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात गंगानगर परिसरातील रहिवासी ट्रकचालक असलेला जाकीर शाह जमील शाह (२६) हा गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले प्राथमिक माहितीनुसार, जखमी जाकीर शाह याच्या मामाच्या मुलांचा आणि हल्लेखोरांच्या मुलांचा किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादाची माहिती मिळताच जाकीर शाह हा हमजा प्लॉट परिसरात पोहोचला.

उद्योजकता विकास कार्यशाळा

अकोला: स्थानिक शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पीएम-उषा योजनेंतर्गत तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संशोधन व नवोपक्रम प्रतिष्ठानच्या सहकार्याने 'नवउद्यम, नवाचार आणि उद्योजकता विकास' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. डॉ. तारा हातवळणे जोयांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. स्वाती शेरेकर, डॉ. आनंद यादव, केतन बरडिया, प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि समन्वयक डॉ. मिलिंद शिरभाते उपस्थित होते. अभिजित एकत्रा आणि डॉ. विश्राम नीलकंठ बापट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दररोज आठ कोटी लिटर पाणी उचलूनही नागरिकांना १२ दिवसांनी पुरवठा

अकोल्यात ४० हजारांहून अधिक अवैध नळजोडण्यांचा संशय

अकोला / प्रतिनिधी





अकोलेकरांची तहान भागविण्यासाठी काटेपूर्णा जलशुद्धीकरण केंद्रातून दररोज तब्बल ८ कोटी लिटर पाणी घेतले जाते. शहरातील २२ ठिकाणी उभारलेल्या ३५ जलकुंभांद्वारे त्याचे वितरण होते. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध असूनही काही भागांत १२, तर काही ठिकाणी १६ दिवसांनी नळाला पाणी येत असल्याचे चित्र आहे. शहरात ४० हजारांहून अधिक अवैध नळजोडण्या असण्याचा संशय व्यक्त होत असून, संभाव्य पाणीचोरीचा मुद्दाही ऐरणीवर आला आहे.

महानगरपालिकेच्या जलप्रदाय विभागाच्या नोंदीनुसार शहरात ७३ हजार अधिकृत नळजोडण्या आहेत. प्रत्यक्षात ही संख्या १ लाख १० हजारांहून अधिक असल्याचे सांगितले जाते. शहरात १ लाख ७० हजारांहून अधिक मालमत्ताधारक असताना अधिकृत नळजोडण्यांची संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे नोंदीबाहेरील जोडण्यांची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

महापालिका प्रशासनाकडून अवैध नळजोडण्या आणि पाणीचोरी रोखण्यासाठी कठोर कारवाईचे संकेत दिले जात आहेत. मात्र, कारवाई करताना अनधिकृत जोडण्यांना संरक्षण देणाऱ्या यंत्रणेची भूमिकाही तपासणे आवश्यक आहे. दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई झाल्यास अशा प्रकारांना आळा बसू शकतो. उपलब्ध पाण्याचे न्याय्य वितरण, प्रत्येक नळजोडणीची पारदर्शक नोंद आणि वितरण व्यवस्थेची तपासणी यांद्वारेच पाणीपुरवठ्यातील अडचणींचे मूळ शोधता येईल. अवैध जोडण्यांचे जाळे उघडकीस येते का आणि अकोलेकरांना नियमित पाणीपुरवठा मिळतो का, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

■ अवैध जोडण्यांच्या प्रक्रियेत कंत्राटदारांसह महापालिकेतील संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची भूमिका तपासण्याची मागणी होत आहे. अनधिकृत जोडण्यांना परवानगी कोणी दिली, त्यासाठी पैसे कोणी घेतले, नोंदी का झाल्या नाहीत आणि या प्रकारांकडे दुर्लक्ष कसे झाले, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

नोंदीबाहेरील जोडण्यांचा प्रश्न

■ गेल्या काही वर्षांत अनेक नागरिकांनी नळजोडण्या घेतल्या ; मात्र संबंधित क्षेत्रातील अभियंत्यांच्या कथित दुर्लक्षामुळे त्यांची कागदपत्रे महापालिकेच्या नोंदीपर्यंत पोहोचली नसल्याची माहिती पुढे येत आहे. आजही अवैध नळजोडण्या दिल्या जात असल्याचा आरोप असून, त्यासाठी नागरिकांकडून हजारो रुपये घेतले जात असल्याचे सांगितले जाते. हा पैसा महापालिकेकडे जमा होतो की संबंधित कंत्राटदार अथवा कर्मचाऱ्यांकडे जातो, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

आठ कोटी लिटर पाण्याचे गणित कुठे बिघडते ?

■ दररोज मोठ्या प्रमाणात पाणी उचलले जात असताना नागरिकांना अनेक दिवस प्रतीक्षा का करावी लागते, हा प्रश्न उपस्थित होत आहे. वितरणातील गळती, अवैध जोडण्या, संभाव्य पाणीचोरी आणि पाणीपुरवठ्याचे नियोजन यांचा किती परिणाम होतो, हे तांत्रिक तपासणीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व नळजोडण्यांचे सर्वेक्षण, अधिकृत नोंदींची पडताळणी आणि प्रत्यक्ष पाणीवितरणाचे लेखापरीक्षण करण्याची गरज आहे.



वारुळ्यात सोयाबीनची गंजी पेटवली!

अज्ञात व्यक्तीचे कृत्य ; गावात खळबळ

मुंडगाव / प्रतिनिधी

शेतात घाम गाळून पिकविलेल्या सोयाबीनच्या उत्पन्नावर डोळा ठेवून असलेल्या शेतकऱ्याच्या स्वप्नांवर अज्ञात व्यक्तीने आगीच्या रूपाने घाला घातला. अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारुळा येथील शेतकरी महेश रामभाऊ मोहोकार यांच्या शेतातील चार एकरांतील सोयाबीनची गंजी अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याची धक्कादायक घटना घडली.

या आगीत सोयाबीनचे मोठे नुकसान झाल्याची माहिती असून, स्वतःच्या डोळ्यांसमोर कष्टाची कमाई जळताना पाहून शेतकरी मोहोकार यांना मोठा मानसिक धक्का बसला. त्यांची प्रकृती खालावल्याने उपस्थितांनी त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सायंकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. अज्ञात व्यक्तीने सोयाबीनच्या गंजीला चारही बाजूंनी आग लावल्याचे सांगण्यात येत आहे. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट दिसू लागल्याने गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

शेतकऱ्यांचे नुकसान ; घटनेमागील कारणाचा शोध आवश्यक

■ शेतातील सोयाबीनची गंजी जाळण्यामागे नेमके कारण काय, आग कोणी लावली आणि या कृत्यामागे कोणाचा हात आहे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. शेतकऱ्याच्या कष्टाचे पीक अशा प्रकारे जाळून टाकल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषी व्यक्तीचा शोध घेण्याची मागणी होत आहे.

टिळक गणेशोत्सव मंडळ जिल्ह्यात प्रथम

पातूर / प्रतिनिधी




महाराष्ट्र शासन आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या वतीने आयोजित महागणेशोत्सव स्पर्धेत पातूर येथील ढोणे नगरच्या लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळाने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून पातूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मंडळाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळाने गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, जनजागृती आणि वैचारिक प्रबोधनाला प्राधान्य दिले. मंडळाने सादर केलेल्या देखाव्यातून सामाजिक संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. याच कल्पकतेची आणि सामाजिक जाणीवेची दखल घेत मंडळाला जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले. या यशस्वी वाटचालीत विशाल राखोंडे यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते मंडळाला रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी मंडळाच्या अध्यक्षांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, 'हा सन्मान केवळ माझा किंवा मंडळातील मोजक्या पदाधिकाऱ्यांचा नसून, मंडळासाठी दिवस-रात्र मेहनत घेणाऱ्या प्रत्येक छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांचा आहे.

मुंडगावच्या नागरिकांची पाण्यासाठी वणवण

राजकुमार वानखडे



मुंडगाव : एका बाजूला वान धरण १०० टक्के भरलेले, तर दुसऱ्या बाजूला अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तब्बल १५ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे.

विशेष म्हणजे, याच ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेतून इतर गावांना पाच दिवसांच्या अंतराने पाणी मिळत असल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. मग मुंडगावातील नागरिकांनाच एवढ्या दीर्घ प्रतीक्षेचा सामना का करावा लागत आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. मुंडगाव हे तालुक्यातील मोठ्या गावांपैकी एक असून, येथील पाणीपुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत केला जातो. मात्र, गावातील नळांना १५ दिवसांनी पाणी सोडले जात असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्याचे नियोजन करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पाणीपट्टी देवूनही नियमित पाणीपुरवठा का नाही ?

■ मुंडगाव ग्रामपंचायतीकडून नागरिकांकडून पाणीपट्टी वसूल केली जाते. असे असतानाही पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत असल्याने ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामपंचायतीकडे पाणीपट्टीच्या माध्यमातून लाखो रुपयांचा निधी जमा होत असल्याचा दावा नागरिक करीत आहेत. मात्र, पाणीपुरवठ्याचे नियोजन, वितरणातील तफावत आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत, याबाबत संबंधित प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज आहे.

> येथील नागरिकांनी आतापर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी अनेक हालअपेष्टा सहन केल्या आहेत. मात्र, आता १५ दिवसांनी पाणी मिळत असल्याने अडचणी अधिकच वाढल्या आहेत. माझ्याकडेही पिण्याचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता केवळ सात ते आठ दिवसांची आहे. **– प्रा. मनोहर थारकर,** नागरिक, मुंडगाव

कामाचा ताण वाढला ; महापालिकेत ४० टक्के पदे रिक्त

अकोला / प्रतिनिधी



शहराचा विस्तार वेगाने होत असताना अकोला महानगरपालिकेतील मनुष्यबळाची कमतरता प्रशासकीय कामकाजासाठी आव्हान ठरत आहे. महापालिकेतील एकूण १ हजार ५०९ मंजूर पदांपैकी ५४३ पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने वर्ग-३ कर्मचाऱ्यांना प्रभारी जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागत आहेत. याचा परिणाम निर्णयप्रक्रिया, फाइल्सचा निपटारा आणि विभागीय कामकाजावर होण्याची शक्यता आहे.

आस्थापना खर्च अधिक असल्याचे कारण पुढे करून दीर्घकाळापासून नवीन भरती झालेली नसल्याने मनुष्यबळाचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढत्या शहराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने महापालिकेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. उपायुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे विजय पारतवार नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. विधी अधिकारी ॲड. श्याम ठाकूर तसेच नगर सचिवांसह तीन विभागांची जबाबदारी सांभाळणारे अनिल बिडवे हेही लवकरच सेवानिवृत्त होणार असल्याचे वृत्त आहे. त्यांच्या जागी वेळेत सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती न झाल्यास प्रशासनावरील ताण आणखी वाढण्याची शक्यता आहे. शहराचा विस्तार आणि नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेता रिक्त पदे भरणे, तांत्रिक कर्मचारी उपलब्ध करून देणे आणि विभागनिहाय कामकाज सक्षम करणे आवश्यक ठरत आहे.

रिक्त पदांची स्थिती

■ मंजूर पदे :	१,५०९
■ रिक्त पदे :	५४३
■ 'अ' वर्गातील मंजूर पदे :	२५
■ 'अ' वर्गातील कार्यरत अधिकारी :	४
■ अतिरिक्त आयुक्त :	१ पद रिक्त
■ उपायुक्त :	२ पदे रिक्त
■ सहायक आयुक्त :	५ पदे रिक्त
■ मुख्य लेखापरीक्षक :	१ पद
■ शहर अभियंता :	१ पद रिक्त

बार्शिटाकळीत रस्त्यालगत कचऱ्याचे ढीग ; सर्वत्र दुर्गंधी

बार्शिटाकळी / प्रतिनिधी

शहरातील काही भागांत रस्त्यालगत कचरा साचत असल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नियमित कचरा संकलन व वर्गीकरणाचा अभाव असल्याने दुर्गंधी आणि डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.

बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी पुरेशा कचराकुंड्या उपलब्ध करून नियमित स्वच्छता करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

अकोटमधील निराधारांना मानधनाची प्रतीक्षा

अक्षय पाटील

अकोट : तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार विभागाच्या कामकाजामुळे अपंग, विधवा, परितक्त्या, वृद्ध आणि निराधार लाभार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने लाभार्थ्यांना वारंवार तहसील कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याचे सांगण्यात येते.

ग्रामीण भागातील अनेक वृद्ध महिला आणि अपंग लाभार्थी आधार कार्ड व बँक पासबुक घेऊन सकाळपासून कार्यालयात प्रतीक्षा करत असल्याचे चित्र आहे. एका महिला लाभार्थीने आठ महिन्यांपासून पैसे मिळाले नसल्याची व्यथा मांडली. कर्मचारी आणि अधिकारी मात्र सुट्टी, सर्व्हर बंद किंवा निधी प्राप्त न झाल्याची कारणे देत असल्याचा आरोप आहे. दरमहा १,००० ते १,५०० रुपयांच्या मानधनावर अवलंबून असलेल्या लाभार्थ्यांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीची अकोला जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेऊन प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढावेत, थकीत मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे आणि संबंधित विभागाच्या कामकाजाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

एप्रिलपासून अर्ज प्रलंबित असल्याचा आरोप

■ सूत्रांच्या माहितीनुसार, एप्रिल २०२६ पासून संजय गांधी, श्रावणबाळ, विधवा आणि अपंग योजनांसाठी शेकडो नवीन अर्ज दाखल झाले आहेत. मात्र, या अर्जांवर निर्णय न झाल्याने अनेक लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित असल्याचे सांगण्यात येते.

रस्त्यांवर आता एआय कॅमेऱ्यांची नजर



अकोला / प्रतिनिधी

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नजर ठेवली जाणार आहे. अकोला प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ताफ्यात मोबाइल एन्फोर्समेंट ट्रॅकिंग सिस्टिम (एमटीईएस) दाखल झाली आहे.

एआय कॅमेरे, स्पीड रडार आणि वाहनांच्या नंबर प्लेटची स्वयंचलित ओळख करणाऱ्या यंत्रणेने सुसज्ज या वाहनामुळे वाहतूक नियमभंगाची नोंद घेऊन संबंधित वाहनधारकांवर कारवाई करणे अधिक सुलभ होणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांत अकोला आरटीओने जिल्ह्यातील २ हजार ९३८ वाहनांवर कारवाई केली.

यातून १ कोटी ६ लाख १८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. आता एमटीईएस प्रणालीमुळे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवता येणार आहे. वाहतूक नियमभंग आढळल्यास संबंधित घटनेची छायाचित्रे आणि सुमारे १० सेकंदांचा व्हिडिओ तारीख, वेळ व ठिकाणाच्या नोंदीसह नियंत्रण कक्षाला पाठविला जातो. त्यानंतर वाहनाची माहिती व कागदपत्रांची तपासणी करून छायाचित्रांसह ई-चालान पाठविण्याची प्रक्रिया केली जाते. अत्याधुनिक यंत्रणेमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. मात्र, अपघात टाळण्यासाठी हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे प्रत्येक वाहनचालकासाठी आवश्यक आहे.

> सध्या अकोला-नागपूर बायपास, मूर्तिजापूर मार्ग आणि शहरातील अपघातप्रवण ठिकाणी एमटीईएस वाहन तैनात करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात अकोट, बाळापूर, पातूर, तेल्हारा आणि बार्शीटाकळी या तालुक्यांमध्येही टप्प्याटप्प्याने फिरती कारवाई सुरू करण्याचे नियोजन आहे. जिल्ह्यातील कारवाई प्रभावीपणे नियंत्रित करण्यासाठी अकोला येथे स्वतंत्र कंट्रोल रूम उभारण्याचाही प्रस्ताव आहे.
> **– रवींद्र भुयार,** प्रादेशिक परिवहन अधिकारी

ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शन ; रेल्वे स्टेशन चौकातून निघणार मिरवणूक

समतेचा जयघोष, धम्मविचारांचा जागर!

अकोला / प्रतिनिधी

समतेचा विचार, सामाजिक न्यायाचा निर्धार आणि बहुजनांच्या स्वाभिमानाचा बुलंद आवाज! अशा प्रेरणादायी वातावरणात अकोला शहरात बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित या धम्म मेळाव्यात ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शन लाभणार असून, प्रा. अंजली आंबेडकर, डॉ. भीमराव य. आंबेडकर आणि युवा नेते सुजातदादा आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. १९८४ मध्ये सुरू झालेल्या या परंपरेचे यंदा ४२ वे वर्ष असून, यानिमित्ताने मिरवणूक, पारंपरिक कलांचे सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि धम्मविचारांचा जागर अनुभवण्याची संधी समाजबांधवांना मिळणार आहे. क्रिकेट क्लब मैदान, रेल्वे स्टेशन रोड येथे मुख्य मेळावा होणार असून, या सोहळ्याच्या आयोजनासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविणे, वंचित-बहुजन समाजात स्वाभिमानाची जाणीव आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक करणे, हा या मेळाव्यामागील प्रमुख उद्देश आहे. क्रिकेट क्लब मैदानावर सायंकाळी ६ वाजता मुख्य धम्म मेळाव्याला सुरुवात होईल. भारतीय बौद्ध महासभेचे अकोला जिल्हाध्यक्ष पी. जे. वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.

मिरवणुकीतून धम्मविचारांचा जागर ; शहरातून निघणार शोभायात्रा

■ बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता रेल्वे स्टेशन चौकातून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होईल. शिवाजी महाविद्यालय, अकोट स्टँड, मानेक टॉकीज, मंगलदास मार्केट, सिटी कोतवाली, गांधी चौक आणि बसस्थानक टॉवर मार्गे ही मिरवणूक क्रिकेट क्लब मैदानावर पोहोचेल. मिरवणुकीत जिल्ह्यातील विविध आखाडे, लेझीम पथके, पारंपरिक देखावे, वाद्यवृंद, बँड पथके, घोडे आणि समता सैनिक दलाचे शिस्तबद्ध पथसंचलन ही प्रमुख आकर्षणे असतील. सजविलेल्या धम्मरथातून मिरवणुकीचे नेतृत्व केले जाणार आहे. शहरातील विविध जाती-समुदाय, व्यापारी आणि प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने मिरवणुकीचे स्वागत करण्यात येणार आहे. मिरवणुकीच्या माध्यमातून सामाजिक एकात्मता, बंधुभाव आणि समतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

२० स्वतंत्र समित्यांचे गठन

■ मिरवणूक आणि मुख्य धम्म मेळावा शिस्तबद्ध, शांततापूर्ण आणि यशस्वीरीत्या पार पडावा, यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने २० स्वतंत्र समित्यांचे गठन करण्यात आले आहे. प्रत्येक समितीवर विशिष्ट जबाबदारी सोपविण्यात आली असून, कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पदाधिकारी आणि कार्यकर्ते नियोजनबद्ध पद्धतीने काम करीत आहेत.

न्यूज ब्रीफ

३० वर्षीय तरुणाचा मृतदेह

जळगाव जामोद : शहरातील स्मशानभूमीत एका ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची घटना रविवार, १८ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. राजेंद्र प्रल्हाद इंगळे (३०) रा. वाडी खुर्द, ता. जळगाव जामोद असे मृत तरुणाचे नाव आहे. दारूच्या अतिसेवनामुळे त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांच्या नोंदीत नमूद करण्यात आली आहे. राजेंद्र इंगळे हा रविवारी सकाळी जळगाव जामोद येथील स्मशानभूमीत मृतावस्थेत आढळून आला. त्याचा भाऊ दीपक प्रल्हाद इंगळे (३७) रा. बोचरे नगर, वाडी खुर्द यांनी यासंदर्भात पोलिसांत तक्रार दिली. या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मद्यपी वाहन चालकांवर कारवाई

मलकापूर : दारूच्या नशेत दुचाकी अनियंत्रितपणे चालविणाऱ्या संजय देवराव ढोले (४३) रा. बारादरी, मलकापूर याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी रेल्वे स्टेशन ते तहसील चौक मार्गावर घडली. पोलिस अंमलदार कैलास सोनुने शहरात वाहतूक नियमनाची ड्युटी करीत असताना, संजय ढोले हा दुचाकी अनियंत्रितपणे चालविताना आढळला.

बीएसएनएल कर्मचाऱ्यांचे धरणे!

मलकापूर : दूरसंचार विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा प्रलंबित महागाई भत्ता अद्याप जाहीर करण्यात न आल्याच्या निषेधार्थ सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या सदस्यांनी १६ ऑक्टोबर रोजी सकाळी मलकापूर येथील बीएसएनएल कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. केंद्र सरकारने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा देय महागाई भत्ता जाहीर करून त्याचा लाभ द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी यावेळी केली.

विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम

शेगाव : विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थाविषयी जागरूकता निर्माण करून व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यासाठी सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे शनिवारी जनजागृती कार्यक्रम पार पडला. संस्थेचे अध्यक्ष सागर फुंडकर व उपाध्यक्ष ॲड. आकाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमाला लोहमार्ग पोलिस विभागाचे किरण आघाव, गजानन मेटांगे, विकास मुंढे, प्राचार्य डॉ. अनंत कुळकर्णी आणि डॉ. पी. डी. पल्हाडे उपस्थित होते. यावेळी किरण आघाव यांनी अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

दोन कुटुंबात हाणामारी; पाच जखमी

नांदुरा : तालुक्यातील सांगवा येथे जुन्या वादातून दोन कुटुंबांत झालेल्या खूनी संघर्षामध्ये दोन्ही बाजूंच्या पाच जण जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारींवरून एकूण १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सांगवा येथे ही घटना घडली. १७ ऑक्टोबरच्या वादाचा राग मनात धरून एका गटाने घरात घुसून मारहाण केली, तर दुसऱ्या गटावर रस्त्यावरील बांधकामाच्या कारणावरून प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हाणामारीत दोन्ही बाजूंचे पाच जण गंभीर जखमी झाले असून, एका गटाकडून पोउपनि नितीन चव्हाण तर दुसऱ्या गटाकडून उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माच्छरे पुढील तपास करत आहेत.

खामगावात खरेदीसाठी नागरिकांची गर्दी: शेतकऱ्यांमध्ये नाराजी

झेंडूचे दर घसरले; ३० ते ४० रुपये किलो दराने फुलांची विक्री

खामगाव / प्रतिनिधी

अवघ्या काही तासांवर येऊन ठेपलेल्या विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या सणासाठी खामगाव शहरासह परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या मंगलमयी आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या सणाच्या पार्श्वभूमीवर खामगाव येथील मुख्य बाजारपेठेत नागरिकांची खरेदीसाठी अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळत आहे. सणाच्या काळात घरादाराला व वाहनांना तोरण बांधण्यासाठी आणि पूजेसाठी झेंडूच्या फुलांना विशेष मागणी असते. मात्र, यंदा बाजारपेठेत झेंडूच्या फुलांची आवक प्रमाणापेक्षा जास्त झाल्यामुळे फुलांचे दर कमालीचे घसरले आहेत. सध्या शहरात अवघ्या ३० ते ४० रुपये प्रतिकिलो दराने झेंडूच्या फुलांची विक्री सुरू आहे.

दसऱ्याच्या पूर्वसंध्येला खामगाव येथील मेन रोड, शहर पोलीस स्टेशन रोड, नांदुरा रोड मुख्य रस्ते, भाजी बाजार आणि फरशी परिसर झेंडूच्या फुलांनी फुलून गेला आहे. आसपासच्या ग्रामीण भागातून आणि स्थानिक शेतकऱ्यांकडून सकाळीच शेकडो गाड्यांमधून पिवळ्याधमक आणि नारंगी रंगाच्या झेंडू फुलांची आवक झाली. यावर्षी हवामान अनुकूल राहिल्याने झेंडूचे उत्पादन उत्तम झाले असून, शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने आपला माल विक्रीसाठी खामगावच्या बाजारपेठेत आणला आहे.

परंतु, अचानक झालेल्या प्रचंड आवकीमुळे फुलांचे दर कमी केले आहेत. अशी माहिती शहर पोलीस स्टेशन जवळील फुलविक्रेता गोविंदा यांनी दिली.



नागरिकांमध्ये उत्साह, खरेदीसाठी झुंबड

■ मागील काही दिवसांत किंवा इतर सणांच्या वेळी झेंडूचे दर १०० ते १५० रुपये किलोपर्यंत पोहोचले होते. मात्र, दसऱ्याच्या तोंडावर फुलांचे दर ३० ते ४० रुपये किलोवर आल्याने सर्वसामान्य ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्वस्त दरात फुले उपलब्ध झाल्याचे समजताच शहरातील नागरिकांनी फुलांच्या दुकानांवर खरेदीसाठी एकच झुंबड उडवली. तोरणासाठी, गाड्यांच्या व घराच्या सजावटीसाठी लोक किलोच्या हिशेबाने भरभरून फुले खरेदी करताना दिसत आहेत.

शेतकऱ्यांच्या पदरी निराशा

■ दुसरीकडे, दर घसरल्यामुळे उत्पादक शेतकरी मात्र काहीसे चिंतेत सापडले आहेत. सणाच्या काळात चांगला भाव मिळेल आणि चार पैसे जास्त मिळतील या अपेक्षेने शेतकरी वर्ग मोठ्या आशेने खामगावात आला होता. परंतु, आवक वाढल्याने लागवड आणि वाहतुकीचा खर्च निघणेही कठीण झाले आहे. बाजारात आलेला माल परत नेणे शक्य नसल्याने शेतकऱ्यांना मिळेल त्या दरात फुलांची विक्री करावी लागत आहे. दर घसरले असले तरी बाजारातील या फुलोऱ्यामुळे आणि ग्राहकांच्या गर्दीमुळे खामगाव शहरात विजयादशमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

काँग्रेस कमिटीचे राज्यपालांना निवेदन

खामगाव / प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खामगाव विधानसभा कमिटीच्या वतीने आज, १९ ऑक्टोबर रोजी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत महामहिम राज्यपाल यांच्या नावे उपविभागीय अधिकारी महसूल यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआयआर व निवडणुकीसंदर्भात एकतर्फी निर्णय घेऊन मनमानी कारभार केल्याचा गंभीर आरोप त्यांच्याच सहकाऱ्यांनी केला असल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. या प्रकारामुळे देशभरात लोकशाही धोक्यात आल्याची भावना निर्माण झाली असून ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जनतेत तीव्र रोष पसरला आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात विरोधी पक्षांसह युवक रस्त्यावर उतरून आंदोलने करत आहेत. आपल्या पदाचा गैरवापर करणाऱ्या ज्ञानेश कुमार यांना या उच्च संवैधानिक पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही, त्यामुळे त्यांनी तत्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी काँग्रेस पक्षाने या निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर भाराकाँचे विधानसभा समन्वयक ज्ञानेश्वर पाटील, तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, शहराध्यक्ष स्वप्नील ठाकरे, शहर कार्याध्यक्ष किशोर भोसले, काँग्रेस नेते धनंजय देशमुख, गौतम गवई आदी पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख सह्या आहेत.

कोलते महाविद्यालयात 'माय हेल्थ, माय प्राईड' अंतर्गत योग व ध्यान उत्साहात

मलकापूर/ प्रतिनिधी

स्थानिक पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयात 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत १०० डेज संकल्प अभियान' अंतर्गत 'माय हेल्थ, माय प्राईड' या संकल्पनेवर आधारित योग व ध्यान कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन बोरले यांनी विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवा वर्ग सुदृढ, सक्षम व व्यसनमुक्त असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. युगेश खर्चे यांनी राष्ट्रउभारणीत युवकांच्या भूमिकांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. देविदास देरेगाव यांनी व्यसनाधीनतेच्या समस्येवर प्रकाश टाकत निरोगी जीवनशैलीचे उपाय स्पष्ट केले. याप्रसंगी योगगुरू अविनाश पाटील यांनी योगासनांचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांकडून विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून घेतली.

मानसिक स्थैर्य आणि आत्मविश्वासासाठी योग अत्यंत प्रभावी असल्याचे त्यांनी सांगितले. सदर उपक्रम प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांच्या नेतृत्वाखाली तसेच एनएसएस जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हनुमंत भोसले, विद्यापीठाचे एनएसएस संचालक प्रा. निलेश कडू व प्रादेशिक संचालक अजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमास लोकसेवक शिक्षण बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष ज्ञानदेव पाटील व खजिनदार सुधीर पाचपांडे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता भोळे हिने केले. या प्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हार्वेस्टर मध्ये हात अडकल्याने तरुणाचा मृत्यू

नांदुरा : सोयाबीन काढणीचे काम सुरू असताना हार्वेस्टर मशीनमध्ये हात अडकल्याने ३३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना १८ ऑक्टोबर रोजी दुपारी कोलासर गावाजवळील शेतात घडली. विशाल चोपडे (३३) रा. कोलासर असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे कोलासर परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोलासर गावाजवळील शेतात हार्वेस्टर मशीनच्या साहाय्याने सोयाबीन काढणीचे काम सुरू होते. काढणीच्या कामासाठी विशाल चोपडे आला होता. हार्वेस्टर मशीनच्या साहाय्याने काढणीचे काम सुरू असताना अचानक विशाल चोपडे यांचा हात मशीनमध्ये अडकला. या दुर्घटनेत त्यांना गंभीर दुखापत झाली. फाउंडेशनच्या सदस्यांनी जखमी युवकाला तातडीने उपचारासाठी नांदुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले; मात्र त्यांचा मृत्यू झाला.

माळी समाज उपवर युवक-युवती परिचय संमेलन ३ जानेवारीला

जळगाव जामोद / प्रतिनिधी

जळगाव जामोद व संग्रामपूर तालुका महात्मा फुले माळी समाज मंडळाच्या वतीने उपवर युवक-युवती परिचय संमेलनाचे आयोजन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती पर्वावर रविवार, ३ जानेवारी २०२७ रोजी सातपुडा कॅम्पस, जळगाव जामोद येथे करण्यात आले आहे.

संमेलनाच्या पूर्वतयारीसाठी रविवारी १८ ऑक्टोबर माजी आमदार कृष्णराव इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. यामध्ये संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वानुमते नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली. अध्यक्षपदी कैलास ओंकार घुटे पिंपळगाव काळे, कार्याध्यक्षपदी कृष्णा घाटे संग्रामपूर, उपाध्यक्षपदी विजय म्हसाळ व श्रीराम निमकर्डे, कोषाध्यक्षपदी श्रीकृष्ण खिरोडकर, तर सचिवपदी संतोष वानखडे यांची निवड करण्यात आली.

माजी आमदार कृष्णराव इंगळे यांच्या प्रेरणेतून गेल्या ३८ वर्षांपासून हे परिचय संमेलन नियमित आयोजित केले जाते. उपवर युवक-युवतींना विवाहासाठी योग्य जोडीदार निवडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. या संमेलनात समाजातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या बैठकीला प्रा. भाऊसाहेब इंगळे, डॉ. शेषराव भोपळे, पांडुरंग वेरूळकर, महादेवराव घुटे यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक नितीन सातव यांनी केले.



वन्यप्राण्याच्या हल्ल्यात तीन जनावरांचा मृत्यू

खामगाव : तालुक्यातील वाडी येथील सप्तशृंगी नगरमध्ये सुदाम घनोकार यांच्या गोठ्यात वन्यप्राण्याने घुसून जनावरांवर भीषण हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्ल्यात तीन जनावरांचा जागीच मृत्यू झाला असून, शेतकरी सुदाम घनोकार यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. जखमांचे स्वरूप पाहता हा हल्ला बिबट्या किंवा तरसाने केल्याची शक्यता वर्तवली जात आहे; मात्र, हल्लेखोर प्राणी नेमका कोणता होता, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे परिसरात तीव्र घबराट पसरली आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून बाधित शेतकऱ्याला मदत द्यावी आणि वन्यप्राण्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

डीजेच्या आवाजामुळे श्रवणशक्ती गमविलेल्या चिमुकलीच्या मदतीला धावले अशांत वानखडे

खामगाव / प्रतिनिधी

मलकापूर - येथील दुर्गा उत्सव मिरवणुकीत वाजणाऱ्या कर्कश डीजेच्या आवाजामुळे मातामहाकाली नगर येथील चिमुकली आरोही उर्फ चैताली सोनवणे हिने आपली श्रवणशक्ती गमावली. या घटनेची गंभीर दखल घेत प्रभागाचे रहिवासी, शिक्षण सभापती तथा 'समतेचे निळे वादळ'चे संस्थापक भाई अशांत वानखेडे यांनी तात्काळ सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेतला.

त्यांनी बालिकेला 'निनाद स्पीच अँड हिअरिंग क्लिनिक, जळगाव' येथे नेऊन डॉ. गौरव पाटील यांच्याकडे तपासणी घडवून आणली व पुढील उपचारांची जबाबदारी डॉ. भावना पाटील यांच्याकडे सोपवली. भाई अशांत वानखेडे यांच्या या संवेदनशील व कौतुकास्पद कार्याची दखल घेत संत गाडगेबाबा विचार मंचतर्फे अध्यक्ष राजाभाऊ कंडारकर यांनी १८ ऑक्टोबर रोजी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ, फेटा, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. या प्रसंगी रमेश उमाळकर, दयाळू चव्हाण, शरद करांडे, भिकाजी कठोरकर, विजय सोनोने, अतुल सातव पाटील, प्रमोद कंडारकर, शांताराम काडेलकर आणि करूणा मुळे उपस्थित होते.



गो. से. महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिवस' उत्साहात साजरा

खामगाव : स्थानिक गो. से. महाविद्यालयात माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिवस' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स हॉल' मध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत विविध विषयांवरील दुर्मिळ व प्रेरणादायी पुस्तकांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. डी. एन. व्यास उपस्थित होते.

दुष्काळात चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशिक्षण

जळगाव जामोद : दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चाऱ्याचे नियोजन कसे करावे, उपलब्ध चाऱ्याची पौष्टिकता कशी वाढवावी आणि दूध उत्पादन सातत्यपूर्ण कसे ठेवावे, याबाबत ग्राम उसरा येथे पशुपालकांना प्रशिक्षण देण्यात आले. तालुका लघु सर्व पशु चिकित्सालय आणि कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने १६ ऑक्टोबर रोजी एकदिवसीय प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला.

तालुका लघु सर्व पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. उदय देशमुख यांनी दुष्काळी परिस्थितीत जनावरांची घ्यावयाची काळजी, आहार व्यवस्थापन आणि पशुधनाचे आरोग्य जपण्याबाबत मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. विनोद जानोतकर यांनी मुरघास म्हणजे काय, तो तयार करण्याच्या विविध पद्धती, त्यासाठी उपयुक्त पिके, मुरघासाचे फायदे, निर्मितीदरम्यान घ्यावयाची काळजी आणि तयार मुरघासाची गुणवत्ता कशी ओळखावी, याची माहिती दिली. डॉ. सोमेश गायकवाड, पशुधन विकास अधिकारी, जळगाव जामोद, डॉ. नयना सिंग, पशुधन विकास अधिकारी, जामोद यांनी हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादन आणि अझोला या पूरक पशुखाद्याच्या निर्मितीविषयी माहिती दिली.

वीर हनुमान मंडळाला गणेशोत्सव स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार

खामगाव / प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय गणेशोत्सव स्पर्धेत शंकर नगर (शिवगड) येथील 'वीर हनुमान मंडळाने' प्रथम पारितोषिक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेसाठी मंडळाचे संस्थापक सदस्य जसवंतसिंघ शीख यांनी आखलेली योग्य रणनीती आणि सूक्ष्म नियोजन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. मंडळाचे अध्यक्ष प्रमोद उस्ताद यांच्या सक्षम नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने घेतलेल्या अथक परिश्रमांचे फळ या पुरस्काराच्या रूपाने मिळाले आहे. या यशात समाधान, नारायण पुरुषोत्तम सातव, राजू कोल्हे, शंकर, भास्कर, शेख रईस, शेख शहीद, शेख वसीम, शेख युनुस, शेख इम्रान, सोनू ठाकूर, श्याम कोथळकर, पंकज डावंगे, संजय माने, शांताराम, बबलू जैन, ॲड. परमसिंघ, शौर्य इंगळे, निखिल, शुभम चंदन आणि प्रशांत वानखेडे यांच्यासह मंडळातील सर्व कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले. गणेशोत्सवातील उत्कृष्ट नियोजन, नागरिकांचा सामूहिक सहभाग, कडक शिस्त आणि कार्यकर्त्यांचे समर्पण यांमुळेच हे यश शक्य झाल्याची भावना मंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. या तालुकास्तरीय प्रथम पुरस्कारामुळे मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असून संपूर्ण परिसरातून मंडळावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शिवसेना उबाठाचे गजानन वाघ यांचा इशारा

हेक्टरी १ लाखांची मदत न दिल्यास समृद्धी महामार्ग बंद करणार

जळगाव जामोद / प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची तातडीची मदत न मिळाल्यास समृद्धी महामार्गावर रास्ता रोको करून महामार्ग ठप्प केला जाईल, असा सडेतोड इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बुलढाणा जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी दिला आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

३० सप्टेंबर रोजी खामगाव येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला होता. यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी हेक्टरी १ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. परंतु, शासनाने हेक्टरी केवळ ५ हजार रुपयांची तुटपुंजी मदत जाहीर केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

सातत्याने पडणारा दुष्काळ, वाढता शेती उत्पादन खर्च आणि महागाईमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा वेळी कमी मदत देऊन सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची टीका शिवसेनेने केली आहे. या निवेदनावर जिल्हाप्रमुख गजानन वाघ, दत्ता पाटील, तुकाराम काळपांडे, मुश्ताक भाईजान, भिमराव पाटील, विशाल पाटील, रमेश ताडे, कैलास राजपूत, महादेव इंगळे व संतोष डब्बे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलनावर ठाम

■ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी हे आंदोलन उभारण्यात येत असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. ३० ऑक्टोबर पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर १ लाख रुपयांची मदत जमा करण्याबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास समृद्धी महामार्ग बंद पाडणार, असा स्पष्ट इशारा गजानन वाघ यांनी दिला आहे. यापूर्वी आमदार नितीन देशमुख, आमदार सिद्धार्थ खरात, प्रवक्त्या जयश्री शेळके व जालिंदर बुधवंत यांनीही याच मागणीसाठी आंदोलनाचा इशारा दिला होता.

दैनिक
महाभूमि

वाशिम भूमि

आज दसरा

मंगळवार । २० ऑक्टोबर २०२६
dainikmahabhoomi@gmail.com



न्यूज ब्रीफ

दसऱ्याच्या खरेदीवर दुष्काळाचे सावट

वाशिम : दसऱ्यानिमित्त वाशिमची बाजारपेठ सजली असून, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी कपडे, मोबाइल व इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंवर विविध ऑफर दिल्या जात आहेत. मात्र, यंदाच्या कोरड्या दुष्काळामुळे नागरिकांच्या खरेदी क्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता असून, बाजारात मंदीचे संकेत दिसत आहेत.

रस्त्यासाठी बंडू वानखेडेंचे स्मरणपत्र

रिसोड: पिंगळाक्षी देवी मंदिराकडे



जाणाऱ्या रस्त्याचे अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नगरसेवक तथा गटनेते बंडू रामकिसन वानखेडे यांनी नगरपरिषदेकडे स्मरणपत्राद्वारे केली आहे. रस्त्यावरील खड्डे, खडी व दगडांमुळे नागरिक आणि भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. झाडांच्या फांद्यांमुळेही वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. रस्त्याची दुरुस्ती, खडी हटविणे आणि झाडांच्या फांद्यांची छाटणी करून कार्यवाहीचा अहवाल द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पंढरी मांदळकर यांचे मरणोत्तर नेत्रदान

वाशिम: रिसोड तालुक्यातील केशवनगर येथील पंढरी वसंता मांदळकर (वय ३१) यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी मरणोत्तर नेत्रदानाचा निर्णय घेतला. संकलित नेत्रगोलके शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. या नेत्रदानामुळे कॉर्नियाशी संबंधित अंधत्व असलेल्या रुग्णांना दृष्टी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्रशल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर आणि डॉ. डाखोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे, नेत्रचिकित्सा अधिकारी सुधीर साळवे आणि ओम राऊत यांनी नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली.

आपट्याच्या पानांवर तंबाखूविरोधी संदेश

वाशीम : विजयादशमीनिमित्त श्री बाकलीवाल विद्यालयातील एनसीसी कॅडेट्सनी आपट्याच्या पानांवर तंबाखूविरोधी संदेश लिहून जनजागृती केली. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आयोजित उपक्रमात ७५ विद्यार्थ्यांनी तंबाखूविरोधी पोस्टर स्पर्धेत सहभाग घेतला. अनुजा काकडे हिने प्रथम, श्रावणी आकरे हिने द्वितीय, तर समीक्षा घुगे हिने तृतीय क्रमांक पटकाविला. गंगोत्री इंगळे व गणेश टेकाळे यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी तंबाखूमुक्त महाराष्ट्राचा संकल्प करीत व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली.

शिक्षक भारतीचे उमेदवार सुरेश देवकरांसाठी जिल्ह्यात जोरदार मोर्चेबांधणी

वारं फिरलंय, शिक्षकांचं ठरलंय! सुरेश देवकरांना वाढता पाठिंबा

वाशिम / प्रतिनिधी

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदानाचे अवघे तीन दिवस शिल्लक राहिल्याने प्रचाराला वेग आला आहे. निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात शिक्षक भारतीचे उमेदवार सुरेश देवकर यांच्या प्रचाराने वाशिम जिल्ह्यात जोर धरला असून, शिक्षक मतदारांच्या भेटीगाठी आणि प्रत्यक्ष संवादातून त्यांच्या समर्थनार्थ वातावरण निर्मिती केली जात आहे. विविध शाळा, महाविद्यालये तसेच शिक्षकांच्या बैठकांमधून देवकर यांना वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे.

शिक्षक भारतीचे वाशिम जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते सुरेश देवकर यांच्या प्रचारासाठी सक्रिय झाले आहेत. जिल्ह्यातील विविध भागांत शिक्षक मतदारांशी संपर्क साधण्यावर भर दिला जात आहे. शाळा आणि महाविद्यालयांना भेटी देऊन शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या जात आहेत. तसेच ठिकठिकाणी कोपरा बैठका आयोजित करून देवकर यांच्या उमेदवारीमागील भूमिका आणि शिक्षकांच्या प्रश्नांबाबतची त्यांची बांधिलकी मतदारांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. शनिवारी झालेल्या प्रचारसभेला शिक्षकांची उपस्थिती लाभल्याने प्रचारकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सुरेश देवकर यांच्या समर्थकांचा आत्मविश्वास वाढला आहे.



अखेरच्या टप्प्यातील हालचालींना वेग

■ मतदानाला काही दिवसच शिल्लक असल्याने प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक मतदारांच्या वैयक्तिक भेटी, लहान बैठका आणि प्रत्यक्ष संवादातून मतांचे समीकरण आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. वाशिम जिल्ह्यातून मिळत असलेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीत बदलाचे वारे वाहत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षक प्रतिनिधीची अपेक्षा

■ शिक्षकांच्या अडचणी, जुनी पेन्शन, शाळा अनुदान, वेतन, सेवा विषयक प्रश्न आणि शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांची प्रत्यक्ष जाणीव असणारा प्रतिनिधी विधान परिषदेत असावा, अशी अपेक्षा शिक्षक मतदारांकडून व्यक्त होत आहे. सुरेश देवकर यांनी २० ते २२ वर्षे शिक्षक म्हणून काम केल्याने त्यांना शिक्षकांच्या प्रश्नांची जाण आहे, हा मुद्दा त्यांच्या प्रचारात ठळकपणे मांडला जात आहे. शिक्षकांच्या अनुभवातून आलेले प्रश्न आणि त्यांच्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी शिक्षकांमधून पुढे आलेल्या उमेदवाराला संधी द्यावी, अशी भूमिका त्यांच्या समर्थकांकडून मांडली जात आहे.

संघटनात्मक ताकदीवर प्रचाराचा भर

■ राजकीय पक्षांच्या उमेदवारांऐवजी शिक्षकांच्या प्रश्नांशी थेट संबंध असलेल्या संघटनात्मक उमेदवाराला प्राधान्य देण्याची भूमिका शिक्षक मतदारांकडून व्यक्त होत आहे. शिक्षक भारतीच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रचाराला विविध शिक्षक संघटनांकडून मिळणारा पाठिंबा हा सुरेश देवकर यांच्या प्रचारातील महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे. त्यामुळे अंतिम टप्प्यात मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी संघटनात्मक यंत्रणा अधिक सक्रिय झाली आहे.



निवडणूक आयोगाच्या निषेधार्थ काँग्रेसची रॅली

'मत वाचवा, देश वाचवा'चा नारा

वाशिम / प्रतिनिधी

'मत वाचवा, देश वाचवा' आणि 'संविधान वाचवा, लोकशाही वाचवा'चा नारा देत वाशिम तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी शहरात मोटारसायकल रॅली काढण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या देशव्यापी जनआंदोलनाचा भाग म्हणून आयोजित या रॅलीतून मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून रॅलीला सुरुवात झाली. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजू चौधरी, प्रदेश सरचिटणीस ॲड. दिलीपराव सरनाईक, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सागर गोरे आणि तालुकाध्यक्ष गजानन गोटे यांच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. या रॅलीला काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन उज्ज्वल देशमुख यांनी केले, तर आभार सुरेश रत्नपारखी यांनी मानले.

निवडणूक आयोगाच्या कारभाराचा निषेध

■ निवडणूक आयोगाच्या कारभारावर आक्षेप घेत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर केले. निवडणुका स्वतंत्र व निष्पक्षपणे पार पाडण्याबाबत प्रश्न उपस्थित करत आयोग सत्ताधारी पक्षाच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी संविधानातील मतदानाच्या अधिकारासंदर्भातील कलम ३२६ चे वाचन करण्यात आले.

विद्या शिंदेची राज्यस्तरीय गोळाफेक स्पर्धेसाठी निवड

लोणी बु. / प्रतिनिधी

रिसोड तालुक्यातील लोणी बु. येथील श्री सखाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. विद्या नारायण शिंदे हिची राज्यस्तरीय गोळाफेक स्पर्धे साठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे विद्यालयासह लोणी बु. गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरातून तिचे कौतुक होत आहे.



विद्याने गोळाफेक क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत मजल मारली. तिच्या या यशामागे सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा आहे. विद्यालयाचे प्राचार्य कल्याण जोशी, क्रीडाशिक्षक व शिक्षकवृंद यांनी तिला मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची क्षमता असल्याचे विद्याने आपल्या यशातून दाखवून दिले आहे. तिच्या राज्यस्तरीय निवडीमुळे विद्यालयासह परिसरातील क्रीडाप्रेमींकडून तिचे कौतुक होत आहे.

अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची तक्रार

वाशिम / प्रतिनिधी

मालेगाव तालुक्यातील एका गावातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याप्रकरणी शिरपूर पोलिसांनी १८ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, १७ ऑक्टोबरच्या रात्री ८ ते १८ ऑक्टोबरच्या सकाळी ५ वाजेदरम्यान मुलगी घरातून बेपत्ता झाल्याचे लक्षात आले. नातेवाइकांकडे शोध घेऊनही ती न सापडल्याने, एका तरुणाने तिला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रमोद नवघरे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नवदुर्गा विसर्जनासाठी प्रशासन सज्ज

जिल्ह्यात २१ ते २३ ऑक्टोबर दरम्यान मिरवणुका

वाशिम / प्रतिनिधी


जिल्ह्यात २१ ते २३ ऑक्टोबरदरम्यान नवदुर्गा मूर्तींच्या विसर्जन मिरवणुका निघणार आहेत. या पार्श्वभूमीवर शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणुकांदरम्यान अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी २१ ते २३ ऑक्टोबर या कालावधीत नवदुर्गा मंडळांच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये लेझर लाईटच्या वापरावर निर्बंध घातले आहेत. प्रखर लेझर किरणांमुळे डोळ्यांना इजा होण्याची तसेच कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

याशिवाय विसर्जन मिरवणुकीतील वाहनांवर तलवार, त्रिशूल, भाला, कोयता, विळा, दांडपट्टा आणि कट्यार यांसारखी धारदार व घातक शस्त्रे लावण्यास तसेच सार्वजनिक ठिकाणी त्यांचे प्रदर्शन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

■ विसर्जन सोहळ्यांच्या काळात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त राहणार आहे. मंडळांनी प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे. प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



बसची दुचाकीला धडक ; चालकावर गुन्हा दाखल

कारंजा / प्रतिनिधी

कारंजा-दरव्हा मार्गावर बसने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी बसचालक दिनेश कुडमेथ याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला. फैजल खान अयुब खान यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे मोठे भाऊ वाजिद खान हे दुचाकीने बोडेगावकडे जात असताना कारंजा-दरव्हा मार्गावर बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात त्यांच्या उजव्या खांद्याला, डोक्याला तसेच हात-पायाला दुखापत झाली. दुचाकीचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

रामनगरात दुर्गामाता आरती सोहळा उत्साहात

रिसोड / प्रतिनिधी

शहरातील रामनगर परिसरात जय बजरंग उत्सव मंडळाच्या वतीने १८ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता दुर्गामातेच्या आरतीचे आयोजन करण्यात आले होते. ॲड.नकुल देशमुख यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी नागरिकांसह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, नगरसेवक आणि मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रसंगी गजानन लाटे, सागर डांगे, मयूर नकवाल, बाळू केदारे, स्वप्निल इरतकर, गणेश भांदुर्गे, विकास झुंजुरे आणि सुनील जुमडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. भाजपचे रिसोड शहर महामंत्री संदीप गुंजकर, सुरज गुंजकर, आकाश मुदळकर, चेतन गुंजकर, अरुण कुसळकर, अरुण गुंजकर आणि दादू जाधव यांच्यासह जय बजरंग उत्सव मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आरती सोहळ्यामुळे रामनगर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



सैनिक शाळेचे दोन्ही रोल बॉल संघ विभागस्तरावर

वाशिम / प्रतिनिधी

सुपखेला येथील यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शालेय जिल्हास्तरीय रोल बॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत शाळेच्या १४ व १७ वर्षांखालील मुलांच्या दोन्ही संघांची विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तथा जिल्हा क्रीडा कार्यालय, वाशिम यांच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुलात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये शाळेच्या दोन्ही संघांनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत विभागस्तरावर धडक मारली. १४ वर्षांखालील संघात आर्यन धुळधुळे, अंश धुळधुळे, अमर दळवी, विश्वधन ठाकरे, अंश काळे, भावेश काळे, वेदांत गायकवाड, पियुष वट्टमवार, प्रथमेश भिसे राठोड आणि दिपराज मेश्राम यांचा समावेश आहे. तर १७ वर्षांखालील संघात प्रयास घुगे, अमित देशमुख, वरद देवसरकर, रणवीर इंगळे, राजदीप घुगे, पार्थ चव्हाण आणि कुणाल खाडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे, सचिव तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे आणि शाळेचे मार्गदर्शक डी. एन. पाटील यांच्या हस्ते खेळाडू व प्रशिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी शाळेचे प्राचार्य सी. एम. ठाकरे, उपप्राचार्य एस. बी. चव्हाण, शिक्षक पी. व्ही. पवळ, ए. ए. गवळी, एम. एन. ढोबळे, प्रशिक्षक आश्विन चांदणे, दीपलक्ष्मी शिंदे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रसिद्धी विभागप्रमुख रमेश रावसिंग पडवाळ यांनी ही माहिती दिली.



गतवर्षीच्या तुलनेत भाव घसरले ; यंदा ३० ते ५० रुपये किलोचा भाव, आज दरवाढीची अपेक्षा

दसऱ्याआधीच झेंडूचे दर गडगडले ; उत्पादकांना फटका

वाशिम / प्रतिनिधी

दसऱ्याच्या सणाला झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असल्याने चांगले उत्पन्न मिळेल, अशी अपेक्षा झेंडू उत्पादकांनी व्यक्त केली होती. मात्र, दसऱ्याच्या आदल्या दिवशीच वाशिम बाजारपेठेत झेंडूच्या फुलांचे दर घसरल्याने उत्पादकांना आर्थिक फटका बसला. बाजारात झेंडूला प्रतिकिलो ३० ते ५० रुपये दर मिळाल्याने उत्पादकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे.

बाजारपेठेत लाल झेंडूच्या तुलनेत पिवळ्या झेंडूला प्रतिकिलो दहा रुपयांनी अधिक दर मिळत आहे.आता दसऱ्याच्या दिवशी तरी दरात वाढ होईल, अशी आशा उत्पादक आणि विक्रेत्यांना आहे.



गेल्या वर्षी दसऱ्याच्या आदल्या दिवशी झेंडूला प्रतिकिलो ८० ते १०० रुपये दर मिळाला होता. तर दसऱ्याच्या दिवशी फुलांचे दर १५० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे यंदाही सणाच्या काळात चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, यंदा दसऱ्याच्या आदल्या दिवशीच दर ३० ते ५० रुपयांपर्यंत घसरल्याने उत्पादकांची निराशा झाली. दुपारपर्यंत झेंडूला प्रतिकिलो ५० रुपये दर मिळत होता. मात्र, सायंकाळनंतर दरात घसरण होऊन तो ३० रुपयांपर्यंत खाली आला. त्यामुळे उत्पादकांना अपेक्षित भाव मिळाला नाही. झेंडूच्या दरात घसरण झाल्याने उत्पादकांसह शेतकऱ्यांकडून फुले खरेदी करून विक्रीसाठी आणलेल्या विक्रेत्यांनाही आर्थिक फटका सहन करावा लागला.

दसऱ्याच्या दिवशी दरवाढीची आशा

■ दसऱ्याला आपट्याच्या पानांसोबत झेंडूच्या फुलांनाही विशेष महत्त्व असते. घरांची सजावट, देवपूजा, तोरणे तसेच वाहनांच्या पूजेसाठी झेंडूच्या फुलांचा वापर केला जातो. त्यामुळे या सणाच्या काळात फुलांना मागणी वाढते. मात्र, मागणीच्या तुलनेत बाजारातील दर किती राहतात, यावर उत्पादकांचे उत्पन्न अवलंबून असते. यंदा आदल्या दिवशी कमी दर मिळाल्याने झेंडू उत्पादकांसह विक्रेत्यांचे लक्ष दसऱ्याच्या दिवशीच्या बाजारभावाकडे लागले आहे. सणाच्या दिवशी फुलांची मागणी वाढणार असल्याने दरात सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा झेंडूचे दर खूपच कमी आहेत. दसऱ्याच्या आदल्या दिवशी किलोला ३० ते ५० रुपयेच भाव मिळाल्याने अपेक्षित उत्पन्न मिळणे कठीण झाले आहे. दसऱ्याच्या दिवशी फुलांची मागणी अधिक असते त्यामुळे या दिवशी दर सुधारतील, अशी आशा आहे. मात्र, गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा दर कमीच राहतील.

– विजय राऊत, झेंडू विक्रेता, वाशिम

२.५६ लाखांचे दागिने चोरीला ; महिनाभरानंतर गुन्हा दाखल

कारंजा / प्रतिनिधी

बसमधून प्रवास करताना महिलेच्या पर्समधील २ लाख ५६ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, मुर्तिजापूर येथील वसंतनगर, कारंजा बायपास परिसरात राहणाऱ्या मंगला बाळे या १८ सप्टेंबर रोजी मंगळरपीर येथे नातेवाइकांकडे गेल्या होत्या. २० सप्टेंबर रोजी त्या मुलासह मंगळरपीर येथून मुर्तिजापूरला जाण्यासाठी बसने निघाल्या. मंगळरपीर ते कारंजा या प्रवासानंतर त्या सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कारंजा येथे पोहोचल्या. त्यानंतर कारंजा ते अकोला बसने मुर्तिजापूरकडे जात असताना त्यांच्या पर्समधील दागिने चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये सोन्याचे मंगळसूत्र, नेकलेस, कानातील झुमके, मंगळसूत्रातील पेंडल व मणी, सोन्याची नाणी आणि चांदीच्या अंगठ्यांचा समावेश आहे. या सर्व दागिन्यांची किंमत २ लाख ५६ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दागिने शोधूनही मिळून न आल्याने महिलेने पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार कारंजा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार मयुरेश तिवारी करीत आहेत.

झिम्बाब्वेचा ९ विकेट्सने पराभव ; शेफालीचे अर्धशतक, स्मृतीच्या नाबाद ४७ धावा

मंधानाच्या नेतृत्वात भारताचा सलग दुसरा विजय

रायपूर, वृत्तसंस्था :

भारतीय महिला संघाने दुसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेचा ९ विकेट्सने पराभव केला. रायपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने २० षटकांत ८ बाद १०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने ८.५ षटकांत १ विकेट गमावून लक्ष्य गाठले. या विजयासह टीम इंडियाने ३ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी घेतली.

सलामीवीर शेफाली वर्माने २५ चेंडूंमध्ये ५५ धावांची खेळी केली. तर कर्णधार स्मृती मंधाना २३ चेंडूंमध्ये ४७ धावा करून नाबाद राहिली. शेफाली वर्माने २०२६ मध्ये महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ९२२ धावा केल्या आहेत. ती एका कॅलेंडर वर्षात या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली. तिने दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्टला मागे टाकले, जिने याच वर्षी ८२४ धावा केल्या आहेत. या विजयासह भारतीय महिला संघाने २०२६ मध्ये आपला १७वा टी-२० आंतरराष्ट्रीय विजय नोंदवला. एका कॅलेंडर वर्षात भारताचे हे सर्वाधिक विजय आहेत. यापूर्वी संघाने २०१८ मध्ये २३ सामन्यांमध्ये १६ विजय मिळवले होते. १०३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग



करताना शेफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी आक्रमक सुरुवात केली. दोघींनी सुरुवातीच्या ६ षटकांत एकही विकेट न गमावता ७६ धावा केल्या. शेफालीने २४ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. दोघींनी पहिल्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. शेफाली ५५ धावा करून बाद झाली, पण तोपर्यंत भारत विजयाच्या जवळ पोहोचला होता. यापूर्वी भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेला १०२/८ धावांवर रोखले. चिपो मुगेरी-तिरिपानोने ३४ आणि जोसेफिन नकोमोने २७ धावा केल्या. दोघींनी तिसऱ्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी केली. मात्र संघाने नियमित अंतराने विकेट गमावल्या.

भारताकडून निकी प्रसादने २ विकेट घेतल्या. दीप्ती शर्मा, नंदनी शर्मा, क्रांती गौड आणि श्री चरणी यांना प्रत्येकी १ विकेट मिळाली. झिम्बाब्वेच्या डावात ३ फलंदाज धावबादही झाले. निक्की प्रसादने १४व्या षटकातील पहिल्या २ चेंडूंवर विकेट घेतल्या. तिने झिम्बाब्वेच्या फलंदाज चिपो मुगेरी-तिरिपानो आणि न्याशा ग्वांजुरा यांना बाद केले. पहिल्या चेंडूवर मुगेरीचा झेल यष्टीरक्षक रिचा घोषने घेतला. पुढच्याच चेंडूवर ग्वांजुरा पायचीत बाद झाली. तिला खातेही उघडता आले नाही. मात्र निक्कीला हॅट्रिक घेता आली नाही.



तिरंदाजीत शीतलने केली विश्वविक्रमाची बरोबरी

पॅरा एशियाडमध्ये ७०४ गुण मिळवत भारतीय महिला कंपाउंड संघ पात्रता फेरीत पहिली

नागोया, वृत्तसंस्था :

दोन्ही हात नसलेली तिरंदाज शीतल देवीने नागोया येथे सुरू असलेल्या पॅरा एशियन गेम्समध्ये सोमवारी विश्वविक्रमाची बरोबरी केली. हा विक्रम तुर्कीच्या ओझनूर गिर्डीच्या नावावर होता. १९ वर्षीय शीतलने महिला कंपाउंड पात्रता फेरीत ७२० पैकी ७०४ गुण मिळवले.

शीतलने ७२ बाणांपैकी ५७ वेळा अचूक १० गुण मिळवले. यापैकी ३२ शॉट्स लक्ष्याच्या सर्वांत आतील स्कोअरिंग झोनमध्ये लागले. पॅरिस पॅरालिम्पिकची कांस्यपदक विजेती शीतलने पायलसोबत भारताला महिला कंपाउंड संघाच्या पात्रता फेरीत अव्वल स्थान मिळवून दिले. भारताने १,३७९ गुणांसह चीनला मागे टाकले. जम्मू-काश्मीरच्या शीतलने महिला कंपाउंड पात्रता फेरीत जवळपास प्रत्येक शॉटवर अचूक निशाणा साधला. तिचे ३२ शॉट लक्ष्याच्या सर्वांत आतील भागात लागले, ज्याला एक्स म्हणतात. शीतलने मागील आशियाई विक्रमापेक्षा सहा गुणांनी चांगली कामगिरी केली. हा विक्रम ६९८ गुणांचा होता. ७०४ गुणांसह तिने आशियाई पॅरा गेम्समध्ये नवा विक्रम प्रस्थापित केला. सध्याची आशियाई गेम्स चॅम्पियन शीतलने आपला आशियाई पॅरा गेम्सचा विक्रमही सुधारला. २०२३ मध्ये हांगझोऊ येथे तिने ६८० गुण मिळवले होते. आशियाई क्रीडा स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या पायलनेही महिला कंपाउंड पात्रता फेरीत चांगली कामगिरी केली. तिने ६७५ गुणांसह पाचवे स्थान मिळवले.



पॅरा एशियन गेम्स:भारताचे एकाच स्पर्धेत गोल्ड आणि रौप्य पदक

नागोया, वृत्तसंस्था :

भारतीय नेमबाज मोना अग्रवाल आणि अवनी लेखरा यांनी पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला पहिल्याच दिवशी, सोमवारी, २ पदके मिळवून दिली. रायफल शूटिंगमध्ये मोनाने सुवर्णपदक, तर अवनीने रौप्यपदक जिंकले. नागोयामध्ये सुरू असलेल्या स्पर्धेत दोघींनी शानदार वन-टू फिनिश केली. पात्रता फेरीत अवनी दुसऱ्या स्थानावर होत्या. त्यांच्यापुढे मोना होत्या. मोनाने पात्रता फेरीत ६२९.१ गुण मिळवले.


हा आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेतील पात्रता विक्रम आहे. मोना



अग्रवाल राजस्थानमधील सीकर येथील पॅरा-शूटिंगपटू आहेत. त्यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९८७ रोजी झाला. वयाच्या नऊव्या महिन्यात त्यांना पोलिओ झाला आणि त्यांचे दोन्ही पाय प्रभावित झाले. पॅरा-शूटिंग सुरू करण्यापूर्वी मोना पॅरा-ॲथलेटिक्स आणि पॅरा-पॉवरलिफ्टिंगमध्ये सहभागी होत असत. त्यांनी महिलांच्या सिटिंग व्हॉलीबॉलमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली. २०१९ मध्ये मोनाने राजस्थानच्या महिला संघाचे कर्णधारपद भूषवले. संघाने पहिल्या राष्ट्रीय सिटिंग व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. मोनाने डिसेंबर २०२१ मध्ये स्पर्धात्मक रायफल नेमबाजीला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक जिंकले. २०२३ मध्ये मोनाने ओसिजेक, क्रोएशिया येथे झालेल्या वर्ल्ड शूटिंग पॅरा स्पोर्ट वर्ल्ड कपमधील मिश्र संघाच्या प्रकारात कांस्यपदक जिंकले. त्याच वर्षी चांगवॉन येथे झालेल्या विश्वचषकात महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच -१ प्रकारात तिने सुवर्णपदक जिंकले. मार्च २०२४ मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या वर्ल्ड शूटिंग पॅरा स्पोर्ट वर्ल्ड कपमध्ये मोनाने महिलांच्या १० मीटर एअर रायफल एसएच -१ प्रकारात सुवर्णपदक जिंकले. तिने २५०.७ गुण मिळवले. यासह तिने आशियाई विक्रम प्रस्थापित केला

आकांक्षा चौधरीचे पुण्यामध्ये अपहरण

लॉक अप २ या रिॲलिटी शोमुळे प्रसिद्ध झालेली अभिनेत्री आकांक्षा चौधरी हिने एक व्हिडीओ करत तिच्यासह झालेला गैरवर्तनाचा प्रकार सांगितला आहे. आकांक्षाने पुण्यातल्या एका कार्यक्रमात आलेला वाईट अनुभव सांगितला आहे. तिने तिच्या इन्स्टाग्राम पेजवर या संबंधीचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. माझे अपहरणच केले होते असे तिने म्हटले आहे. तिचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. १७ ऑक्टोबरला पुण्यातल्या एका ग्राऊंडवर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम लिटल लेन एंटरटेन्मेंट, त्यात तीन मुले होती ज्यांच्या मी संपर्कात होते. कार्तिक, रौनक आणि प्रथम हे तिघेही १८ वर्षांचे आहेत. त्यांच्या संपर्कात मी होते, मला त्यांनी पेमेंट दिले नाही. इतरही दोन कलाकार होते त्यांचेही पैसे दिले नाहीत त्यांचीही फसवणूक केली. माझा आणि इतर दोन कलाकारांचा फोटो वगैरे त्यांनी वापरला मार्केटिंग केले . तिकिटेही विकली, तो इव्हेंट हाऊस फुल्ल होता. मी सात वाजल्यापासून तयार बसले होते. वेळेच्या आधीच मी तयार होते. ९ ते १० माझा स्लॉट होता. १० ते १०.३० ला इव्हेंट बंद केला गेला. पण मला कुणी घ्यायलाही इथे आले नाही. हे लोक मला घ्यायला येणार होते. पण कुणीही १०.३० पर्यंत आले नाही. मी जबरदस्तीने सांगितले की मी स्टोरी टाकून देईन. मला इथे बसवून ठेवले , प्रेक्षक वाट बघत होते. मी पोलीस तक्रार करेन असेही सांगितले होते . पण मी तिथे गेले तेव्हा इव्हेंट संपला होता. सगळे लोक रस्त्यावर होते. या लोकांनी ग्राऊंडवर मला आणखी एका मुलीला सोडून दिले , त्यासाठी त्यांनी बंद ग्राऊंड ओपन केले होते . तिथे सगळे प्रेक्षक होते. आम्हाला सगळ्या प्रेक्षकांना सोडून दिले . त्यानंतर स्टेजचे लाइट्स सुरू केले. मी कुणाच्या तरी शब्दाखातर हा इव्हेंट केला.




***



बुंदेली लोकगीत आणि इंग्रजी पॉपचा संगम ; हिंसाचाराची वेदना व्यक्त करणारे गाणे

रघुवीर यादव आणि मंथन यांचे नवे गाणे बदरा रिलीज

अभिनेते रघुवीर यादव आणि गायक मंथन यांनी एकत्रितपणे 'बदरा' हे नवे गाणे रिलीज केले आहे. 'बदरा' घरगुती हिंसाचार आणि बिघडलेल्या नात्यांमध्ये अडकलेल्या लोकांच्या मानसिक वेदना आणि मानसिक तणाव समोर आणते. या गाण्यात पारंपरिक बुंदेली लोकगीत आणि इंग्रजी ऑल्ट-पॉपचा फ्यूजन तयार करण्यात आला आहे. या व्हिडिओमध्ये अभिनेत्री श्रेया सिंह आणि मंथन दिसत आहेत. ते घरगुती हिंसाचार आणि त्यातून बाहेर पडण्याचा प्रवास भावनिक पद्धतीने साकारतात. हे गाणे सर्व प्रमुख संगीत प्लॅटफॉर्म्सवर ऐकण्यासाठी उपलब्ध आहे. 'बदरा' या गाण्यात जुनी लोकसंस्कृती आणि आजचे आधुनिक संगीत एकत्र गुंफण्यात आले आहे. या गाण्यात बुंदेली भाषेतील जुन्या लोकगीतांच्या ओळींचा वापर करण्यात आला आहे . मंथनने इंग्रजी बोलांच्या माध्यमातून या पावसाची तुलना घरातील बिघडलेल्या वातावरणाशी आणि मानसिक दबावाशी केली आहे. रघुवीर यादव यांच्या भारदस्त आवाजात गायलेल्या ओळी, अरे बरसन लागे री




जे बदरा..., गाण्याला अधिक गहिरेपणा आणि प्रभाव देतात. गाण्याच्या म्युझिक व्हिडिओमध्ये एका महिलेच्या अंतर्मनातील वेदना आणि तिचा संघर्ष दाखवण्यात आला आहे. व्हिडिओच्या सुरुवातीला कार चालवणाऱ्या महिलेच्या डोळ्यांत अश्रू दिसतात. त्यानंतर घरातील वाद, मानसिक त्रास आणि शेवटी पावसात कारमधून बाहेर पडून त्या बिघडलेल्या वातावरणापासून दूर जाण्याचा निर्णय दाखवण्यात आला आहे.

एका रात्रीत उलगडतील अनेक रहस्ये

वन नाइट थ्रिलर : 'गजब रात'मध्ये पोलिस बनलेले मनोज खुनाचे गूढ उकलताना दिसणार..

नीरज पांडे यांच्या 'गजब रात' या चित्रपटात मनोज बाजपेयी पोलिस अधिकारी अजय दीक्षित यांच्या भूमिकेत दिसणार आहेत. एका खूनाच्या प्रकरणाभोवती आणि चालत्या कारमधून फेकून दिलेल्या जखमी मुलीभोवती ही कथा गुंफलेली आहे. हा वन-नाइट थ्रिलर वेगाने बदलणाऱ्या घटनाक्रमातून आणि अनेक उपकथांद्वारे सस्पेन्स निर्माण करतो. या चित्रपटात नुसरत भरुचा, दिव्या दत्ता, साकिब सलीम आणि अक्षय ओबेरॉय यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. प्रॉडक्शन डिझायनर राजेश चौधरी यांच्या मते, कथेचा वेग आणि विविध व्यक्तिरेखांमधील गुंतागुंतीचा घटनाक्रम ही या चित्रपटाची वैशिष्ट्ये आहेत. 'गजब रात'चा प्रीमियर २३ ऑक्टोबर रोजी नेटफ्लिक्सवर होणार आहे. चित्रपटासाठी भोपाळमध्ये दिल्लीचे वातावरण पुन्हा उभे करण्यात आले. राजेश यांच्या मते, चित्रिकरणासाठी एका बांधकाम सुरू असलेल्या रुग्णालयाचा विकास करण्यात आला. चित्रपटाच्या गरजेनुसार त्यात सुमारे ६० टक्के अतिरिक्त काम करून घेण्यात आले. याशिवाय दिल्लीतील अनेक भागांतही



चित्रिकरण झाले आहे. राजेश यांच्या मते, मनोज आपल्या व्यक्तिरेखेला तिची परिस्थिती, पार्श्वभूमी आणि व्यक्तिमत्त्वानुसार आकार देतात. चित्रपटातील त्यांच्या पोलिसाच्या व्यक्तिरेखेची ओळख केवळ त्याच्या पदामुळेच नव्हे, तर त्याच्या विचारसरणी आणि वर्तनातूनही ठळकपणे समोर येते.

इम्रान खान यांच्या याचिकेवर मुंबई हायकोर्टात २६ ऑक्टोबरला सुनावणी

बॉम्बे उच्च न्यायालय अभिनेता इम्रान खान यांच्या परदेशी नोंदणी अधिकाऱ्याने २६ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या 'भारत सोडण्याच्या नोटिशी'ला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करणार आहे. अमेरिकेचे नागरिक आणि भारताचे परदेशस्थ नागरिक कार्डधारक असलेल्या या अभिनेत्याला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलनात कथित सहभाग असल्याने २८ ऑक्टोबरपर्यंत भारत सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्य न्यायाधीश महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने ज्येष्ठ अधिवक्ता धोंड यांनी याचिकेचा उल्लेख केल्यानंतर सोमवारी या प्रकरणाची सुनावणी निश्चित केली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने खान यांच्याविरुद्ध कोणतेही गुन्हेगारी पूर्वइतिहास आहे का, अशी विचारणा केली. धोंड यांनी सांगितले की अभिनेत्याविरुद्ध असा कोणताही पूर्वइतिहास नाही.

रेणुका महामुने : प्रवास एका अभिनेत्रीचा

नवरात्री विशेष

एखाद्याच्या ओंजळीत परमेश्वराने किती गुण द्यावेत, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रेणुका महामुने. चित्रकार, नृत्यांगना , नृत्यदिग्दर्शक, कवयित्री,कथा - पटकथा लेखिका, सिनेअभिनेत्री, नाट्यकलावंत, प्रकाशयोजनाकार, कथा - कथनकार इत्यादी विविध भूमिका चोख बजावत रेणू ने कलाक्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. जालना जिल्ह्यातील 'टेंभुर्णी' या गावी २८सप्टेंबर१९९२ ला रेणूचा जन्म झाला. कलाकारांच्या घरात जन्माला आल्याने साहजिकच रेणुकालाही लहानपणीच कलेची गोडी लागली. सुप्रसिद्ध चित्रकार,गायक,वादक होते . अशा कलासंपन्न वातावरणात रेणू लहानाची मोठी झाली. वयाच्या चौथ्या वर्षापासून रेणूने गणेशोत्सव, नवरात्री इ.उत्सवानिमित होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात,स्पर्धेत नृत्य, अभिनयाची सुरुवात केली.पुढे स्थानिकच्या एका कला मंडळाच्या माध्यमातून सलग दोन - तीन वर्ष महाराष्ट्रभर नृत्य, नाटकाचे प्रयोग केले. सकाळी तालीम, दिवसभर शाळा, सायंकाळी नृत्य, नाटकाचे प्रयोग असा लहानशा रेणूचा ठरलेला दिनक्रम होता .टेंभुर्णी येथील जि.प.प्रा.शाळा येथे प्राथमिक शिक्षण घेतल्यावर जमानाबाई बाळाराम काबरा महाविद्यालय येथे दहावीत असताना शाळेचे प्रतिनिधित्व करत ' जाफराबाद महोत्सव २००७' ला ' पिकल्या पानाचा ' ही बैठकीची लावणी उत्कृष्टरित्या सादर करत महोत्सवाच्या ' प्रथम ' पुरस्काराची मानकरी ठरली. नवभारत महाविद्यालय, टेंभूर्णी येथे बारावी कलाशाखेतून उत्तीर्ण झाल्यानंतर रेणूने पुढील शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नाट्यशास्त्र विभाग मधून ' बॅचलर ऑफ परफॉमिंग आर्ट्स' इन ड्रमॅटीक्सचे शिक्षण घेतले आहे. रेणूने कथक व ओडिसी नृत्यांगना गुरू पार्वती दत्ता यांच्याकडे कथ्थक चे तर व व्हि भरतनाट्यमचे प्राथमिक शिक्षण घेतले आहे. रेणूने आजवर अनेक शाळा, कॉलेज , नृत्यस्पर्धा,स्नेहसंमेलन, युवा महोत्सव इ.साठी नृत्यदिग्दर्शन केले आहे. तर अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरीय नृत्यस्पर्धेसाठी, लोककला महोत्सव/स्पर्धेसाठी 'नृत्य परीक्षक' म्हणून काम पाहिले आहे. २०२० चा राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत तिला 'नृत्य दिग्दर्शनासाठी' 'नृत्यगुरूवर्य' हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे.तसेच दैनिकासाठी 'नृत्ययात्रा' हे नृत्यावर आधारित सदरात अनेक स्व:लिखित लेख प्रकाशित झाले आहेत. तर, २०१६ ला'शिरपा' या चित्रपटात सहायक अभिनेत्री म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर एकलव्य, रत्नाकर, बापानं गमावलं पोरांन जमवलं या चित्रपटात मुख्य भूमिका व नृत्यदिग्दर्शन ही केले. सतत नवनवीन गोष्टी शिकण्याची आवड असणारी रेणू सध्या नाट्य - तंत्रदिग्दर्शक संतोष गौतम यांच्याकडे नाटकातील महत्वाचा भाग समजल्या जाणाऱ्या 'प्रकाशयोजना' शिकत असून लवकरच 'प्रकाश योजनाकार' म्हणून ही 'प्रकाशझोतात' येऊ शकते, असे म्हणायला हरकत नाही.

– दत्ता उमाळे, मेहकर





बुलढाणा

एआरडी सिनेमाल

- **दृश्यम ३ :** २:००, ५:३०, ९:०० झच
- **धप्पा :** २:३० दु.

छत्रपती संभाजीनगर

इनॉक्स प्रोझोन मॉल

- **डोरेमॉन :** सकाळी ९:३०, ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:०० ■ **स्ट्रीट फायटर :** सकाळी ९:३०, ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:०० ■ **दृश्यम ३ :** दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३० ■ **प्रहार :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:०० ■ **नवी नवेली :** दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३० ■ **द व्हिवान :** दुपारी १२:१५, २:३० ■ **क्रांती :** दुपारी १२:१५, २:३० ■ **सोहळा :** दुपारी १२:१५, २:३०

खिंवसरा सिनेफ्लेक्स

- **रजनी द जेलर -२ :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३० ■ **अफरा-तफरी :** दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३० ■ **धप्पा :** दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३० ■ **दृश्यम - ३ :** दुपारी १२:१५, ४:३०, सायंकाळी ६:३०

मुक्ता - नुपूर सिनेमागृह

- **रजनी द जेलर २ :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:०० ■ **दृश्यम - ३ :** सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ०० ■ **स्ट्रीट फायटर :** दुपारी २:३०, रात्री १०:२५
- **नवी नवेली :** दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०

खामगाव

श्री गजानन टॉकिज

- **दृश्यम ३ :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

सनी पॅलेस टॉकिज

- **दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९**

वाशिम

एच२एम मूवीप्लेक्स

स्क्रीन १ ■ **दृश्यम : द कन्क्लुजन :** सकाळी ९:४० ■ **नई नवेली :** दुपारी १२:३० ■ **जेलर २ (हिंदी) :** सायंकाळी ६:३० ■ **प्रहार :** दुपारी ३:२० ■ **नई नवेली :** रात्री ९:४०
स्क्रीन २ ■ **दृश्यम : द कन्क्लुजन :** दुपारी ३:३० ■ **नई नवेली :** दुपारी १२:३० ■ **जेलर २ (हिंदी) :** दुपारी १२:२०, रात्री ९:३० ■ **प्रहार :** सायं.६:२० ■ **नई नवेली :** सकाळी ९:३०

अकोला

मीराज

- **नयी नवेली :** स. ९.००, दु. १२.०५, दु. २.३०, दु. ५.३०, रात्री ८.३०, रात्री १०.३०, रात्री ११.३०
- **हनुमान अंश :** स. ९.०५
- **प्रहार :** स. ९.०५, दु. १२.००, दु. ३.००, दु. ५.०५, रात्री ८.००, रात्री ११.००
- **दृष्यम दी कॉन्क्यूजन :** स. ९.४५, दु. १.००, सायं. ७.३०, रात्री १०.४५ ■ **स्ट्रीट फायटर :** दु. १२.००, रात्री ८.०० ■ **सोहळा :** दु. २.५५ ■ **क्रांती :** दु. ४.१५ ■ **डोरेमॉन :** दु. ५.५५